दिवाळी विशेषांक २०२५

# नवा वास्तुविचार



संपादक

डॉ.विलास ज.पवार





ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य : २२५/-

दिवाळी विशेषांक २०२५

# नवा वास्तुविचार

-: संपादक :-

**डॉ. विलास पवार**



प्रकाशन
ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- ६९३०९१९७ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com

# अंतरंग

## लेख

१. एक घरकुल...स्वप्नातले - स्मिता अमित हर्डीकर................. ०५
२. तिचं अस्तित्व - साधना झोपे........................................ ०७
३. असेही एक व्यक्तीमत्व -पुष्पा लंकेश्वर.............................. ११
४.राखी - दिलीप कजगांवकर............................................. १३
५.तिचा बाप - आश्विनी म्हात्रे......................................... १५

## कथा

६. हराळी - संतराम नाना पाटील...................................... १७
७. हिरे - वैभव दि. धनावडे............................................. २३
८. टकली हडळ - संतोष उदमले........................................ २९
९. गृहप्रवेश - प्राजक्ता आनंद हेदे.................................... ३३
१०.त्याचे वेगळेपण...- निलेश बामणे ................................. ३९
११.रि-युनियन - नेहा उमेश उजाळे......................................४५

- काव्यसृष्टी................................................................ ८३
- पाककृती.................................................................. ८५

# संपादकीय

## सहवास फुलतो संवादाने

आपण घरात राहतो. घर म्हणजे अशी “वास्तू” असते जिथे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, जबाबदारी नात्यांची जपवणूक या सगळ्यांची एकत्रित भावना असते. सगळ्यात घाई सकाळी आणि थकलेली अवस्था असते संध्याकाळी. सर्व कामकाज, शाळा, कॉलेज, कार्यालय, नित्य कामे आटोपल्यानंतर एका छताखाली सर्व सहवासी एकत्रित असतात तेव्हा वास्तु कशी असते त्यावर भाष्य करणे महत्त्वाचे ठरते.

अगोदरच्या काळात घरात संध्याकाळी टीव्हीसमोर लोक बसलेली आढळत; परंतु आता टीव्हीचा एवढा उदो उदो नाही; पण घरातली मंडळी मात्र घरातल्या जागेचे वाटप करून बसलेली असतात. अर्थातच बसलेले असण्यापेक्षा कार्यमग्न अवस्थेत असतात असंच म्हणायला हवे. मेसेज वाचन करणे, रिल बघणे, फॉरवर्ड व्हिडिओ बघणे, चॅटिंग करणे इत्यादींसाठी. सर्व आत्मनिर्भर अवस्थेत कार्यमग्न असतात म्हणायला एकमेकांच्या सहवासात; पण प्रत्येक जण आपापल्या विश्वात असतो. एकमेकांशी संवाद सुद्धा आता दूरध्वनीवरच होतो. प्रत्यक्षात एकमेकांशी अंतर असले तरी सुद्धा संवाद हा अगदी यांत्रिक स्वरूपाचा झाला आहे. संवाद त्रोटक आणि शॉर्टकट, ओके आणि आता तर त्या ओकेचा फक्त ‘के’ झाला आहे.

नात्यांची जपवणूक, जिव्हाळा अगदी आक्रसून गेला आहे. तंत्रज्ञानाच्या क्रांतीने जग जवळ आले पण माणसे दूर चालली आहेत असेच काहीसे चित्र दिसले आहे. माहितीचा अतिप्रचंड अविष्कार अनुभवायला येतो आहे; पण प्रत्यक्षात मानवी जाणीव, भावनिक ओलावा इत्यादींचा कोरडेपणा आपल्या वाट्याला येतो आहे. ज्या पद्धतीचे आक्रमण मोबाईल फोनने केले आहे, त्यातील ॲपने केलेले गारुड त्यांनी एक अनामिक अवस्थेत सर्वजण जगत आहेत. सहवास शब्दाचा विरोधाभास काहीसा पाहायला मिळतो आहे.

आपल्या पूर्वजांनी सण, उत्सव साजरे करण्यासाठी अनेक योजना केल्या आहेत. आपल्याला त्याचा विसर पडला आहे. घरातल्या सगळ्यांनी उत्सव, सण साजरा करण्याची कल्पना एकत्रितपणे योजना आखून त्या अमलात आणणे, त्यासाठी थोडे राग आणि जास्तीत जास्त गोडवा आणून करण्याचे वृत्ती होती ही वृत्ती लोप पावली असं नाही. फक्त मोबाईल आणि त्याचा संलग्न असलेली टाळकी टाळली तर किमान तासभर मनसोक्त गप्पा, परस्पर खिल्ली उडवणे, वादसंवाद करणे यासाठी घ्यायला हवे. हे करताना मोबाईल हातभर तरी लांब ठेवावा. तासभर त्याचा संपर्क वर्ज करावा. या तासभराचा संवाद दिवसभराचा थकवा दूर करीलच, पण त्याचबरोबर दुसऱ्या दिवशीची शिदोरी सुद्धा तयार करेल.

दिवाळी सारखा सण तर एकत्रित आकाश कंदील करणे, रांगोळ्या काढणे, एकत्रित सजावट करणे इत्यादींसाठी पर्वणीच आहे. वास्तू मधील एकमेकांचा सहवास संवादाने फुलवण्यासाठी दिवाळी सणाचा मुहूर्त चांगलाच आहे, चला तर, संवादाने सहवासाचा आनंद घेऊन दिवाळी सण साजरा करूया!

**दिवाळी निमित्त लक्ष लक्ष शुभेच्छा!**




# With best compliments from

इंडियान्युजनेट डॉट कॉम

**Indianewsnet.com™**

The News Portal In Cyber World

## Chief Editor : Dr. Vilas Pawar

# NEWS PORTAL

**Marathi & English**

# एक घरकुल स्वप्नातले

स्मिता हर्डीकर

कामगार हा समाजाचा मोठा घटक आहे. शेत मजूर,गवंडी, बिगारी कामगार, घरकाम करणारे कामगार ह्यांच्यावर देश चालतो. मोठ मोठी स्वप्ने त्यांच्या मेहनतीवर आकार घेतात.

प्रत्येक माणसाचं एक लहानापासून बघितलं एक स्वप्न असतं. स्वत:चं हक्काचं एक घरकुल असावं. पहिले दोन खोलीत खूश असणारे मन चार खोल्यांचे स्वप्न पाहू लागते. प्रायव्हसीच्या नावाखाली प्रत्येकालाच स्वतंत्र खोली हवी असते. अगदी अंघोळ करायला वेळही नसला तरी बाथरूमही आलिशान हवे असते, चार तरी झाडे लावायला बाल्कनी हवी आणि हो, स्वयंपाक बनवणार नसलो तरी स्वयंपाकघरही चांगले मोठे हवे. सर्व सोयीसुविधांनी युक्त असे.

हवा उजेड चांगला घरात येण्यासाठी किती उंचावर जावं हो ? सोळा, सतरा आणि त्यापेक्षाही जास्त टोलेजंग इमारती. हल्लीचे भाव बघता जितक्या वरच्या मजल्यावर घर तितके त्याचे पैसे लाखोंनी वाढतात बरं! आजकाल तर करोडों मध्ये मोडणारी घरं घेण्यासाठी आयुष्य 'पणाला' लावले जाते. महिलांच्या नावावर कमी व्याज दर असलेले कर्ज मिळते म्हणून महिलांच्या नावे घर खरेदी केले जाते. टोलेजंग इमारती उभारून जास्तीतजास्त जागेचा वापर करता येतो. वाढत्या लोकसंख्येमुळे सगळी घरे भारतातही. पण ह्या टोलेजंग इमारती बांधण्यासाठी जे मजूर कामगार आपला जीव मुठीत घेऊन काम करतात, कधीतरी वाटतं दुसऱ्यांची घरे आत्मियतेने बांधणाऱ्या उंचावर लटकणाऱ्या झोपाळ्यावरून काम करताना, क्रेन मधून काम करताना,इतक्यामोठ्या टोलेजंग इमारतीला रंग देताना ह्या जीवांच्या डोळ्यांत आणि मनात आपलं दूर सोडलेलं घर असेल का ? लाखो करोडोंच्या घराचे बांधकाम करणाऱ्या मजुराला मात्र रोजनदारी वर पैसे मिळत असतील किंवा आठवड्याला पैसे दिले जात असतील. करोडोंचे घर घेऊन आपण सुखी; ते घर विकणारे बिल्डर अधिक सुखी पण मग शारीरिक मेहनत घेऊन ते घर बांधणाऱ्या



मजुरांना त्यांचा योग्य मोबदला मिळत असेल? त्या हलणाऱ्या झोपाळ्यावरून उंचीवर जाऊन रंग लावताना त्याने डोळ्यांत कोणतं स्वप्न बघितलं असेल?

सरकारी योजनांचा लाभ ह्या कामगार वर्गाला मिळण्यासाठीही पाऊल उचलले पाहिजे. कामगारांचे जीवन आणि काम करण्याचे तास,कामाचे वातावरण, सामाजिक सुरक्षा त्यांचा आरोग्य विमा ह्या सुविधांचा लाभ त्यांना मिळाला पाहिजे. त्यांना शैक्षणिक लाभ, आरोग्य सेवा, अपंगत्व लाभ, त्यांना मिळेल ह्याकडे लक्ष दिले पाहिजे.कामगार हा समाजाचा मोठा घटक आहे. शेत मजूर,गवंडी, बिगारी कामगार, घरकाम करणारे कामगार ह्यांच्यावर देश चालतो. मोठमोठी स्वप्ने त्यांच्या मेहनतीवर आकार घेतात. देशाचा विकास होतो म्हणून त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.

आपल्या स्वप्नांची बांधणी त्यांच्या जीवावर करताना, एका घरकुलाचे स्वप्न हे त्यांचेही डोळे बघत असतात ह्याची जाणीव जिवंत ठेवली पाहिजे.


## चारोळ्या

कोंडू का या भावनांना
जगण्याला या 'विरह' म्हणतात
शृंगार लेवून कल्पनेचा
भावूक होऊन मनास छेडतात



समजले जरी नजरेने
ते हृदयाने ओळखावे लागते
मनातील भावनांना वहात
हृदयापर्यंत पोहचावे लागते!

– निशा शिंदे



दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!





# श्री. उदय पाटील
# श्री. मिलिंद साठे
# श्री. अनिल नलावडे
# श्री. मामा मनोरकर

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे**



दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

# श्री. संतोष बांदोडेकर
# श्री. पंकज कुलकर्णी
# श्री. हंसराज अहिरराव
# श्री. किशोर पटेल

कॉन्ट्रॅक्टर
सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे

# तिचं अस्तित्व

साधना झोपे

> ती विचार करू लागली. काय आहे माझे स्वतः चे अस्तित्व ? प्रत्येक जण आपले कार्यक्रम आधीच ठरवतो आणि मग मला सांगितले जाते. प्रत्येकाचे मन राखण्यासाठी मी प्रत्येकवेळी...

सारे निघून गेल्यावर ती आवराआवर करत होती. डायनिंग टेबल आवरतांना तिचे लक्ष मघाशी टेबलावर तसाच ठेवून दिलेल्या कॉफीच्या कपाकडे गेले. कॉफीचा कप उचलतांना हुंदका गळ्याशी दाटून आला. ती तिथेच खुर्चविर कॉफीचा कप हातात घेऊन बसली. ती विचार करू लागली, काय आपले जीवन आहे! कधीतरी एक कप कॉफी पण आपण आराम बसून पिऊ शकत नाही! काय स्थान आहे आपले या घरात ? अमेयला माहीत आहे की, मला गरमागरम कॉफी प्यायला आवडते.आज कित्येक दिवसांनंतर कॉफी केली होती. तीपण पिऊ नाही दिली. जन्मदात्या आईवडिलांची काळजी घेतो तशी कधीतरी जन्मभर साथ देणाऱ्या बायकोचा पण विचार करावा ना! बरोबर आहे, त्यांना आता या वयात आपल्याशिवाय कोण आहे ? पण मलाही कोण आहे रे तुझ्याशिवाय! मी तर सारे सोडून आली. केतकी कितीतरी वेळ एकटीच विचार करत बसली होती. दुःखाचे कढ आतल्याआत पित बसली होती. फोनच्या रिंगने तिची तंद्री भंग पावली. फोनच्या स्क्रीनवर आपल्या मैत्रिणीचे मेघाचे नाव बघून तीला आनंद झाला.

"बोल ग, आज कसा काय फोन केला ?"

"ए बाई फोन मीच करते.तुला कुठे वेळ असतो. संसार तर फक्त तुला एकटीलाच आहे. आम्हीतर काय वाऱ्यावर सोडून दिला आहे संसार"

"सॉरी चुकले ग !"

"म्हणे सॉरी, या सॉरीला फक्त एका अटीवरच माफी मिळेल."

"बोला काय अट आहे ? काय खायचे आहे तुला ?" "ए, त्या किचनमधून बाहेर निघ. खायला नको काही. आज आपण बाहेर जाऊ. पिक्चरला. मी, श्रावणी, सोहनी आणि तू.

चारही मिळून जाऊ. जरा पटापट तयार हो."

"अग, मी कशी येऊ? सासू सासरे आहेत आणि अमेयला पण विचारले नाही."

"अग त्यात काय एवढे. मग आता विचार. आणि आपण ३–६ च्या शो ला जायचे आहे.७ पर्यंत येऊ घरी आणि नंतर कर की स्वयंपाक."

"बघते."

"बघते नाही, मी येत आहे तुला पिकअप करायला तू तयार रहा. मला काही कारण नकोय. एकतर किती दिवसांनी बाहेर निघण्याचे ठरवले आहे तू खोडा नको घालू. चल बाय, आवर आता तुझे काम आम्ही येतोय २ पर्यंत आणि हो ऑनलाईन तिकीट काढून झाले आहे"

मेघाने फोन ठेवला. केतकीने विचार केला, अमेय गाडी चालवत असेल म्हणून आता फोन केला तर तो उचलणार नाही आणि चिडेल आणि कदाचित पिक्चरला जायची मिळणारी परमिशन पण मिळणार नाही. केतकी थोडावेळ विचारात पडली तीला कळतच नव्हते काय करावे. पण तिने विचार केला आधी काम तर आवरून घेऊ मग अमेयला फोन करून विचारू. ती पुन्हा



कामाकडे वळली. सर्व कामआवरे पर्यंत सासूसासरे देवळातून आले. ते आल्यावर तिने त्यांना गरम जेवण वाढले. त्यांचे जेवण झाल्यावर ती जेवायला बसली. जेवतांना तिने अमेयला फोन करण्यासाठी फोन हातात घेतला. पण तेवढ्यात त्याचाच फोन आला. "केतकी, अग सुबोध आज आपल्याकडे संध्याकाळी जेवायला येणार आहे. त्याला तुझ्या हातची पनीरची भाजी खायची आहे. येतो आम्ही आठ वाजेपर्यंत."

"अहो, मी तुम्हाला आत्ता फोनच करत होती. मेघाचा फोन आला होता. तिने तीन ते सहाच्या शोच्या पिक्चरची तिकीटं काढली आहे. माझे पण काढले आहे. तुम्ही सुबोध भावोजींना उद्या बोलवा ना जेवायला."

"केतकी मी आधीच सांगून टाकले आहे. आता मी नाही प्लॅन बदलणार. तुला काय करायचे ते तू कर." असे रागाने बोलत अमेयने फोन ठेवून पण दिला. केतकी काहीच बोलू शकली नाही. तिने हुंदका दाबत मेघाला फोन केला आणि सांगितले," "मेघा, अग

अमेयने त्याच्या मित्राला संध्याकाळी जेवायला बोलवले आहे. ते लोक आठ वाजता येणार आहेत."

त्यावर मेघा म्हणाली, "अग,आठ वाजता येणार आहे ना! मग आपण पिक्चर नंतर पाणीपुरी खायला जाणार होतो, तो प्लॅन कॅन्सल करू म्हणजे तू साडे-सहा पर्यंत घरी पोहचशील आणि आता अजून बारा होतायत. तू संध्याकाळच्या स्वयंपाकाची आता थोडीफार तयारी करून ठेव म्हणजे ते लोक येई पर्यंत तुझा स्वयंपाक तयार असेल."

"हो ग" मेघाने सुचवलेल्या उपायावर केतकी खूश झाली. तिने परत अमेयला फोन केला, "अहो, मी काय म्हणते, मी आता संध्याकाळची थोडी तयारी करून जाते आणि साडे-सहा पर्यंत घरी येते. आल्यावर लगेच बाकीचा स्वयंपाक करते म्हणजे तुम्ही येईपर्यंत माझा स्वयंपाक तयार असेल."

"तुला हव ते कर, मला काय सांगायचे ते माझे सांगून झाले आहे. त्यावरही जर तुला तुझ्या मनाचे करायचे असेल तर तसे कर, मला परत परत फोन करू नको."

केतकी बंद झालेला फोन तसाच कानाशी पकडून कितीतरी वेळ उभी होती.

"खरंच माझ्या मनाला काही अर्थच नाही का ? सगळ्यांचे सगळे वेळेवर करते तरी एखाद दिवशी पण मला सूट नाही का ?"

तिने मेघाला फोन केला, "मेघा, अग हे 'नाही' म्हणत आहेत, 'सॉरी' मी नाही येऊ शकत."

मेघा खूप चिडली, "तू का सॉरी, खरंतर सॉरी आम्ही म्हणायला हवे. तू येऊ शकणार नाही माहीत असूनही तुझे तिकीट काढले आणि यापुढे तुला कधीच बोलवणार नाही."

"मेघा, प्लीज तू तरी समजून घे ग "

"सॉरी केतकी, मला आवरायचे आहे, ठेवते मी फोन "

केतकी अगदी हताश झाली आणि बंद झालेल्या फोनकडे किती वेळ उष्ण उष्ण अश्रुंच्या सोबतीने बघत राहिली. ती विचार करू लागली. काय आहे माझे स्वतःचे अस्तित्व. प्रत्येक जण आपले कार्यक्रम आधीच ठरवतो आणि मग मला सांगितले जाते. प्रत्येकाचे मन राखण्यासाठी मी प्रत्येकवेळी माघार घेते. नाते फक्त मीच जपायचे का ? माझा आनंद मी कधी अनुभवायचा ? वाटले होते. मुले मोठे झाल्यावर आपल्याला थोडी मोकळीक मिळेल. आपण आपले राहून गेलेले छंद जोपासू. पण कसलं काय! आपण तर आहे तिथेच आहोत. उलट घरातच बसून अशिक्षित होत चाललो आहोत. आपले कार्यक्षेत्र म्हणजे स्वयंपाकघरच झाले आहे. कधी होणार की नाही आपल्या आनंदाचा विचार; की आपण कायम शून्य किंवा गृहितक रहाणार.... ?

# बाटलीच्या झाकणाचा रंग आणि त्याचा अर्थ काय? जाणून घेऊ.

**दुकानातून पाणी विकत घेताना तुम्ही वेगवेगळ्या ब्रँड्सच्या पाण्याची बाटली पाहिली असेल. ज्याच्या झाकणांचा रंग हा निळा, हिरवा, पिवळा, काळा असल्याचं तुम्ही पाहिलं असेल. अनेकांना वाटतं की हा ब्रँडच्या रंगामुळे त्याच्या बाटलीचा आणि त्याचा झाकणाचा रंग वेगवेगळा असतो. पण असं नाही, हा तुमचा चुकीचा समज आहे.**

खरंतर पाण्याच्या बाटलीवरील झाकणाचा रंग काहीतरी सूचना देत असतं, ज्याकडे आपण दुर्लक्ष करतो.

**१. पांढरं झाकण : मशीन फिल्टर्ड वॉटर**

पांढ्या रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे हे पाणी मशीनद्वारे किंवा आरओ प्लांटमधून फिल्टर करून भरलेलं आहे. हे पाणीही प्यायला योग्य असतं, मात्र मिनरल्सची मात्रा थोडी कमी असते.

**२. हिरवं झाकण : फ्लेवर्ड वॉटर**

हिरव्या रंगाच्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये फ्लेवर्स मिसळलेले असतात. चव बदलण्यासाठी हे पाणी वापरलं जातं. मिनरल वॉटरइतकं हे शुद्ध नाही, पण हे पाणी सुरक्षित असतं.

**३. निळं झाकण : मिनरल वॉटर**

जर तुम्ही निळ्या रंगाच्या झाकणाची बाटली घेतली असेल, तर त्याचा अर्थ असा की, हे पाणी नैसर्गिक झऱ्यातून किंवा मिनरल सोर्समधून आणलेलं आहे. हे पाणी आरोग्यासाठी सर्वांत चांगलं मानलं जातं.

**४. काळं झाकण : अल्कलाइन वॉटर**

काळ्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये अल्कलाइन वॉटर असतं, ज्यामध्ये भरपूर मिनरल्स असतात. हे पाणी महाग असतं आणि जगभरातील खेळाडू आणि सेलिब्रिटी हेच पाणी पिणं पसंत करतात.

**५. पिवळं झाकण : विटामिन वॉटर**

पिवळ्या रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे विटामिन्स आणि इलेक्ट्रोलाइट्सनी समृद्ध असलेलं पाणी. हे पाणी शरीराला ऊर्जा देण्यासाठी आणि हेल्दी राहण्यासाठी उपयुक्त आहे.

पुढच्या वेळेस तुम्ही बाहेर पाणीची बाटली खरेदी करताना या झाकणांच्या रंगाकडे नक्की लक्ष द्या. सील तपासा, एक्सपायरी डेट पाहा आणि मुलांनाही ही माहिति सांगा, जेणेकरून त्यांनाही सुरक्षित आणि योग्य पाणी निवडता येईल.

## With best compliment from



# M/s. Vaishnavi Construction

**Prop. Avinash Jayvant Vekhande**

**Mob-9527928456**

Address:- S-02, 2nd Floor, VitthalDham Apt., Rahul Nagar, Cherpoli
Tal:- Shahapur, Dist:- Thane Pin 421 601
Email: vaishnavi.construction1974@gmail.com avinashvekhande270@gmail.com

## With best compliment from

# Dimple Enterprises

### Builder & Developers

**Mahesh Shirke**
**Director**
**9370488011**

**Building no. 21/B, 202 Ashok Nagar, Bhiwandi, (E).**

# With Best Compliments from

## MANIK INFRATECH PVT. LTD.



REGISTERED LICENSED FIRE FIGHTING CONTRACTOR (MAHARASHTRA FIRE SERVICES)

FIRE FIGHTING CONSULTANT & INSTALLATION OF ENTIRE HYDRANT SYSTEM




**Head Office :** 203/ 204, Plot No. K3, Udyog Bhavan No. 2, Nr. Nakshtra Hotel, Anand Nagar MIDC, Ambernath (E).

**Email :** admin@manikenfratech.com 0251 260 1166 / 8108238886

## दिवाळी निमित्त हर्षभरीत शुभेच्छा !

**वैष्णवी मजूर कामगार सहकारी सोसायटी**

चेअरमन

श्री. कल्पेश भारत केणे

**राजा कन्स्ट्रक्शन**

Government contractor

कु. राजेश भारत केणे

बी.ई.सिव्हील इंजिनियर




मु. गोरसई पो. वडपे ता. भिवंडी, ठाणे

मो.८३९०३९६५००

# असे एक व्यक्तिमत्त्व

**पुष्पा लंकेश्वर**

> उद्योगच घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी असे म्हणतात. तद्वत त्यांना एक महान व्यक्तीने नवीन उभारी देऊन "मलेरिया वर्कर" म्हणून आरोग्य खात्यात काम करण्याची संधी दिली.

माणूस हा ध्येयवादी असावा. त्याच्या अंगी चिकाटी असावी. कष्ट करण्याची धमक आणि आहे त्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्याची उमेद असावी. अशा या सचोटीत असलेले डॉ. श्री. लंकेश्वर हे आरोग्य खात्यात दि. २५ जानेवारी १९७२ रोजी कार्यरत झाले व दि. ३१ मे २००८ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपल्या सतत सेवावृत्तीच्या कार्याने आरोग्य विभागातील गावात, तालुक्यात आणि जिल्ह्यातच काय; पण महाराष्ट्रातल्या आरोग्य अधिकाऱ्यांच्या मनावर आगळा वेगळा ठसा उमटविला. जो जो अधिकारी जेथे असेल तेथून यांच्यामार्फत कामाची पूर्तता करण्यात यशस्वी ठरत. सेवानिवृत्त म्हणजे सेवेतून निवृत्त; पण डॉ. लंकेश्वर यांच्या बाबतीत हे विधान अगदी चुकीचे म्हणता येईल. अजूनही सेवा करण्याची उमेद त्यांच्यात आहे. शिक्षण व आरोग्य खाते हे एकमेकांशी संलग्न आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या आजारपणात मेडिकल अर्थाजनाचे काम तातडीने मिळवून देण्याचे प्रयत्न केले. आर्थिक दृष्ट्या, शारीरिक दृष्ट्या दुर्बल लोकांनाही त्यांनी वेळोवेळी मदत केली. कुटुंबापासून दूर राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सोईच्या दृष्टीने काम मिळवून देऊन दिलासा दिला. हे सर्व करण्यासाठी त्यांना बालपणापून संघर्ष व श्रम करावे लागले. परिस्थितीला सामोरे जाण्याची शक्ती त्यांना उपजतच होती.

"उद्यमेनही सिध्दन्ती कार्यानेनेही मनोरथे।।

न ही सुप्तस्य सिहंस्य प्रविशन्ती मुखे मृगा।।"

या उक्तीप्रमाणे डॉ. लंकेश्वर यांनी उद्योगाने कार्य सिद्ध होते. कार्य केल्याने मनोरथे पूर्ण होतात, पण नुसतं स्वस्थ बसल्याने सिंहाच्या तोंडात आपणहून मृग

प्रवेश करील काय? ह्या गोष्टी त्यांनी इयत्ता ५वीत असतानाच ओळखले होते. मातापित्यांचे छत्र डोक्यावर असूनही जेमतेम गरजा भागविण्याशिवाय ते काही करू शकत नव्हते म्हणून इयत्ता ५वीत असतानाच त्यांनी जगदाळे मामांच्या बोर्डिंगमध्ये ॲडमिशन घेऊन असेल त्या परिस्थितीला सामोरे जाऊन शालेय शिक्षण पूर्ण करण्याचा निश्चय केला. खाणे, रहाणे एवढ्याने त्यावेळी भागत नव्हते. इतरही गरजा डोके वर काढून वेडावत होत्या. जेमतेम शेतीत पिकणाऱ्या पिकांवर आई, वडिल, भाऊ, भाऊजय व तिची मुले अशा वाढत्या परिवाराचे भागवणे अवघड जाई. म्हणून डॉ. उन्हाळा सुट्टी व दिवाळीच्या सुट्टीत मिळेल ती मजुरीची कामे करून वह्या पुस्तके व गणवेशासाठी पैसे जमावित असत. अशा परिस्थितीत इ.११वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.



'उद्योगाचे घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी' असे म्हणतात. तद्वत त्यांना एका महान व्यक्तीने नवीन उभारी देऊन "मलेरिया वर्कर" म्हणून आरोग्य खात्यात काम करण्याची संधी दिली. त्या महान व्यक्ती म्हणजे डॉ. एम. एल. लंकेश्वर होय. दीन-दुबळ्यांची सेवा करणारी हीच ती व्यक्ती. पुढे लग्नाचा विचार करून लग्न झाले. पत्नी ही मी आणलेल्या पिठात तिखट-मीठ मिळवून आणणारी असावी ही इच्छा पूर्ण झाली. सौ. पुष्पा जी. लंकेश्वर यांच्याशी विवाह होऊन त्या प्रा. शिक्षिका म्हणून जि.प.प्रा.शाळा कुटे येथे कार्यरत आहेत. पतीच्या प्रत्येक कार्यात साथ देऊन आजवरचा प्रवास सुखाचा झाला.

आपण मोठ्या हुद्यावर नसलो तरी मुलीला कु. पूनम गोपीनाथ लंकेश्वर या लाडक्या कन्येला त्यांनी MBBS डॉक्टर करण्याचा चंग बांधला व तिच्याकरवी स्वप्नपूर्ती झाली. यांचा मित्रपरिवार खूप विश्वसनीय व त्यांना आपल्या हक्काचे माणूस समजतात. याचे उदा. म्हणून सर्व मित्र त्यांना 'अण्णा' असेच म्हणतात. केव्हाही कोठेही कोणत्याही कामात मदत मिळण्याची शाश्वती मित्रांना अण्णांचीच असते.

आज दि. ३१ मे २००९ रोजी डॉ.जी.बी.लंकेश्वर हे आपल्या ३७ वर्षांच्या कार्यातून रिटायर झाले. मात्र ते रिटायर झाल्याचे कोणालाही खरे वाटत नाही याचे गमक त्यांचे आरोग्यसंपन्न असे व्यक्तिमत्त्व.

# दिवाळी निमित्त हर्षभरीत शुभेच्छा!

## मे. महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन्स

प्रोप्रा.श्रीमती शोभा बम्मान कट्टी

## मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन्स

प्रोप्रा.श्री.व्यंकटेश  बम्मान कट्टी

# दिवाळी निमित्त हर्षभरीत शुभेच्छा!

## मे. जे. बी. कन्स्ट्रक्शन्स

प्रोप्रा. श्री. जावेद बडगुजर

## मे. संदीप हजारे

प्रोप्रा. श्री.संदीप हजारे

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

**मे. महेंद्र ॲन्ड कंपनी**

**मे. अतिश वानखेडे**

**प्रोप्रा. श्री. मनिष शर्मा**

---

*दिवाळी निमित्त हर्षभरीत शुभेच्छा !*

**आकांक्षा कन्स्ट्रक्शन्स**

प्रोप्रा. विवेकानंद कटके

**सिंधूदुर्ग नागरी सहकारी पतपेढी मर्या.**

**अंबरनाथ**

ए विंग, वर्धमान नगर, पहिला मजला, शिवाजी नगर रोड,
वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व)

# राखी

दिलीप कजगांवकर

**नेहाच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्यात. नेहाच्या खांद्यावर थोपटत राज म्हणाला, नेहा ताई, आम्हा आर्मीच्या लोकांचे असेच असते. नेहा ताई मी जातो म्हणत राज जायला निघाला.**

सूर्यनारायणाने धरणी मातेचा निरोप घेतला आणि हळूहळू सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले. आईसाठी औषधे आणायला नेहा दुतर्फा दाट झाडी असलेल्या निर्मनुष्य शॉर्टकटने जात होती. एक तरुण तिचा पाठलाग करत होता, 'तिथेच थांब, पुढे जाऊ नकोस' म्हणून ओरडून सांगत होता. नेहा खूप घाबरली होती, शक्य तितक्या वेगाने पळत होती. नेहाला धाप लागली होती. पाय मुरगळल्याने तिचा वेग मंदावला. पाठलाग करणाऱ्याने वेग वाढवला आणि झडप घालून नेहाला घट्ट पकडले. नेहाने स्वतःची सुटका करून घ्यायचा निष्फळ प्रयत्न केला आणि पुढच्याच क्षणी प्रचंड मोठा आवाज झाला, संपूर्ण धरती हादरली. घाबरून नेहा त्या तरुणाला बिलगली. पाठलाग नेहाचा गैरफायदा घेण्यासाठी नव्हता. तर पेरलेल्या सुरुंगांपासून नेहाचा जीव वाचवण्यासाठी होता. नेहा मनोमनी शरमली. 'ताई इतक्या रात्री या निर्मनुष्य रस्त्यावरून तू एकटी कुठे निघालीस ?' त्या तरुणाने विचारले. आईसाठी औषधे आणायची आहेत. मुख्य रस्ता क्रॉस केला की समोरच मेडिकल स्टोअर्स आहे म्हणून मी या शॉर्टकटने निघाले, नेहाने सांगितले. तू मला प्रिस्क्रीप्शन दे मी पटकन औषधे घेऊन येतो आणि मी येईपर्यंत इथेच थांब. त्या तरुणाने हुकुमतीच्या सुरात सांगितले. दादा डॉक्टरांनी पाच दिवसांची औषधे सांगितली आहेत परंतु माझ्याकडे फक्त तीनशे रुपये आहेत कदाचित यात फक्त दोन किंवा तीन दिवसांचीच औषधे मिळतील. ३०० रुपयांत जेवढी औषधे मिळतील तेवढीच प्लीज आण. नेहाने विनवणीच्या सुरात सांगितले. साधारणतः दहा मिनिटांत तो तरुण औषधे घेऊन आला. दादा किती दिवसांची औषधे मिळालीत ? नेहाने आतुरतेने विचारले. सर्व औषधे मिळालीत आणि एक टॉनिक देखील

मी आणले आहे ते देखील आईंना दे. म्हणजे त्यांना लवकर बरे वाटेल, त्या तरुणाने सांगितले. ताई मी तुला घरी सोडतो, चल असे म्हणत तो तरुण नेहा बरोबर तिच्या घरी पोहोचला. नेहाने स्वयंपाक खोलीत जाऊन औषधांची किंमत बघितली. जवळजवळ ११०० रुपयांची औषधे होती. दादा मी पुढच्या महिन्यात तुझे ८०० रुपये परत करीन, चालेल का? नेहाने विचारले. ताई, बहिणीकडून का कोणी पैसे घेतो, तो तरुण उत्तरला. दादा तू मला इतकी मदत केलीस मी तुला तुझे नांव देखील विचारले नाही. ताई आधी तुझे नांव सांग. "नेहा" हे नांव ऐकून तो पटकन म्हणाला किती गोड नांव आहे. त्याने नेहाला स्वतःचे कार्ड दिले. त्यावर लिहिले होते कॅप्टन राज, इंडियन आर्मी. राज माझी इच्छा आहे तू उद्या माझ्या घरी जेवायला ये. मला आणि आईला खूप बरे वाटेल. नेहा ताई, मला उद्या सकाळीच बॉर्डरवर जायला निघायचे आहे पण एक कर माझ्यासाठी छानसा चहा कर. घरात दूध आणि साखर नव्हते, नेहाला काय करावे ते सुचत नव्हते. नशीबाने नेहाची सुटका केली. बिनसाखरेचा, बिनदुधाचा आणि अगदी कमी पावडर टाकलेला चहा कर ताई, राजने सांगितले. नेहाने केलेला चहा राज मोठ्या आवडीने प्यायला. राज, मला समजत नाही तुझे उपकार मी कसे फेडू? नेहा ताई एक काम कर, दरवर्षी मला राखी पाठवत जा. साधारणतः राखी पौर्णिमेच्या आधी पंधरा दिवस. आमचे पोस्टिंग बदलले तरी या कार्डवरील पत्त्यावर पाठवलेली राखी आमच्या नवीन अॅड्रेसवर पाठवली जाते. नक्की पाठवीन, नेहा गहिवरून



म्हणाली. तुझी राखी मला मिळाली किंवा मिळाली नाही तरी राखी पौर्णिमेच्या पुढच्या आठवड्यात मी तुला पत्र पाठवत जाईन. ज्या वर्षी तुला माझे पत्र येणार नाही त्या वर्षी समज, तुझा हा दादा आता या जगात नाही. नेहाच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. नेहाच्या खांद्यावर थोपटत राज म्हणाला, नेहा ताई, आम्हा आमाच्या आर्मीच्या लोकांचे असेच असते. नेहा ताई मी जातो म्हणत राज जायला निघाला. तेवढ्यात नेहाने राजला आवाज दिला. दादा, अरे 'जातो' म्हणू नकोस ना, 'येतो' असे म्हण. राज तुला उदंड आयुष्य लाभो आणि परमेश्वर माझे आयुष्य देखील .

राजने नेहाच्या ओठांवर बोट ठेवून नेहाला पुढचे शब्द बोलू दिले नाहीत. नेहा ताई येतो मी असे म्हणत राज झपझप निघून गेला मागे किंचितही वळून न पाहता. स्वतःच्या जीवाची तमा न बाळगता तुम्हा आम्हा सर्वांचे डोळ्यांत तेल घालून रक्षण करणाऱ्या इंडियन आर्मीला शतशः प्रणाम.



With best compliments from

# DHRUV FIRE

Equipments LLP

**MR. JAGDISH M. SALUNKHE**

Managing Director

## OUR SERVICES

- SUPPLY, DESIGN AND INSTALLATION
- FIRE HYDRANT SYSTEM
- FIRE PUMPS
- FIRE ALARM SYSTEM
- WET RISERS & DOWN CORNERS
- ASPIRATING SMOKE DETECTION
- CONVENTIONAL SMOKE DETECTION SYSTEM
- VOICE EVACUATION SMOKE DETECTION SYSTEM
- FIRE EXTINGUISHERS
- FIRE AUDIT
- LIASONING AND CONSULTATION
- AUTOMATIC FIRE SPRINKLER SYSTEMS COMMERCIAL & INDUSTRIAL

9769371138 / 9702529000 sales@dhruvfire.in www.dhruvfire.in

RP-28, 1st Flr, Milapnagar, MIDC R Zone, Dombivli (E) 421203

With best compliments from

# Er. Tejas Bharat Pawar

B. E. Civil

Govt. Civil Contractor & Building Material Suppliers

Mob. 9527469616
8237259822
8605478569

At. Koshimbe, Post. Dugad, Tal. Bhiwandi, Dist. Thane Pin- 421302
Email: tejaspawar2208@gmail.com

With best compliments from

# JAIHIND

ROAD BUILDER

With best compliment from

# Monarch Surveyors & engn.

CNLTL

# तिचा बाप

आश्विनी सोपान म्हात्रे

**हक्काचे घर तिच्या वाट्याला देऊन कधीही न बोलणाऱ्या वडिलांनी संपत्तीतील वाटा देऊन तिला हक्काचे घर दिले. खरंच, तिचा बाप लेकी विषयी प्रेम व्यक्त नाही करू शकला.**

अनघाचे लग्न हे अनघाच्या बाबांचे स्वप्न आणि लाडात वाढलेली अनघा, आता मोठी झाली व आता दोनाचे चार करायची वेळ आलेली आहे अशी भावनिक साद त्यांच्या मनाने दिली. अनघाशीही त्याबाबत बोलायचे कसे ? तिला कोणी आवडत असेल का ? का मी ठरवलेल्या मुलाशी अनघा ही हसत लग्न करेन असे विविध प्रश्न वडिलांच्या मनात होते. आज अनघाशी बोलायचे आणि आम्ही तुझ्या तुझ्या लग्नाचा विचार करत आहोत, तुझ्या मनात आहे का कोणी ? असेल तर सांग असे वडिलांचे शब्द ऐकताच अनघाच्या मनात आनंद झाला,नंतर बोलते या विषयावर करत तिने प्रतिक बाबांशी झालेले बोलणे सांगितले, घरी केव्हा येशील ? बाबा, लग्नाविषयी विचारत होते.

उद्या भेटून ठरवूयात का? ठरल्याप्रमाणे भेटही झाली. दोघांच्याही मनात आनंदाला पारावार नव्हता, पण माझं शिक्षण आणि नोकरी अनघा सी.ए करत होती आणि तो बारावी. पण युद्धात आणि प्रेमात सारं माफ असतं म्हणतात, त्याने पुढचे शिक्षण करण्यात रस दाखवला व तिच्या बाबांशी लग्नाची बोलणीसाठी तयारही झाला. अखेर तो दिवस उजाडला आणि प्रतिक आणि अनघा यांनी लग्नाची बोलणी सरू झाली. परजातीत विवाह असल्याने लग्नास अडचणी येणारच. दोघांच्याही घरातून लग्नास विरोध होणार होता, पण दोघांनीही त्या विरोधावर मात करून लग्न केले. लग्न झाले पण त्याच्या आईशी इच्छा मुलगी जातीतील असावी. अनघाच्या वाट्याला नेहमी दुय्यम वागणूक आली. तिला शाब्दिक अवहेलना व जातीतील केली असती तर बरे झाले असते असे शब्द सारखे कानी पडू लागले. एकीकडे, अनघाच्या ही बाबांना प्रतिक आवडला नाही. पण तिच्या हट्टाखातीर त्यांचे लग्न लावून दिले. पण तिच्याशी

अबोला हा कायमच राहिला. सासरी होणारी अवहेलनाही अनघा शांतपणे सहन करू लागली व तिची आई तिला आधार देत होती हे अनघाच्या वडिलांना आवडत नव्हते, मात्र अनघाला एका रात्री तिचा नवरा व सासरच्या माणसांनी बाहेर काढले, तेही भरपावसात ते मात्र अनघाच्या बाबांना पटले नाही. मात्र तिचे लग्न हे तिच्या मनापासून होते, तरी एक हक्काचे घर तिच्या वाट्याला देऊन कधीही न बोलणाऱ्या वडिलांनी संपत्तीतील वाटा देऊन तिला हक्काचे घर दिले. खरंच, तिचा बाप लेकी विषयी प्रेम व्यक्त नाही करू शकला पण लेकीचा निर्णय चुकला तरी तिचा आधार मात्र झाला.

# विनोद

## गणिताचे शिक्षक

मराठीचे शिक्षक म्हणाले सर डब्यात तर काहीच नाही...

गणिताचे शिक्षक : आम्ही भाजीला 'एक्स' मानलं आहे..!

## पैसे पडतील

जोशी : "मी इथले टॉयलेट वापरू का ?"

नेने : "हो, पण पैसे पडतील....!"

जोशी : "नाही पडणार.... बसताना काळजी घेईन....!!"



## जेवण कुठे...

मन्या : डॉक्टर, कालपासून पोटात खूप दुखतंय.

डॉक्टर : तू जेवण कुठे करतोस ?

मन्या : साहेब, रोज हॉटेलात जेवतो.

डॉक्टरः अरे बाबा, रोज हॉटेलमध्ये नको खात जाऊ.


मन्या : ठीक आहे डॉक्टर साहेब, आत्तापासून पार्सल करून घरी आणून खाईन.

## साधारण वर्षभर...

मन्या : ही शाई पाण्याने जाईल ?

मतदान केंद्र अधिकारी : नाही !

मन्या : तेलाने ?



अधिकारी : नाही !

मन्या : साबणाने ?

अधिकारी : नाही !

मन्या : किती दिवस अशीच राहणार ?

अधिकारी : साधारण वर्षभर...

मन्या : मग, माझ्या केसांना लावायला थोडी देता का ?

# With best compliment from

# M.C.CHANDANANI CONST.CO

## REGD.GOVT.CONTRACTORS



OFFICE: A-212, Woodland Complex, New Link Road, Furniture Bazar, Ulhasnagar-3
PLANT: Survery No.35/6, Maharalgaon, Kalyan-Murbad, Post Varap, Kalyan.
Email : mcchandnani@gmail.com

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

# श्री. सदानंद इंटरप्रायसेस

प्रो. प्रा. कुणाल उदावंत



# हराळी

संतराम पाटील

**कोणतीही व्यक्ती आपल्यातून गेली की त्या व्यक्तीची किंमत समाजाला कळते आणि मग लोक त्या व्यक्तीचे मूल्यमापन करतात. आज सुद्धा या ठिकाणी तेच चालू होतं. धनाजिराव डोंगळे यांच्या बद्दल**

दुपारची दोनची वेळ ऑफिसमध्ये जेवणाची सुट्टी झालेली;कामाच्या वेळेतील ही सुट्टी असल्याने टेबलावर सर्वच फाईली आस्त वेस्त आशा पडलेल्या होत्या. नुकताच जेवनाचा डबा  उघडून पहिला घास तोंडात घालून तो चघळायला सुरुवात करून दुसरा भाकरीचा तुकडा मोडून हातात घेतला. तोच ऑफिसमध्ये बाहेरून आलेल्या पण ऑफिसमधे काम करणाऱ्या काही जनात कुजबुज चालू झाली. हळू आवाजात एकमेकांशी काय तर  त्यांच बोलन चालू असल्याने मी जेवणाच्या जागेवरून ऊठून त्यांच्याकडे गेलो. तर मला माझा सहकारी संदीप म्हणाला. "आता आम्हाला दुपारच्या पुढे सुट्टी घ्यावी लागेल."

"का रं"

"कंपनीचे मालक गेले "


"कुठे" मी म्हणालो आणि संदीप दुःखात बुडाल्या सारखा झाला नि बोलायला लागला. कंपनीचे मालक म्हणजे शेखर मालकांचे वडील, त्यानीच ही कंपनी काढली आहे. "ते आमच्यातून कायमचे गेले आहेत. ते आता परत कधीच येणार नाहीत. "

संदीपचे डोळे पाण्याने डबडबले होते. डोळ्याच्या पापण्या ओल्या झाल्या होत्या .आणि तो सतत त्याला आलेला हुंदका गीळत होता. याची जाणीव मला होत होती. पण मी या कंपनीत नवीनच असल्याने; कोण मालक आणि कुणाच योगदान  कंपनीला लाभलंय याची मला माहिती नव्हती. या मुळे मी मात्र अनभिज्ञच होतो .

सगळ्या कामगारांनी जेवण अर्धवट सोडून, मालकाचं शेवटच दर्शन घ्यायचं ठरवून, कंपनी बंद केली आणि कंपनी पासून तेरा किलोमीटर असलेल्या मालकाच्या गावाला जायला निघाले. डोंगळेवाडी हे

मालकांचं दोनशे उंबऱ्यांचं खेडं गाव .या गावात बहुतेक कुटुंब ही डोंगळ्यांची असल्याने या गावाचं नाव डोंगळेवाडी ठेवलं होतं. पण गावात मोठं आणि प्रतिष्ठित घर म्हणजे धनाजिराव डोंगळे यांचे होते आणि हेच धनाजिराव डोंगळे धनराज इंडस्ट्रीजचे मालक होते. त्यानीच ही इंडस्ट्रीज उभी करून शेकडोंना रोजगार उपलब्ध करून दिला होता. हे त्यांचं कार्य अत्यंत उल्लेखनीय असंच होतं म्हणून तर आम्ही सर्वजण कंपनी बंद ठेवून गेलो होतो.

कोणतीही व्यक्ती आपल्यातून गेली की त्या व्यक्तीची किंमत समाजाला कळते आणि मग लोक त्या व्यक्तीचे मूल्यमापन करतात. आज सुद्धा या ठिकाणी तेच चालू होतं. धनाजिराव डोंगळे यांच्या बद्दल काही चांगल्या, काही वाईट गोष्टी होत्या, त्या गोष्टीना उजाळा द्यायचं काम उपस्थित लोक करीत होते. धनाजिरावांच्या बद्दल ज्यांना ज्यांना काही माहिती होतं ते लोक सांगत आणि ज्याना काहीच माहिती नव्हते ते मनपूर्वक ऐकत होते. बराच वेळ हे चालू होते आणि मग सगळं पै पाहुणे मित्र मंडळी आल्याचे एकट्याने प्रेत उचलायचे फिक्स करुन घेतले. इकडे काही जणांनी धनाजिरावांच्या शेवटच्या प्रवासाची तयारी पूर्ण केली होती. पाणी तापवून एका मातीच्या मडक्यात भात शितीसाठी शिजवला होता. तर हाताच्या वावंच्या मापान मेसकाठ्या तोडून शेवटच्या प्रवासाची (तडकी)वाहन तयार करून ठेवले होते. इतक्यात एकच कालवा कालव झाली आणि धनाजिरावांची बॉडी लोक घरातून बाहेर घेऊन आले. ते देवाघरी गेल्याने ज्याना दु:ख झाले ते मोठ्याने आक्रोश करीत होते पण त्या आक्रोशाचा विचार न करता संबधित लोकांनी प्रेत तडकीवर ठेवले आणि स्मशानाकडे मार्गस्थ झाले. प्रेत जिथून उचलले तिथून स्मशान अंदाजे एक किलोमीटर होतं म्हणून काही लोक टूव्हीलर, तर काही जण फोरव्हीलर घेऊन निघाले पण बहुतेक लोक पायीपायी जात होते. आम्ही कंपनीतले सर्व कामगार चालत जाणेच पसंत करून प्रेताच्या पाठोपाठ चालू लागलो. आमच्या सोबत आसलेल्या एका मामाने दुसऱ्या मामाला चालत चालतच विचारलं 'पाव्हणं तुम्हाला कवा कळलं ?'



"हे काय आत्ताच कळलं...नी लगेचच आलोय "

"काय..राव धनाजिराव देव माणूस, गेला हो...आमच्यातून कायमचा!!. आता आम्हाला ह्यो कधीच भेटणार नाही. " पहिला

मामा

"हे बघा पाव्हणं तुम्हा आम्हाला सगळ्यानाच जायाचं हाय. खरं माणूस कसा गेला हे महत्त्वाचं आहे.".

असा खोलात जाऊन ह्या दोघांचा संवाद चालू होता आणि हा संवाद खुलेपणाने चालू आसल्यानं, माझ्यासह अनेकांना ऐकायला मिळत होता. पण इतरांना ही बातचीत कमी अधिक प्रमाणात माहिती होती. पण मी मात्र तिथं नवखाच होतो. माझी कुणालाच ओळख नव्हती म्हणून मी या दोघांची ओळख करून घ्यावी म्हणून सहज त्यांना प्रश्न केला.

"आपण धनाजिरावांच्या जवळचे नातलग आहात काय ?"

"होय, आपण" त्यांनी विचारलं

"मी त्यांच्या कंपनीत कामगार आहे."

"कुण्या गावाचा"

"मी कोल्हापूर मध्ये रहातो. तुमची ओळख सांगितली नाही" असा प्रती प्रश्न मी केला आणि थांबलो, तसा त्या दोघांतली बोलक्या स्वभावाचा आणि वयस्कर असलेला तो साठीकडे झुकलेला मामा बोलला. "मी तुमच्या मालकाचा म्हंजे धनाजिरावांचा आत्ते भाऊ सादबा आणि ह्यो त्यांचा थोरला मेव्हणा दत्ता. तसं आमी दोघं त्येच्या लई जवळच नातलग हावं म्हणूनशान आमी बोलताव बरंका ..." असं बोलत त्यानी उर्वरीत विषयाला हात घातला आणि बोलायला सुरवात केली. "धनाजिरावांची सातवी साळा झालीनी तेनी हे गाव सोडून प्वाट भराया कोल्हापूर गाठलं. तेनी तिथ पडल ते काम केलं. म्हयन्याला पंधरा रुपये पगाराव तेनं चाकरी केली. दुकानातन मीठ आणायचं नि गल्लीतन फिरून इकायचं. दूध ईकत घीवून तेला इरजान लावून दही ताक इकुन,पै पै जमीवलं नी तेची गाठ मारून ठेवून;थोडी जागा घेतली. ज्या मालकाकडं त्यो कामाला हुता त्यो सुद्धा चांगला कुबेर हुता. त्या मालकांन हेला याक जुनं काय म्हणत्यात ते व कसलं ते लेथ मशीन, घीवून दीलं आणि मग त्या एका मशीनावर काम करत करत तेन मायंदाळ पैक मिळीवल गाठीला गाठ मारली. येळला उपाशी सुदीक राहिला. खरं वागानं ईष्टीट मिळवून दावली असा आमचा धना हुता. तेच्या हातात कायम धन हुतं लई मिळीवलंय बहाद्दरानं खरं शेवटाला तेच्या वाट्याला हे दिसं यायला नगं व्हत. बरंच हाल झाल तेच सरते शेवटी पोराबाळानी तेच्या कडं ढुकून सुद्धा बघीटल नाय हेच आमाला वाईट वाटतय." हे त्या दोघांतली चर्चा माझ्या बरोबर इतरांना सुद्धा ऐकायला मिळत होती. पण ती ईतरांना महत्त्वाची वाटत नसावी. म्हणून प्रतेक जन त्याकडे कानाडोळा करून होता; पण ही चर्चा माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. यातून मला शिकण्या सारखं बरंच होत आणि ते मला माझ्या पुढील आयुष्यात मार्गदर्शकही होते.

अलीकडच्या काळात स्मशान भूमीत मयताचा एखादा नातेवाईक ठरल्या वेळी नाही आला तर,तो येईपर्यंत बराच वेळ त्याची वाट पहात तिष्ठत बसायला लोक तयार नसतात. इतका राखीव वेळ आता कुणाकडे नसतो पण अशा वेळी नाईलाज आसल्याने लोक थांबून रहातात. आणि गप्पा गोष्टी मध्ये रंगून जातात काही वेळी ही मंडळी आशा विनोदी गप्पात रंगतात आणि हसतात खिदळतात की, ही माणसं लग्नाला आलेत का ? मयताला आलेत ? आसा प्रश्न पडल्या शिवाय रहात नाही. आजही या पेक्षा वेगळी परिस्थिती इथं नव्हती. कारण धनाजिरावांच्या जवळचा एक नातेवाईक अजून आलेला नव्हता एवढ्यातच धनाजिरावांचा जवळचा नातलग जो आला नव्हता तो आला होता.

आता सर्व कार्यक्रम पूर्ण करून प्रेताला दहण करणेचा सोपस्कर पूर्ण केला आणि लोकांची धावपळ हराटी गोळा करणे साठी चालू झाली. दिवस कडक उन्हाळ्याचे आसल्याने हाराटी नावाचे तण कुणालाच सापडले नाही. मग त्याला पर्याय म्हणून हातात सापडेल त्या गवताच्या काडीला हराटी समजून ती प्रत्येकाने हातात घेतली. जमलेल्या लोकात एक दलीत समाजातील व्यक्ती होती. त्या व्यक्तीचे नाव घेत एकजण मोठ्याने बोलला "आ...रे...ये !हारबा...म्हण बघू हाराटी"

तसं ओठांवर जाळीदार मिशा, डोक्यावर बारका मळकट टॉवेल, पटक्यासारखा गुडाळलेला होता. मळकट शर्ट,नी खालच्या बाजूने काटाळ्या निघालेली पट्यापट्याच्या कापडाची हाफ चड्डी घालून तो उभा राहिलेला हरबा एखादी कविता म्हणावी तसं हराटीचे बोल बोलू लागला. "गाडा नाडा संसार जोडा, पापा पुण्याचा केला निवाडा, आज रोजी बसव्याची शेपुट धरून, धनाजिराव डोंगळे कैलासाला गेला हर हर महादेव ."

ही हराळी इतक्या सुरात त्याने म्हटली की ती एखाद्या कविला सुद्धा जमणार नव्हती. लागलीच उपस्थितानी हातातली हराळी वजा गवत पेटत्या सरणावर टाकले. आणि तिथल्याच एका प्रमुखाने रक्षाविसर्जनाची तारीख वार सांगितला आणि इतक्यात स्मशानभूमीत जमलेले धनाजिरावांचे पाहुणे रावळे आल्या मार्गाने परत फिरले. मी सुद्धा त्यांच्या बरोरीने चालत होतो.पण मला माझे मन काही न पटणाऱ्या गोष्टी मुळे अस्वस्थ करून सोडत होतं .

आयुष्य भर इतकं सुंदर जीवन जगून अपार कष्टातून ज्या धनाजिरावानी हे विश्व निर्माण केले. त्या मधे त्यांच्या किमान दोन पिढ्यांना सुखी जीवन लाभणार होते. मग त्यांचा शेवट असा का झाला आसावा ? असा प्रश्न माझ्या समोर उभा होता आणि तो मला सोडवायचा होता. कोणताही माणूस जन्माला आला की त्याला तीन अवस्थां मधून जीवन

उपभोगायचे असते. या मधे बालपण, तरुणपण, आणि म्हातारपण या त्या अवस्था आहेत. या पैकी बालपण हे आसं आसते की ते सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून असते. हे दुसरे म्हणजे इतर कोणी नाही ते आसतात आपलेच आई, वडील, काका, काकी, मामा, मामी पण कमी आधिक प्रमाणात बालपणीचा काळ काहीना सुखाचा तर काहीना दुखःचा जातो. पण ही आवस्था प्रत्येकाची हसत खेळत जाते . या काळात प्रत्येक माणसाच्या आयुष्याची पायाभरणी होते कला, क्रीडा, शिक्षण, रोजगार अशा पद्धतीने तो स्वयंभू होत असतो, लग्न होते आणि त्याच वेळी तो तारुण्यात पदार्पण करतो. लग्नानंतर मुलं बाळं संसार हेच त्याचे विश्व बनते. पैसा मिळवणे, स्थावर जमा करणे नोकरी किंवा नोकरी करत उदयोग करणे, एकुणच काय आयुष्यभर केवळ पैसाच मिळवायचा एवढं एकच उदीष्ट साध्य करायचे. या वेळी नाती गोती माणुसकीचा फक्त बाजार मांडून माणसावरील प्रेमाचा विसर पडतो.

जगण्यासाठी पैसा की, पैशासाठी जगायचं याचं उत्तर कुणालाच सापडत नाही. माणसं स्वत: भोवती आसं एक स्वार्थी रिंगण मारून उभी असतात.



म्हणून वृद्धापकाळी आयुष्याची संध्याकाळ कशी घालवावी. या चिंतेंत असताना वयाची साठी पूर्ण होते आणि तिसरी अवस्था म्हातारपणाची सुरवात होते.

नेमकं या उतरत्या वयाचा विचारच अंगावर शहारे आणतो. चाळीसी संपली की चाळशी लागते. पन्नासी नंतर सर्वच आयुष्य डॉक्टरच्या मर्जीप्रमाणे चालतं. इंजेक्शन, गोळ्या, सलाईन आणि डॉक्टर हे सर्वजण जिवाभावाचे सोबती होतात. साठीनंतर आजून थोडी भर पडते कॅन्सर,बी.पी शुगर,दमा पॅरलेसेस अशा रोगांचा सहवास लाभतो. आणि सोबतीला सखी सहचरणी आसते ती आपल्या बरोबर सप्तपदी चाललेली, सातजन्माची सोबतीण. ती सुद्धा आपल्या सारखीच म्हातारी झालेली डॉक्टरच्या मर्जीप्रमाणे चालणारी. वयाच्या मानाने जवळ जवळ सर्वच उत्पन्न बंद. आणि जी काही कमवली आसलेली स्थावर, उत्पादनाच्या साधनाची मालकी पुढच्या पिढीकडे हस्तांतरण होते; त्याची विभागणी सुद्धा मुलांच्या मध्ये आपल्या समोर होत आसते आणि आयुष्यात हिमतीने कमवून सुद्धा लाथ मारेन तिथं पाणी काढणारा माणूस एका क्षणात परावलंबी होतो. या आयुष्याच्या

खेळातील खेळ तोच रहातो. आणि खेळाडू मात्र बदलतो म्हणजे पैसा कमविणे , माणुसकी विसरणे स्वतःला पैश्यासाठी विसरून जाऊन आई वडील भाऊ बहीण या नात्यांचा बाजार मांडूनच माणूस जगतो हे वास्तव कोणी नाकारू शकत नाही.


जी संपत्ती आपण मिळवून ठेवलेली असते तिचा पुरेसा उपयोग सुद्धा आपण करू शकत नाही हजार स्क्वेअर फूट आणि दोन तीन मजली बांधलेल्या घरात स्वताला बसायला अखेरच्या क्षणी विश्रांती साठी जागा सुद्धा मिळत नाही. कुठल्या तरी अडगळीत अन्नपाण्यावाचुन कुठल्याही आसऱ्याविना या जगाचा निरोप घ्यावा लागतो. हे धनाजिरावाचे नाही तर तुमचे आमचे सगळ्यांचे दुदैव्य आहे. हे मला असले प्रश्न सतत घेरत होते.

शेवटी उरतो प्रश्न हराळी म्हणणाऱ्या हरबाच्या कवितेचा, त्यानं आपल्या कवितेतून धनाजिरावाना बसव्याची शेपूट धरून कैलासाला पाठवले हे आसं या समाजात कुठे ना कुठेतरी रोजच घडते. आणि त्या ठिकाणी अनेक हरबा आसतात कि मृताला ते कैलासात पाठवत आसतील. मला धनाजिरावांच्या बाबतीत काही उपप्रश्न उपस्थित करायचे नाहीत. कारण त्यानी आयुष्याभर चांगलच नी पुण्याईचंच काम केलं होतं. ते त्यांच्या पुण्याच्या जोरावर कैलासाला जातील. पण एखादा चोर दरोडेखोर खुनी बलात्कारी माणूसही या हराळी मुळे जर कैलासात जात आसेल तर मग कैलासात सर्वानाच प्रवेश विनाशुल्क आहे काय असा प्रश्न नव्याने माझ्या मनात घरकरून रहातोय.कारण या समाजात जेवढी माणसं हे जग सोडून गेली, त्यांनी या जगाचा निरोप घेतला. पण त्यांच्या फोटोला हार घालताना त्यांच्या नावापुढे कैलासवासी असाच शेरा मारलेला दिसतोय या प्रश्नाचा गुंता सोडवत मी धनाजिरावांच्या घरी कधी पोहोचलो हे मला कळलंही नाही ......

## विनोद

बायकोः माझी एकअट आहे!
नवरा : काय?
बायकोः तूम्ही या दिवाळीत सोडायला आले तरच मी माहेरी जाणार?
नवराः माझी पण एक अट आहे?
बायकोः काय?
नवराः मी घ्यायला आलो तरच परत

बंता : तू आरशासमोर बसून का अभ्यास करतोयस.
संताः याचे तीन फायदे आहेत.
१.सोबतच रिव्हिजन होऊन जाते
२.आपल्यावर नजर राहते..
३.आपल्याला अभ्यास करायला एक जन सोबती मिळतो .


With best
compliments from
Sai Siddhanath Construction
(Govt. Regd. Contractor)
Happy
Diwali
Head Office: 602, Damodar Apt., Behind Ashok Talkies, Near Datta Mandir,
Thane (W)-400 602 Office Phone: 8879003120/8108103204/8879003111 |
Fax: 022 25386073 E-mail: saisiddhanath@yahoo.co.in

दिवाली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

# साहिल

# कन्स्ट्रक्शन

## प्रो. प्रा.संतोष चोथे




# हिरे

वैभव धनावडे

> हळूहळू दोन चार पैसे येऊ लागले. मी १० वी ला तिसरा आलो. शिक्षकांनी सायन्सला जाण्याचा सल्ला दिला. परिस्थिती नसल्याने मला लवकरात लवकर नोकरीस लागणे भाग होते.

अमित घरात शिरताच त्याला अश्विनी भांडी आदळत असल्याचा आवाज कानी आला. भांडी वाजत आहेत म्हणजे नक्की काहीतरी झालंय ह्याचा अंदाज त्याला आलाच. बॅग नेहमीच्या जागेवर ठेवून शांतपणे त्याने आवरून घेतले. तोच अश्विनीने चहाचा कप त्याच्या हाती आणून दिला.

"काय म्हणतेय ? कसा गेला दिवस ?" अमितने अश्विनीला विचारले.

"माझ्या मेलीचा कसला आलाय दिवस फिवस ? मला कोण विचारतं ? माझं कोण ऐकतं ? आम्ही घरात असतो आम्हाला काय कळतं जगाचं ? आमचं कोण ऐकणार ?" इतका वेळा भांड्यांवर चिडचिड काढणारी अश्विनी भडाभडा बोलू लागली.

"काय झालं कोण काय बोललं ?" अमितने प्रश्न केला.

"विचारा तुमच्या लाडक्या लेकीला, नुसती लाडावून ठेवली आहात, ना ओरडत, ना काही समजवत तिला . मी सांगायला गेलं की उलटं बोलू लागते. म्हणते तुमच्या वेळी असं नव्हतं.तुला काय समजणार ? तू कुठे बाहेर जातेस ?"

"तू शांत राहायचं, ती लहान आहे ग अजून" अमित पटकन बोलून गेला .

"तुम्ही तिचीच बाजू घ्या, तिला काही बोलू नका. उद्या ती बिघडली तर मला काही बोलू नका" अश्विनीने आपली नाराजी व्यक्त केली.

आजकाल बायको आणि मुली मधील वादाचे प्रमाण हळूहळू वाढत होते हे अमितला लक्षात येऊ लागले होते. लग्नानंतर एक वर्षात त्यांच्या संसार वेलीला फुल लगडले. अमितच्या आवडीनुसार तिचे नाव नीलम ठेवले. 'पहिली बेटी धनाची पेटी' ही युक्ती सार्थक ठरत हळूहळू अमितची भरभराट होऊ लागली होती. नीलम एकुलती असल्याने

जास्त लाडाची होती, विशेषत: अमित तिचे जास्तच लाड करतो असे अश्विनी म्हणत असे. १२ वी पर्यंत शांत आणि गुणी असणारी नीलम आता कॉलेजला गेल्यानंतर मात्र जरा नवीन विश्वाकडे ओढली जात होती. मुंबईतील उच्चभ्रू वस्तीतील मुली बघून सुरवातीला दिपून जाणारी नीलम त्यांच्या सहवासात हळूहळू अभ्यासाकडे दुर्लक्ष करू पाहात होती. आजही ह्याच गोष्टीवरून अश्विनी आणि नीलम मध्ये वाद झाले होते. परीक्षा जवळ येऊन सुद्धा नीलमचे फिरणे कमी होत नव्हते. नको त्या मुलींचा नाद न करता अभ्यासातच लक्ष दे असे अश्विनी बजावून सांगून सुद्धा नीलम ऐकत नव्हती आणि दिवसेंदिवस बेफिकीर होत चालली होती.

"बरं, ती आली की मी बोलतो तिच्याशी" असं बोलून अमितने चहाचा कप खाली ठेवला.

थोड्यावेळात नीलम आली. "बाबा" म्हणत तीने आपली बॅग सोफ्यावर टाकून दिली.

"काय म्हणतेय आमची छकुली ?" अमितने विचारलं.

"बाबा, मी आता मॅथ्स क्लासला जाणारच नाही. माझ्या सगळ्या मैत्रिणी नको म्हणत आहेत" नीलम निक्षून म्हणाली.

"बाळा, आपण आपली मतं बनवायची. त्या म्हणतात म्हणून आपण का ऐकावं ? त्यांना जमत नसेल, जड जात असेल किंवा त्यांना आवड नसेल. पण आपल्याला शिकून मोठं व्हायचं आहे" अमितने तिला समजवायचा प्रयत्न केला.

"शिकून काय मोठं होणार बाबा ? त्या मैत्रिणी मस्त गाड्यांवर फिरतात. पार्लर, मॉल आणि मूवी, हॉटेल मस्त एन्जॉय करतात. तुम्ही मात्र मला एकसारखं अभ्यासाला बसवता. त्यांच्यासारखं मला पण झळकायचं आहे. लोकांनी नुसतं बघत राहिले पाहिजे." नीलमच्या बोलण्यात त्यांच्या बद्दल खूपच अप्रूप दिसून येत होते.

"हेच तर मी पण बोलतोय तुला की तुला झळकायचं आहे. पण ते झळकणं कर्तृत्वाने झळकायचं आहे. अच्छा; मला सांग जेव्हा कॉलेज मधील बाकीची मुलं किंवा मुली त्या मैत्रिणींना बघतात तेव्हा नक्की काय बघतात ?" अमितने तिला प्रश्न केला.

"त्यांचं दिसणं, त्या काय भारी राहतात बाबा" नीलम म्हणाली.

"बेटा, हे भारीपण क्षणिक असतं. ह्या भारी दिसण्याच्या आणि सो कॉल्ड कूल दिसण्याच्या नादात अनेक मुली-मुलं आपलं तारुण्य हरवून बसतात. आपल्या घरच्यांना परवडेल की नाही ह्याचा विचार न करता महागडे फोन्स घेतात ज्याचे emi घरचे झेपत नसतानाही भरत राहतात. तुम्हाला पालक महागडे क्लासेस लावतो कारण तुम्ही शिकावं म्हणून. लॅपटॉप पासून सगळं जे मागता ते

आम्ही देतो कारण तुम्ही भारी व्हावं म्हणून. पण ते भारी बौद्धिक दृष्टिकोनातून, नुसत्या दिसण्यातून नाही" अमित आता हळूहळू मूळ मुद्याला हात घालू लागला होता .

"बाबा पण तुम्ही पण भारीच होतात ना ? मागे तुमचे मित्र घरी आलेले तेव्हा रामदास काका म्हणाले की, तुझा बाप खूप भारी होता नीलम"



नीलमच्या ह्या विधानावर अमित जोराने हसू लागला .

"अगं ते भारी म्हणजे बुद्धीने, कर्तृत्वाने, मेहनतीने. चल आज तुला आपली जुनी गोष्ट सांगतो"

"तुझे आजोबा, आज्जी, मी आणि आत्या काका सगळे मजेत राहत होतो बालपणी. तुझे आजोबा खूप दिलदार होते. त्या काळात लोकांच्या मदतीला धावणे त्यांचा मूळ स्वभाव. खूप अभ्यासू व्यक्तिमत्त्व. त्यांना वाचनाचे प्रचंड वेड. दररोजचे वर्तमानपत्र वाचणे, कोडी सोडविणे त्यांचा छंद. आम्हाला गोष्टीची पुस्तके आणून देऊन वाचून घेत असत. समोरच्यांवर विश्वास टाकणे हा त्यांचा मूळ स्वभाव, त्यांचा पगार झाला की लगेच काही जण पैसे मागून घेत. अगदी विश्वासाने ते शेकडो रुपये सहज देत. सगळं सुरळीत सुरू असताना अचानक काळाने घाव घातला आणि आजोबा ह्या जगातून गेले .

तुझे आजोबा गेल्यानंतर मात्र दिवस कसे काढायचे हा प्रश्न येऊ लागला. ज्यांनी पैसे नेले होते त्यांनी पाठ फिरवली, नातेवाईक सुद्धा दूर राहू लागले. अशावेळी तुझ्या आज्जीने मात्र कंबर कसली. कोणासमोर न झुकता ती जिद्दीने उभी राहिली. आई पापड लाटायला गेल्यार मी काका आणि आत्याला सांभाळू लागलो. तरीही ओढाताण सुरूच होती. कधीकधी रात्रीचे जेवण मिळेल की नाही ह्याची शंका असायची म्हणून मी हातभार लावावा म्हणून पेपर टाकू लागलो. बाबांच्या जुन्या सायकल वरून घरोघर पेपर टाकले.

त्या काळात माझं काम बघून मला काम मिळत गेलं. पेपर टाकल्यावर मग मी शाळेत जाताना काका आणि आत्यालाही सोबत नेई . दिवसभर आई पापड लाटून आल्यावर थकत असे; पण तरीही तिने आमच्या शिक्षणाला पैसा उभा करावा म्हणून हळूहळू जेवणाचे डब्बे देणे सरू केले. शाळेतून

आल्यावर आम्ही तिला जेवण बनवायला मदत करत असू. भाजी चिरून दे, निवडून दे अशी कामे तुझी आत्या करत असे. तर गल्ल्यावर काका बसत असे. डब्बे पोहचवण्याचे काम मी करत असे. सकाळी ४ ला सुरू झालेला दिवस आमचा ११ च्या सुमारास संपत असे. अमित हे सांगता सांगता त्याचे डोळे जणू भूतकाळ समोर उभा करू पाहात होते .

हळूहळू दोन चार पैसे येऊ लागले. मी १० वी ला तिसरा आलो. शिक्षकांनी सायन्सला जाण्याचा सल्ला दिला. पण परिस्थिती नसल्याने मला लवकरात लवकर नोकरीस लागणे भाग होते आणि म्हणून मग मी व्यावसायिक शिक्षण घेण्याचे ठरवेल. त्यात सुद्धा मी अव्वल आलो आणि गोदरेज मध्ये अप्रेन्टिस म्हणून माझी निवड झाली. वाचनाचे, अभ्यासाचे मला वेड आधीपासून असल्याने मी तिकडेही शिकण्याचा प्रयत्न करत होतो. पण सुरवातीच्या काळात मला हवा तसा सूर सापडत नव्हता. माझ्या कामाची सगळ्यांनी तारीफ करावी, मला सर्व यावे ह्यासाठी माझी धडपड सुरू असायची. अनेकदा नको तिकडे हात टाकून वरिष्ठांची बोलणी सुद्धा खावी लागायची. पण त्याने कधी दबलो नाही. माझ्या मतांवर मी ठाम असायचो. नवं नवीन प्रयोग करणे माझी आवड बनली. त्या काळात मला अनेक चांगली माणसे भेटली. पण त्या पेक्षा जास्त वाईटात पाहणारी भेटली. सोबतीची मुले खोटंनाट करीत, माझी कम्प्लेंट करीत. कारण मी त्यांच्या सारखा नव्हतो, त्यांच्या सारखा टाईमपास करायचो नाही. मला मिळणारा वाव बघून त्यांच्या पोटात दुखे. एक दिवस मात्र त्यांचा त्रास सहन न होऊन माझा बांध फुटला आणि मी केबिन मध्ये हमसून हमसून रडू लागलो. इतक्यात बोस नावाचे आमचे साहेब आले, त्यांनी सर्व प्रकार जाणून घेतला. मला एकच प्रश्न केला की "उद्या तुझ्या मुलाला किंवा मुलीला असा कोणी सतावत तर तू रडण्याचा सल्ला देणार की स्ट्राँग होण्याचा?" त्या प्रश्नाने माझं आयुष्यच बदलले. जेव्हा कधी मला नकारात्मता जाणवते तेव्हा मी तो प्रश्न आठवतो.

बघता बघता एक वर्ष सरलं आणि अँप्रेन्टिस संपून आमचा निरोप समारंभ होता. बोस साहेब उभे राहिले आणि त्या वर्षाचं बेस्ट अँप्रेन्टिस म्हणून माझं नाव घोषित केलं. मी उठणार तोच त्यांचा आवाज कानी आला "हा मुलगा हिरा आहे. ह्याला कुठेही टाका हा चमकणारच. ह्याला झाकोळला तरी ह्याचे तेज कमी होणं नाही." त्यांचे हे वाक्य संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला. मी समोर गेलो, नमस्कार केला. "अमित, हिऱ्याला नेहमी खाणीत जन्मावे लागतं, विसरू नकोस. सुरवातीला हिरा जणू कोळसाच असतो. जेव्हा कोळशाचे तापमान १६०० अंश सेल्सिअस असते तेव्हा कार्बनचे अणू इतर ४ अणूंशी

जोडतात आणि त्यानंतर हिरे तयार होतात. त्याला अनेक घाव सोसावे लागतात. तुला काय वाटतं हिरा लगेच तयार होतो का ? विशेष बाब म्हणजे पृथ्वीच्या या भागात असलेल्या अति दाब आणि अति तापमानामुळे या संपूर्ण प्रक्रियेला १ अब्ज ते ३.३ अब्ज वर्षे लागतात. यानंतर कार्बनपासून हिरा तयार होतो. म्हणूनच तुला हिरा म्हणून चमकत राह्यचं असेल तर सतत परिश्रम करावे लागतील. काही घाव सुद्धा सोसावे लागतील" त्यांची ही शिकवण माझं आयुष्य अजून समृद्ध करून गेली .

त्यानंतर मी लगेच दुसऱ्या कंपनीत लागलो, हळूहळू परिस्थिती सुधारत गेली. काका कामाला लागला, आत्याचं लग्न झालं. मग आईला आम्ही सक्तीने आराम करायला लावला. जॉब सोबत माझं पुढील शिक्षण मी बाहेरून सुरूच ठेवलं आणि मग चार वर्षांनंतर आमचं लग्न होऊन तू आलीस. ज्या ज्या गोष्टी मला मिळाल्या नाहीत, ज्या गोष्टी हव्यात असं वाटून सुद्धा मी परिस्थितीने मन मारलं त्या त्या गोष्टी मी तुला कमी पडू दिल्या नाहीत. तू जे मागितलं ते ते तेव्हा देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. माझा सगळं प्रवास रामदास काकाने बघितला आहे म्हणूनच तुला म्हणाला की तुझा बाप भारी आहे."

"बेटा, भारीपण यायला आणि सोसायला खूप मेहनत करावी लागते. दिखाऊ भारीपण कामाचं नाही. आता तू ठरव तुला दिखावू भारी व्हायचं आहे की हिऱ्यासारखं चमकायचं आहे!" असं बोलून अमित थांबला. आजपर्यंत सुखात वाढलेल्या नीलमला ह्या सगळ्या गोष्टींची कल्पनाच नव्हती. आज हात थरथरणारी आज्जी न चुकता आठवड्यातून फोन करणारी आत्या, थोडासा व्यस्तच पण तरीही कौटुंबिक क्षणांसाठी जीव टाकणारा काका ह्यांची कथा ऐकून तिचे डोळे पाणावले. आपण करत असलेल्या चुकीची तिला कल्पना आली .

"अग वेडाबाई, तुला तर स्ट्रॉंग व्हायचंय. तुझं नाव नीलम आहे. नीलम म्हणजे हिरा आणि हिरा जगातील सगळ्या कठीण असलेल्या पदार्थांपेकी एक असतो. आता तू ठरव झालं त्या बद्दल रडायचं की पुन्हा मार्गावर यायचं ?" असं म्हणत अमितने तिला जवळ घेतले. ह्या घटनेला एक आठवडा झाला, आता घरात आल्यावर स्वयंपाकघरातून भांडी



आपटण्याचा आवाज बंद झाला आहे, नीलम नियमित कॉलेज क्लास करत आहे. रोज अश्विनी झोपताना नीलम कशी बदलली ह्याची विचारणा न चुकता अमितशी करते. हिऱ्यासारखं चमकायला नीलम तयार होतेय इतकंच अमित तिला सांगून झोपी जातो .

# टीप्स

## कपड्यांवरील बुरशीचे डाग काढण्यासाठी

तुमच्याही कपड्यांवर ओलाव्यामुळे बुरशीचे डाग लागले असतील तर काळजी करू नका. कारण काही सोप्या टीप्स वापरून तुम्ही घरीच हे डाग काढून टाकू शकता.

### लिंबू आणि मिठाचा करा वापर

स्वच्छतेसाठी लिंबू नेहमीच वरदान ठरतो. कारण लिंबामध्ये क्लिंझिंग इफेक्ट्स असतात. एखादा कठीण डाग काढण्यासाठी तुम्ही लिंबाचा नक्कीच वापर करू शकता. यासाठी लिंबाचा रस आणि मीठ एकत्र करा, फंगस लागलेल्या ठिकाणी लिंबाचे मिश्रण काही वेळ लावून ठेवा. रगडून तो डाग काढा आणि कोमट पाण्याने कापड धुऊन टाका.

### कोमट पाण्यात कपडे धुवा

पावसाळ्यात जर तुम्हाला कपड्यांना फंगसचे डाग लागू नये असं वाटत असेल तर कोमट पाण्याने कपडे धुवा. आजकाल वॉशिंग मशीनमध्येही हे फंक्शन असतं. शिवाय असं केल्याने तुमचे कपडे डिसइंफेक्टदेखील होतात. कारण कोमट पाण्यात जीवजंतू नष्ट होतात.

### बेकिंग सोडा वापरा

फंगसचे डाग कपड्यांवरून काढण्याचा सोपा मार्ग म्हणजे बेकिंग सोडा वापरणे. यासाठी फंगस लागलेल्या डागाकडील भाग भिजवा आणि त्यावर बेकिंग सोडा लावा. अर्ध्या तासाने ते कापड ब्रशने घासून स्वच्छ करा आणि कोमट पाण्यात विसळा.

### बोरेक्स पावडर वापरा

बोरेक्स पावडर हे असं एक केमिकल आहे, ज्यामुळे कपड्यांवरील फंगसचे डाग निघून जातात. यासाठी कपडे धुताना तुमच्या डिटर्जेंटसोबत या पावडरचा वापर करा.

With best compliments from

# One Billion Diagnostics Pvt Ltd

Vidyavihar-Mumbai 400070

---

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!



# जे बी कन्स्ट्रक्शन

## With best compliments from

# KUNAL MARUTI BOMBE

*CIVIL ENGINEER*
*&*
*GOVT. CONTRACTOR*

*Mob: 7887587195*

**Email: kunalb741@gmail.com**
**add: At- Nevare, post- Aghai, Tal- Shahapur, Dist- Thane 421601**



## With best compliments from

# Yuvraj Agencies




# टकली हडळ

संतोष उदमले

**ती बाई साठ वर्षांपूर्वी त्या जुन्या वाड्यात राहायची. ऐन तारूण्यात तिला एक असाध्य रोग जडला आणि ती टकली झाली. तिला कोणीच पसंत करत नव्हते. ती अशीच झुरत झुरत मेली.**

मी आणी सम्या जिगरी दोस्त. आमची दोस्ती म्हणजे अल्ट्रा मॅक्स प्रो होती. पण म्हणतात ना चांगल्या लोकांवर जळणारेही खूप असतात! तसेच आमच्या दोघांवरही जळणारे खूप होते. 'आम्ही दोघेही पक्के चमडी' असे लोकं आमच्यावर दोषारोप करायचे. 'दिसली बाई की काढा छेड' अशी आमची सवय आहे, असे आमच्या मागून नव्हे तर तोंडावरच लोकं म्हणायचे.

पण आमचं एक चांगलं होतं. आम्ही कधीच लोकांना सिरीयसली घेतलं नाही. कारण आम्ही सुशिक्षित होतो आणि नवीन विचारसरणीचे साम्यवादी तरुण होतो. आमच्यावर चांगले संस्कार झाल्यामुळे आम्ही कधीच कुणा स्त्रीत भेदाभेद केला नाही. वर्णभेद,वयभेद किंवा तिच्या दिसण्यावरूनही कधीच भेदभाव केला नाही. मग ती काळी असो वा गोरी. कवळी काकडी असू देत, नाही तर जठर म्हातारी. तिच्या सर्वांग सौंदर्याची तारीफ करणे आम्ही आमचे आद्य कर्तव्य समजत होतो. याला अडाणी लोकं छेड काढणे म्हणायचे.

असो ते, आपण मूळ मुद्यावर येऊ. आता त्याचं कसं झालं. जून महिन्यात मी आणि सम्या रात्री दारू ढोसून साधारण बारा वाजता घरी परतत होतो. जवळच्या पारावर आल्यावर अचानक गार वार सुटला. रीमझीम पाऊस सुरू झाला. रात्रीची वेळ त्यात रोमँटिक मौसम. आम्ही तारूण्याने मुसमुसलेले तरुण गडी. एवढ्या वाऱ्यात गाडी चालवणं जरा धोक्याचंच म्हणून आम्ही थांबायचा विचार केला.

तिथे एक जुना वाडा होता आम्ही तिथे बाईक लाऊन बसलो. आता फक्त रिकामं बसून काय करायचं? नुसतं रिकामं बसणे तारुण्याचा अपमान असतो. त्यामुळे बाईकच्या डिक्कीतून बियरच्या बाटल्या

काढल्या आणी सिगारेट पेटवून घोट घोट मारत बसलो. नाईकाच्या पारूचे, सावंताच्या सखुचे आणी इतरत्र पोरींच्या सौंदर्याची चर्चा करत बसलो.

तितक्यात वाड्या जवळून आम्हाला एक बाई येताना दिसली. तिने पांढरी साडी घातलेली डोक्यावर पूर्ण पदर घेऊन चालली होती. संपूर्ण चेहरा झाकलेला होता. पण तिची सिंहकटी कंबर, भारदस्त अवयव. तिच्या सौंदर्याची ग्वाही देत होते.

ती जवळून एक गाणं गात चालली होती. “मै तो हु जवान औरत. मुझको देख फिरे सबकी नियत.”

मी सम्याला म्हणालो “चल आज रात्रीची सोय झाली”

सम्याने लगेच शिटी वाजवली आणी तिला जवळ बोलवत म्हणाला.

“हाय मेरी जान”

तिनेही लगेच आपले घुंगट वरती केले आणि म्हणाली. “देख मेरा चांद”

ती बया संपूर्ण टकली होती. टकली म्हणजे एकदम साफचटक चमनगोटा, तिचा टक्कल अंधारातही चमचमत होता. तिला डोळे नव्हते. फक्त दोन काळे भुवर वाटावे असे डोळ्यांच्या ठिकाणी खड्डे. तिचा हा अवतार पाहून आमची जरा टरकलीच.



ती आमच्याकडे पाहून विचित्र हसली. इथं आम्ही खूप घाबरलो. बाटल्या चकना घेऊन पळ काढला. (मृत्यू जवळ आला तरी दारूला दगा देणे हे सुसंस्कृत बेवड्यांचे लक्षण नसते.)

आम्ही बाईक स्टार्ट केली आणि तिथून पळ काढला. ती आमच्या मागे चालायला लागली. आम्ही आमची बाईक फुल्ल स्पीडने पळवली. तरीही त्या बाईचा चालण्याचा आणि भरधाव वेगात पळणाऱ्या बाईकचा वेग जवळ जवळ सारखाच होता. बाई आणि बाईक जणू बरोबरच चालत होती.

त्या स्त्रीनो आमच्या घराच्या दारापर्यंत आमचा पाठलाग केला आणि फाटकावर येऊन ती थांबली. घरी येऊन आम्ही आधी पॅन्टी चेंज केल्या. कारण माझी पॅन्ट पुढून ओली झाली होती. तर सम्याची पाठून पिवळी झाली होती. आम्हाला रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही. एकमेकांना घट्ट धरून फक्त झोपायचे सोंग करून गोधडीत लपून होतो.

सकाळी ही गोष्ट पप्पांना सांगितली ते म्हणाले “कार्ट्यांनो हडळी तरी सोडा.”

नंतर आम्ही सकाळी त्या बाईबद्दल आजोबांना विचारले.

ते म्हणाले, "मी सुद्धा त्या बाईला पाहिलं आहे.. ती बाई साठ वर्षांपूर्वी त्या जुन्या वाड्यात राहायची. ऐन तारुण्यात तिला एक असाध्य रोग जडला आणि ती टकली झाली. तिला कोणच पसंत करत नव्हते. ती अशीच झुरत झुरत मेली. बायांची छेड काढणाऱ्या मुलांच्या ती मागावर असते. आपल्यालाही त्यांनी छेडावं आणी पटवावं म्हणून त्यांच्या मागे लागते. आता तुम्ही दोघे तिच्या जाळ्यात अडकला"

त्या नंतर आम्ही कधीच रात्री बाहेर थांबलो नाही. कोणत्याही बाईची छेड काढली नाही.

८

## वास्तुटीप्स

# आपल्या घरात असलेली अडगळ

१)सर्वप्रथम अडगळीची खोली वास्तुशास्त्राला मान्य नाही, आपल्या घरात अडगळ-अडचण असू नये.

२)आपल्या घरातील प्रत्येक वस्तू ही सतत वापरात असली पाहिजे, काही अशा वस्तू आहेत की ते सतत लागत नाही पण त्या आठवड्यातून एकदा तरी वापराव्यात.

३) वस्तू सतत वापरायला पाहिजे कारण ती स्थिर राहिली तर त्याची एनर्जी थांबते व ती थांबली तर त्यावर धूळ साठते. मग तिच्यात फंगस तयार होतात, जेव्हा वस्तूला बुरशी लागते तेव्हा ती सडायला लागते

४)वर्षानुवर्षे वस्तू जपून ठेवू नये, ज्या वस्तूंना आपण १,२,३,४ वर्षे हात लावत नाही त्या वस्तूत निगेटिव्ह एनर्जी तयार होते. मग त्या एनर्जी आपल्याला घातक ठरतात.

५)जर चौरंग असेल तर तो इतर लोकांना वापरायला द्या, सतत त्या वस्तूचा वापर झाला पाहिजे.

टीप्स

# टॉयलेट व बाथरूम

१) आंघोळ करताना चेहरा नेहमी उत्तरेला जाईल असे बसावे.

२) टॉयलेटला गेल्यावर चेहरा उत्तरेला गेला पाहिजे तसा Pot बसवावा.

३) जर उत्तर नाहीच मिळाली तर पूर्व दिशा.

४) टॉयलेट व बाथरूमच्या दरवाजावर नॉर्मल डिझाईन ठेवावी, चित्राचं combination करू नये.

उदा: जर आग्नेयला टॉयलेट आहे तर चित्र जर पाण्याचं लावलं तर अजून भडका होईल, त्याचा त्रास जीवनावर होतो.

५) म्हणून कलर, चित्र कसेही ठेवू नये. टॉयलेट पश्चिम वायव्येला तोंड (कचराकुंडी या भागात) ईशान्येला टॉयलेट नको. उत्तर-पूर्व ला बाथरूम चालेल.

# आपल्या घराची कचराकुंडी

१) दिवसभराचा कचरा जो आहे, तो पश्चिम व वायव्येच्या भागात ठेवावा.

२) कचरा अखंड २४ तास घराबाहेर ठेवावा म्हणजे पश्चिम किंवा वायव्येला पॅकबंद ठेवावा.



३) किचनच्या पश्चिम व वायव्य भागात आपल्या घरातील कचराकुंडी ठेवावी.

४) जर आपल्या घरातील एखादी वस्तू लवकरात लवकर जावी असं एखाद्याला वाटत असेल तर त्याने ती वस्तू संपूर्ण घराच्या वायव्य भागात ठेवावी. म्हणजे ती वस्तू हळूहळू बाहेर जाईल.

# गृहप्रवेश

**प्राजक्ता हेदे**

> आत्याच्या बोलण्याने मालती गप्पच झाली. 'राघव दादा लता वहिनी मला माफ करा. मी चुकले.' असं म्हणत ती त्या दोघांकडे हात जोडून उभी राहिली. त्या दोघांनीही त्यांना मोठ्या मनाने माफ केलं.

इतकी वर्ष आबा काही बोलले नाहीत, म्हणून तुम्ही ह्याच घरात संसार थाटला. भावोजी पण मी हे काही खपवून घेणार नाही. कितीही झालं तरी तुम्ही आबा आणि माईचे वारस नाहीत. कुठून त्या मंदिरातून तुम्हाला उचलून आणलेलं. आबांचा मोठेपणा म्हणून तुमचं शिक्षण पालनपोषण सर्व इथेच झालं. पण आता लग्न झाल्यावर तरी निदान बाहेर पडा. माझ्या नवऱ्याला कोणीही भाऊ नाही. किती दिवसात निघता ? ते आधी सांगा.

अग, शालू तुझ्या जिभेला काही हाड ? किती बोलतेस ? आबा जावून अजून तेरा दिवस पण झाले नाहीत आणि तू राघव दादाला एव्हढं बोलतेस ? आकाश चिडल्यावर मालती गप्प झाली. राघव तसाच शांतपणे स्वतःच्या खोलीत निघून गेला.

रडत रडतच आबाना साद घालू लागला. तुमची आणि माईची सेवा हाच ह्या जीवाचा खरा धर्म होता. आता ह्या घरात राहून काहीच उपयोग नाही.

राघव आबांना गावच्या मारुतीच्या मंदिरात मिळालेला. त्याला कोणी सोडलेला ? कोणाला काहीच माहीत नव्हतं.

राघव तेव्हा जेमतेम ३-४ वर्षांचा असेल. आबा आणि माईना लग्नानंतर ६ वर्षे झाली तरी मूल नव्हतं. मग काय, राघवला घरी आणून त्यांनी त्याला लळा लावला. त्याला स्वतःचं नाव लावल. राघवच्या येण्याने घर अगदी गोकुळ झालेलं.

त्यानंतर एक दोन वर्षांनी आकाशचा जन्म झाला. जणू काही राघवचा पायगुण. म्हणून त्या घरात पाळणा हलला.

तरीही आबा-माईंनी राघवला कधीही अंतर दिले नाही. राघवचे शिक्षण नोकरी सर्व इथेच. पुढे त्याचं लग्नही लता बरोबर झालं.

आकाश सुद्धा राघव दादाला कधीही अंतर देत नव्हता. लता सुद्धा त्या घरात रुळलेली.

पण माई गेली तेव्हा आकाशचं लग्न झालं. मालती घरात आली, तेव्हा ती राघव आणि लताचा तिरस्कार करू लागली. पण आबां समोर तिचं काही चालत नव्हतं.

आबा गेले आणि सर्व संपलं.

असे काय बसला आहात? लताच्या बोलण्याने राघव भानावर आला.



उद्या आबांचं कार्य आहे. आपण ठरल्याप्रमाणे उद्याच बाहेर पडू. लताच्या बोलण्यावर होकारार्थी मान हलवत राघव निमूटपणाने स्वतःच सामान आवरू लागला.

आजची सकाळ वेगळीच होती, आबांचे कार्य पार पडले.

आलेली सर्व पाहुणी मंडळी निघू लागली.

राघव आणि लता सुद्धा स्वतःचं सामान घेऊन बाहेर पडले.

"राघव दादा, वहिनी.....थांबा मला असं पोरकं करून जावू नका." आकाश अगदी हात जोडून त्यांना विनवण्या करत होता.

राघवने आकाशला मिठी मारली, आता माझे इथले कर्तव्य संपले म्हणून आमचे इथून जाणेच योग्य आहे. निघतो आम्ही.

आकाश भावोजी स्वतःला जपा, वेळेत खात पित-जा. माईंनी तुमची जबाबदारी मला दिलेली, पण आता तुमची काळजी करणार आहे. त्यामुळे आम्ही निघतो.

लताच्या बोलण्याने आकाश अधिकच रडू लागला. मालती मात्र खोटं सोंग करून पदर डोळ्याला लावून होती.

राघव आणि लता निघाले खरे, पण आता जाणार कुठे?

राघवची नोकरी होती पण घर नाही. जोपर्यंत काही होत नाही तोपर्यंत मंदिरात रात्र काढू असं ठरलं.

हळूहळू पूर्ण गावात ही बातमी पसरली.

आबांची एक चुलत बहीण त्याच गावात राहत होती. तिला हे सर्व कळलं. तशी ती राघव थांबलेल्या मंदिरात गेली.

आत्या, तुम्ही इथे? पाया पडते.

काय रे हे राघवा? काल पण काही बोलला नाहीस. आम्ही सर्व निघाल्यावर तू पण बाहेर पडलास?

राघवने झाला प्रकार सर्व आत्याला सांगितला.

असं व्हय, त्या मालेचे नखरे कमी नाही आहेत. काल लता होती, म्हणून दादाचं कार्य नीट झालं.

चला, उचला ते सामान आणि चला माझ्या सोबत.

आत्या नको, आम्ही करू काहीतरी सोय. राघवच्या बोलण्याने आत्या चिडली. "अरे, वेडा आहेस का ? आबांच्या ह्या सुनेला असं उघड्यावर घेऊन राहणार ?"

तसे निमूटपणे ते दोघे आत्याच्या घरी आले. आत्याने झालेला सर्व प्रकार स्वतःच्या दोन्ही मुलांना आणि सुनांना सांगितला. सर्वांनी 'राघव दादा तू इथेच रहा' म्हणून त्याला विनवल.



राघव आणि लताला ते पटत नव्हतं, हे आत्याने ओळखलं. निदान आज तरी रहा, मग बघू काय ते.

एक खोली त्या दोघांना दिली. फ्रेश होऊन रात्रीची जेवणं झाली. सर्व निद्रा देवीच्या अधीन होण्यास आपापल्या खोलीत गेले.

दुसऱ्या दिवशी आत्या तडक आबांच्या वाड्यात गेली. अहो आत्या, या या. थांबा पाणी आणते.

ए माले, तुझा पाहुणचार माझ्या दादाच्या वाड्यात नको मला. आकाश कुठे आहे ? बोलव त्याला.

आत्याच्या आवाजाने आकाश बाहेर आला. आत्या....

मेली तुझी आत्या, काय रे दादाची जाण्याची वाट बघत होतास का ? दादाला हे सर्व माहित होत होणार ते, म्हणूनच त्याने मला लक्ष ठेव सांगितलेलं.

अहो आत्या, तुमचा गैरसमज होतो आहे. मालतीच्या बोलण्यावर आत्या अजूनच गरजली.

ए माले, तुझ थोबाड बंद ठेव, तुमचे सर्व गैरसमज मी आज दूर करते. वकील साहेबांना बोलवलं आहे मी. ते दादाच मृत्यूपत्र वाचतील तेव्हा बघू.

आत्याच्या सांगण्याने राघव आणि लता देखील आले.

मृत्यूपत्र वकील वाचू लागले.

मी आबा बाबाजी धुमाळे. माझे मृत्यूपत्र इथे लिहीत आहे.

मी माझे राहत घर माझा मोठा मुलगा (पुतण्या) ह्या घराचा खरा वारस राघव तात्या धुमाळे आणि माझा धाकटा मुलगा आकाश बाबा धुमाळे ह्यांच्या मध्ये समान वाटप करत आहे. तसेच शेताची वाटणी हीसमान हिश्यात

होणार. माझ्या मृत्यू पत्राप्रमाणे जर का कोणाला हे पटत नसेल तर त्यांच्यासाठी वाट मोकळी आहे.

राघव हा ह्या घराचाच वारस आहे. राघव जेव्हा मला मंदिरात सापडला तेव्हा त्याच्या शर्ट मध्ये एक चिठ्ठी होती.

माझा सर्वात धाकटा भाऊ 'तात्या' ह्याचा राघव हा मुलगा.

तात्याचं बाजूच्या गावातील एका मुलीवर प्रेम होत. वडील आणि काकांच्या धाकाने त्याने पळून जाऊन लग्न केलं. पण पुढे बाळंतीण होऊन त्याची पत्नी वारली. तात्याला पुन्हा घरी येणे शक्य नव्हते, म्हणून मग त्याने राघवचा दोन-तीन वर्ष कसाबसा सांभाळ करून नंतर त्याला मंदिरात सोडले. तात्याचा एक मित्र त्याने हे सर्व मला सांगितले. घरात तेव्हा फक्त माईला हे सर्व सांगून मी राघवला उचलून आणले. पुढे तात्यानेही स्वतःचे प्राण सोडले.

घरी राघव अनाथ आहे असं सांगून आम्ही उभयतांनी त्याचा सांभाळ केला.

माईंच्या निधनानंतर मालती आली, पण मालती राघव आणि लताचा तिरस्कर करायची, म्हणून मग ह्याच गावात राहणाऱ्या माझ्या चुलत बहिणीला शामाला सारं सांगणं भाग पडलं.

आपला आबा.

काय मग ? माले, कळलं का ?

आता तूच ठरव तू इथे राहणार की नाही ?

आत्याच्या बोलण्याने मालती गप्पच झाली. राघव दादा, लता वहिनी मला माफ करा. मी चुकले. असं म्हणत ती त्या दोघांकडे हात जोडून उभी राहिली

त्या दोघांनीही त्यांना मोठ्या मनाने माफ केलं.

काय मग ? राहणार ना आता गुण्या गोविंदाने ?

'हो आत्या' म्हणत आकाश आणि राघव आत्याला बिलगले.

चला आता आत.

थांबा.....मालती सर्वांना थांबवून आत गेली.

एक तांदूळ भरून माप दारात ठेवलं. राघव दादा वहिनी, 'माप ओलांडून आत या. आज खऱ्या अर्थाने तुमचा आपल्या घरात गृहप्रवेश होऊ दे.'

सर्वांनी टाळ्या वाजवून त्या दोघांचा "गृहप्रवेश" केला.



## टीप्स

● घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे.

● दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे.

● घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .

● आठवड्यांतून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे. यामुळे घरामध्ये सुख समृद्धी राहते.

● मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे.

● मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .

● लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशेमध्ये झोपू नये त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात.

● घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे.

● घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .

● ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात

● नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा

● मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे.

● उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा- बायकोंनी दोन जोडलेल्या बेडवर झोपू नये.

● नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे.

● आरोग्यदायी जीवनासाठी घरामध्ये पिवळा, काळा , लाल हे रंग कोठेही येऊ देऊ नये.

● घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैऋत्य दिशेला बोअरिंग, विहीर पाण्याची टाकी बांधू नये.

# फळ खाणं बेस्टच

ऋतुमानानुसार बाजारात येणारी फळं फक्त उत्तम आरोग्यच नव्हे, तर सौंदर्यवर्धकही असतात. तसंच ही फळं तुमचं सौंदर्य फुलवण्यास मदत करतात. फळं जशी आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात, तसंच ती सौंदर्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहेत.

**कैरी :** हल्ली कैऱ्या बाजारात दिसायला लागल्यात. आता त्या थोड्या महाग असल्या तरी त्या तुमची त्वचा मुलायम आणि कांतिमान बनवण्यास मदत करणाऱ्या आहेत. एक कैरी उकळवून त्याचा गर चेहरा, गळा, मानेवर चोळा, आणि वाळल्यावर धुवा.

**संत्री :** संत्र्याची साल उन्हात वाळवून वस्त्रगाळ पूड करून ती दुधात कालवा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. तेलकट त्वचेस याचा फायदा  होईल. चेहऱ्याचा रंग उजळण्यास मदत होईल.



**काकडी :** त्वचा ब्लीच करण्यासाठी याचा रस चेहऱ्यावर चोळावा किंवा चेहऱ्यावर फोडी ठेवा. पंधरा मिनिटांनी चेहरा धुवा..

**डाळिंब :** पिकलेल्या डाळिंबाचे दाणे चेहऱ्यावर दररोज चोळा. त्वचेचा रंग हलका आणि गुलाबी होण्यास मदत होईल. ओठांवरूनही त्याचा रस फिरवा, ओठांचा रंग सुधारेल. चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी डाळिंबाची साल कच्च्या दुधात वाटा आणि ती पेस्ट चेहरा, मानेवर लावा, सुकल्यावर  धुवा.

# त्याचे वेगळेपण

निलेश बामणे

काही दिवसांपूर्वी विजयची आत्या त्याच्या घरी तिच्या डोळ्याचे ऑपरेशन झाल्यामुळे काही दिवस राहायला आलेली होती. विजयला त्याची ही आत्या फारच भावते.

मनुष्याचा स्वार्थी स्वभाव काही आजचा नाही तो प्रत्येक युगात स्पष्टणे दिसत आलेला आहे, अगदी रामायण, महाभारत ते सध्याच्या कलियुगापर्यंत. कधी-कधी तर असे वाटते की, माणूस हा मुळातच एक स्वार्थी प्राणी आहे. इतर प्राण्यांत तो स्वार्थीपणा दिसत नाही, कारण ते निसर्गाच्या अधीन आहेत. पण माणूस हा असा प्राणी आहे ज्याने नेहमीच निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न लाखो वर्षांपूर्वीही केला आहे आणि आजही करत आहे! त्याची आज अनेक उदाहरणे समाजात दिसत आहेत. त्यातील सर्वांत मोठी कुरघोडी म्हणजे लिंगबदल शस्त्रक्रिया... त्याचे समर्थन करताना काही महाभाग महाभारतातील श्रीखंडीचे उदाहरण देतात. पण त्यांना हे कळत नाही की, श्रींखडीनी स्त्रीची पुरुष तिच्यात पुरुषाच्या लैंगिक भावना होत्या म्हणून झाली नव्हती, तर आपला बदला घेण्यासाठी झालेली होती. समाजात आज जो लैंगिक स्वैराचार बोकाळला आहे त्याचे समर्थन आणि विरोधही आजचा समाज आपल्या सोयीप्रमाणे करताना दिसत आहे! म्हणजे एकीकडे मोकळ्या लैंगिक संबंधांचे समर्थन करायचे आणि दुसरीकडे बलात्काऱ्यांना फाशी द्या म्हणून आंदोलने करायची! समाजात अनैतिकता पसरविण्यास खतपाणी घालायचे आणि दुसरीकडे समजाकडून नैतिकतेची अपेक्षाही करायची! एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचे गोडवे गायचे आणि दुसरीकडे पुरुषांकडून स्त्रियांच्या प्रती चांगुलपणाची अपेक्षा करायची. नात्यांचेही तसेच आहे. मनुष्य त्याच्या प्रत्येक नात्यांतून त्याला काहीतरी त्याच्या फायद्याचे मिळावे असा स्वार्थी विचार करत असतो. ह्याला कोणतेही नाते दुर्दैवाने अपवाद नाही! याचा अनुभव विजयला अगदी लहानपणापासून आलेला होता. आजही येत आहे. पण यालाही कोणीतरी अपवाद असेल

असे विजयला नेहमी  वाटत होते. पण आता त्याला कळून चुकले होते याला कोणीही अपवाद नाही. अगदी तो स्वतःही! कारण कधी ना कधी त्यालाही त्याच्यासाठी स्वतःसाठी एखादा स्वार्थी विचार हा करावाच लागणार होता. हा! तो  जगापेक्षा वेगळा आहे. जगापेक्षा वेगळा विचार करतो, पण जग त्याच्यासारखे अजिबात नाही! त्याच्यासारखा निःस्वार्थ विचार करत नाही. तसा निःस्वार्थ विचार करणारे तुकाराम महाराजांसारखे लोक संत म्हणून गणले गेले जे शेकडो वर्षांनंतर करोडो लोकांमध्ये एखादे जन्माला येतात.

काही दिवसांपूर्वी विजयची आत्या त्याच्या घरी तिच्या डोळ्याचे ऑपरेशन झाल्यामुळे काही दिवस राहायला आलेली होती. विजयला त्याची ही आत्या फारच भावते, कारण तीही विजयसारखी कोणाच्या आयुष्यात फारशी ढवळाढवळ करत नाही आणि कोणाला आपल्या आयुष्यात ढवळाढवळ करू देत नाही. विजयच्या नात्यातील सर्वच त्याला त्याच्या लग्न न करण्याबद्दल विचारतात; पण ती आत्या कधीच काही विचारत नाही. ती अतिशय विचारी, शांत आणि वास्तववादी विचार करणारी स्त्री आहे. तीही विजयसारखीच कधीच कोणाकडून कसलीच अपेक्षा ठेवत नाही. नात्यात फार गुंतून पडत नाही. ती पूर्वीपासूनच गावी राहात असल्यामुळे तिचे मुंबईला येणे फारच कमी होते. विजय त्याच्या त्या आत्याच्या गावच्या घरी त्याच्या वयाच्या चाळीशीत पहिल्यांदा गेला होता. आत्ताही तिचे मुंबईला येणे डोळ्यांच्या ऑपरेशनच्या निमित्ताने झाले होते. विजयला खरेतर कौटुंबिक संपत्ती, मालमत्ता, जमीन जुमला, झाडे- माडे, बंगले, गाड्या आणि दागदागिने या विषयांवर चर्चा करायला अजिबात आवडत नाही. कारण त्याला या सर्व गोष्टींचा मोह कधीच नव्हता. पण आज समाजात तुमच्याकडे असलेल्या ज्ञानापेक्षा, चांगुलपणापेक्षा  समाजाप्रती तुमच्या असणाऱ्या उदारमतवादी विचारांपेक्षा तुमच्याकडे असलेल्या संपत्तीवरून समाजातील तुमची पत दुर्दैवाने ठरते. ह्याचे विजयला नेहमीच वाईट वाटत असते, पण हे बदलणे आता कोणाच्याच हातात राहिलेले नाही याची खात्री त्याला तेंव्हा पटली जेंव्हा त्याचे त्याच्या काकाबाबतचे मत बदलेल, माणूस मुळातच स्वभावतः स्वार्थीप्राणी आहे पण तो इतकाही स्वार्थी होऊ शकतो याची त्याला नव्याने खात्री पटली. त्याबद्दल तो त्याच्या काकाला दोष देत नाही. तो त्याच्या स्वार्थी मनुष्यस्वभावाप्रमाणेच वागला होता. तसे वागणारा तो काही पहिला माणूस नव्हता. पण विजयच्या आयुष्यात असणाऱ्या स्वार्थी माणसांमध्ये आणखी एका माणसाची भर पडलेली होती. जी त्याला अपेक्षित नव्हती.

विजय नेहमीसारखा एकटाच बसून बेडरुममध्ये मोबाईलवर काहीबाई पाहण्यात गुंग

होता. विजयचे कान जन्मताच तीक्ष्ण आहेत. त्यामुळे हॉलमध्ये सुरू असलेला कोणाचाही संवाद त्याला बेडरुममध्ये अगदी स्पष्ट ऐकू येत होता. एकाच वेळी अनेक गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याची त्याला निसर्गतः देणगी लाभलेली आहे. तो कोणाच्या संवादात भाग घेत नाही, मध्ये बोलत नाही. पण लोकांच्यात चाललेला संवाद कान देऊन ऐकण्याची मात्र त्याला सवय आहे, कारण तो त्याचा अभ्यासाचा भाग आहे, असो! विजयची आत्या गावावरून आल्यामुळे विजयचे आई-वडील त्याचा लहान भाऊ यांच्यात गावच्या घर, जमीन यावर संवाद सुरू होता. तेंव्हा विजयला यापूर्वी माहीत नसलेली त्याला कोणीही न सांगितलेली एक गोष्ट नव्याने कळली. ती म्हणजे त्याच्या काकाने जो त्याच्या गावी राहतो आणि गावातील जमीनजुमला सांभाळतो. जो त्याचा आणि विजयच्या वडिलांचा वडिलोपार्जित आहे. विजयचे वडील वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षीच कामाच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर मुंबईत राहण्याची सोय नसल्यामुळे त्यांनी अनेक हॉटेलांत काम केले. पुढे लग्न झाल्यावर अनेक छोटे-मोठे व्यावसाय करत भाड्याच्या घरात दिवस काढले चार मुलांचा जन्म झाल्यावर त्यांनी मुंबईत एक जागा विकत घेतली जिचे पैसेही त्यांनी हप्त्या- हप्त्याने दिले. त्या जागेत एक कुडाची झोपडी बांधली. पुढे ती झोपडी क्रमाक्रमाने सुधारली. त्या झोपडीचे पक्के घर करण्यासाठी त्याच्या आईने तिचे मंगळसूत्रही गहाण ठेवले, जे पुढे कधी सोडवताही आले नाही. त्या घरात विजयच्या कुटुंबाने चटणी-भाकर खाऊन दिवस काढले. पण विजयच्या त्या काकाकडे कधी गावच्या उत्पन्नातील हिस्सा मागितला नाही; की कधी त्याने तो दिला नाही, ना त्याच्या डोक्यात गावची जमीन विकण्याचा विचार कधी आला. त्याच्या लग्नात विजयच्या बाबांनी काढलेले पतपेढीचे कर्ज पुढे बऱ्याच वर्षांनी विजयने काम करून फेडले होते. पण विजय कधीच त्याबद्दल एका वाक्याने कोणाला काही बोलला नव्हता. त्याच्या मुलांनाही विजयच्या बाबांनी त्यांच्या घरात त्यांची लग्ने होईपर्यंत आसरा दिला. विजयच्या बाबांनी आणि लहान भावाने त्याच्याकडून कमीत कमी आर्थिक मदत घेऊन गावाला मोठे घर बांधले. त्यातील अर्धा हिस्साही त्याच्या नावावर करून दिला. त्याला वेळोवेळी आर्थिक मदत केली असतानाही त्या कृतघ्न माणसाने विजयच्या बाबांनी आता तो गावच्या जमिनीत शेती करत नसल्यामुळे पुढे जमिनीच्या हिस्स्यावरून वाद होऊ नये म्हणून जमिनीची वाटणी करून घेऊ या असे म्हटल्यावर त्याने त्याच्या ओळखीच्या एका वकीलाकडे त्याला विजयच्या बाबांच्या मुंबईतील घरात हिस्सा मागता येईल का? म्हणून चौकशी केली. कारण विजयचे घर आता एस. आर. ए. मध्ये गेल्यामुळे त्याला एका टॉवरमध्ये फ्लॅट मिळालेला होता. ज्याचे

With best compliments from

# Mayur

## Construction

**Prop- Balkrishna Thakre**
**Sandip Thakre**

## दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !

# ज्ञानदीप मजूर संस्था



बाजार मूल्य आज लाखो रुपयांमध्ये होते. पण ते घर टिकविण्यासाठी विजयच्या कुटुंबाने प्रसंगी पोटालाही चिमटा काढलेला होता. अनेक हाल–अपेष्टा सहन केल्या होत्या. त्या घरा व्यतिरिक्त त्यांना दुसरे घरही विकत घेता आलेले नव्हते. त्या विरुद्ध त्याच्या काकाने गावात राहूनही सुखाचेच आयुष्य व्यतीत केलेले होते. चाळीस वर्षे गावात राहून जमीन असतानाही साधी एक बागही फुलवणे त्याला जमले नव्हते, की जमिनीचा स्वतःच्या मालकीचा एक तुकडाही विकत घ्यायला जमले नव्हते. आता गावतील सर्व जमीन जुमलाही त्याला त्याच्या नावावर करून हवा होता. म्हणजे विजयच्या कुटुंबाने त्यांच्याच गावात उपरे व्हायचे होते का ? पण आपल्या भावाच्या घराची किंमत आज लाखो रुपयात आहे हे कळल्यावर त्याच्यातील स्वार्थी प्राणी कोणताही सारासार विचार न करता एका क्षणात जागा झाला. त्याच्या भावाने त्याने चाळीस वर्षे सांभाळून घेतले हे तो अगदी सहज विसरला. तेही त्या गोष्टीच्या मोहात जी त्याची कधीच नव्हती. विजयला व्यक्तीशः गावच्या संपत्तीत अजिबात रस नव्हता. पण गावाला आपले आपले गाव म्हणून हक्काचे आपल्या मालकीचे काहीतरी आपली ओळख सांगणारे असायलाच हवे! असे नेहमी वाटायचे! तो इतका उदारमतवादी होता की, आपण लावलेल्या झाडाची फळे आपल्या नाही खाता आली तरी चालेल, पण ती इतर कोणाला तरी खाता यावीत. पण विजयच्या या काकाने अनेक मोठमोठी फळझाडे काही पैशासाठी विकून खाल्ली. आजही स्वतः न लावलेल्या झाडांची फळे तो खात आहे. विजयला गावातील फळझाडांतून मिळणाऱ्या उत्पन्नात त्या फळात ती खाण्यात अजिबात रस नाही, कारण विजयचा जसा त्याच्या भावभावनांवर ताबा आहे तसाच ताबा त्याच्या भौतिक गरजांवर आणि तोंडावरही आहे. त्याचा काका काहीही जगावेगळा वागलेला नसला तरी तो आता त्याच्या मनातून कायमचा उतरलेला होता. माणूस क्षणिक स्वार्थासाठी कधी कधी आपले किती मोठे नुकसान करून घेतो हे त्याच्या लक्षातही येत नाही. आता विजय त्याला कोणतीही मदत डोळे झाकून करणार नव्हता. त्याच्या कोणत्याही कृतीचे समर्थन सहज करणार नव्हता. त्याचे वागणे हे अज्ञानीपणाचे आणि मोहाधीन असले तरी विजय त्याला माफ करणार नव्हता. नव्हे अशा चुकांसाठी विजयने त्याच्या आयुष्यात कधीच कोणालाही माफ केलेले नव्हते. इतके वर्षे तो त्याच्या काकाचा मान राखून त्याच्या चुकीच्या गोष्टींच्या विरोधातही बोलत नव्हता. तो त्याचा स्वभाव नसतानाही! पण आता तो त्याच्या बाबतीत तसे काही करणार नव्हता. आता त्याला इतके दिवस विजयचा त्याने कधीही न पाहिलेला स्वभाव त्याला पाहावा लागणार होता. विजय प्रचंड हुशार असतानाही! तो त्याची ती हुशारी त्याच्या वडिलधाऱ्या

व्यक्तींसमोर कधीही प्रकट करत नाही. कारण त्याला त्याच्या वडिलधाऱ्या व्यक्तींचा अपमान करायचा नसतो. त्यामुळे तो त्यांच्याशी संवाद करणे अथवा वाद घालणे टाळत असतो. ज्याचा त्याच्या काकाने चुकीचा अर्थ घेतलेला आहे. त्याला नेहमी वाटत आले की, विजयला गावचे काही कळत नाही. पण तो त्याचा गोड गैरसमज आहे. तसेही विजयच्याही मालकीचे असे काहीच नाही. त्यालाही भविष्यात जे काही मिळणार आहे ते त्याच्या वडिलोपार्जित संपत्तीतूनच! त्याने तर त्याचे आयुष्य समाजाचा विचार करण्यात घालविलेले होते. पण सध्याच्या परिस्थितीत आपल्याकडील सगळेच गमावून बसणे हे गाढवपणाचे ठरते. कारण या जगात निःस्वार्थी माणसे फक्त नावाला उरलेली आहेत. कोणाचा स्वार्थ कधी जागृत होईल काही सांगता येत नाही. त्यामुळे याबाबतीत प्रत्येकाने सावध असणे आज गरजेचे झालेले आहे. विजयचाही त्याच्या कुटुंबातील व्यक्तींवर कितीही विश्वास असला तरी त्याला त्याच्या भविष्यातील उदरनिर्वाहाबाबत कोणावर अवलंबून राहणे अथवा त्या बाबतीत तडजोड करणे धोकादायक वाटू लागलेले आहे. एका अर्थी त्याच्या काकाच्या वागण्यातून त्याने एक नवीन बोधच घेतलेला होता. कोणत्याही माणसाने कोणत्याही नात्याच्या प्रती इतकाही उदारपणा दाखवू नये की, भविष्यात त्यालाच दुसऱ्यासमोर हात पसरण्याची वेळ यावी!

विजयच्या बाबांनी जर गावच्या जमिनीवरचा हक्क सोडला असता तर विजयला हक्काने एक तरी झाड लावता आले असते का? तर नाही. विजयच्या काकाने आयुष्यभर एकही नवीन झाड या स्वार्थी विचाराने लावले नाही की, भविष्यात त्याला त्या झाडांचा हिस्सा आपल्या भावाला द्यावा लागेल. पण विजयला तो स्वार्थी विचार करायचाच नाही. त्याला अशी झाडे लावायची आहेत ज्याची फळे भविष्यात समाजाला चाखता येतील! आपण लावलेल्या झाडांची फळे आपल्याला खायला नाही मिळाली तरी ती भविष्यात कोणाला तरी खायला मिळतील असा निःस्वार्थी विचार जो फक्त संतच करू शकतात तो विचार तो करू पाहत होता. तो विचार प्रत्येकाने केला असता तर जगात किती आनंदी आनंद असता! पण तो दिवस कदाचित या जगात कधीच उजाडणार नाही. विजयला त्याच्या आयुष्यात निदान दोन-चार झाडे तरी लावायची आहेत, ज्याची फळे भविष्यात कोणालातरी खाता येतील. विजयच्या काकाकडे विजयच्या रूपात त्याला भविष्यात फळ देणारे एक झाड होते, पण ते झाड त्याने त्याच्या स्वार्थपिणामुळे मुळापासून तोडले होते! स्वार्थीपणा हा माणसात निसर्गतः आहे त्यामुळे तो कधी ना कधी उफाळून येणारच. पण त्याला बुद्धीपूर्वक आवर घालायला माणसाने शिकायला हवे! असे विजयला नेहमीच वाटत आले. त्यामुळेच त्याने कोणाला

केलेल्या मदतीचा कधी हिशोब ठेवला नाही! पण त्याने केलेल्या मदतीची ज्याला जाण नाही त्याला त्याने कधी माफही केले नाही... विजयच्या आयुष्यात स्वार्थी माणसे कालही सातत्याने येत होती. आजही सातत्याने येत असतात.

तरीही तो मात्र आपला निःस्वार्थीपणा सोडत नाही कारण त्याला त्याचे वेगळेपण कायमच टिकवून ठेवायचे आहे...या स्वार्थी जगात...

# आयुष्याचे बदलते रंग

हे आयुष्य आहे त्यामुळे ते रंग बदलतच राहणार...कधी सुखाच्या, तर कधी दुःखाच्या धाग्यात गुरफटत पुढे होणारे अनेक रंगांशी परिचय करुन देत, कधी ओठांवर हसू तर, कधी रडू आणणारे हे तुमचे-आमचे आयुष्य काळानुसार रंग बदलत पुढे चालले आहे...

कधी मनासारखे कधी मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टी फक्त कवीमनांवर फारशा घाव करत नाहीत...कारण मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टींत कवी शब्दांचे पांघरूण ओढून घेऊन यमक जुळविण्यात व्यस्त असतो...ते शब्दांतून रेखाटून त्याचे ओझे कमी करतो....लिहिण्यासाठी काहीतरी विषयच जणू मिळाल्यासारखे...

कवी मन आयुष्याने बदललेले ते सारे रंग एका वहीत अशाप्रकारे उतरवू इच्छितो, की कालांतराने ते त्याच्या भावी पुस्तकाचे नाव ठरते....

आयुष्य बदलते रंग परंतु हे काहींना पेलवते, तर काहींना नाही..... परिस्थिती बदलत नाही तेव्हा मनस्थिती बदलावी लागते...पण सर्वांनाच हे शक्य नसते....काही कठोर मनाचे, तर काही कमजोर, खूपच भावनिक....

आयुष्याने रंग बदलले ती एक परीक्षा समजून त्यात पास व्हायचे धाडस फार कमी लोक करतात....काहींना ती परीक्षाच मान्य नसते....

'आयुष्य बदलते रंग' तेही मनाने स्वीकारावे लागते..... बदललेल्या परिस्थितीत फक्त मनाला गुंतवावे लागते....एकदाच असते आयुष्य, त्यामुळे तडजोड तर करावी लागते... आयुष्य बदलते रंग फक्त मनाने हसत स्वीकारावे ...

**- निशा खरात**

# रि-युनियन

एक दीर्घकथा

नेहा उजाळे

**आता ग्रुपमध्ये भाग्यश्री आणि प्रतिकच्या लेकाच्या लग्नाची उत्सुकता निर्माण झाली होती. मुळात सगळ्यांना आकर्षण होते ते भाग्यश्रीच्या फॉरेनर सुनेचे. त्यामुळे ग्रुपमधील बरीच मंडळी...**

नमस्कार वाचकहो! 'रि-युनियन' ही एक काल्पनिक कथा आहे. या कथेमध्ये आयुष्याची पन्नास वर्षे उलटून गेलेल्या शाळेच्या मित्रमैत्रिणींचा व्हाट्सएप ग्रुप तयार केला गेला आहे. त्या ग्रुपचा रि-युनियनचा कार्यक्रम करायचा आहे. ह्या कथेत केवळ रि-युनियन दाखवले जाणार नाही तर काही व्यक्तिरेखांचे आयुष्य, त्यांचे विचार, नवीन पिढीचा आधुनिक वैचारिक दृष्टिकोन, तसेच सामाजिक विषय मी मांडले आहेत. ही प्रेरणादायी कथा तुम्हाला नक्कीच आवडेल.

"अरे निल्या! मला शुभांगी आणि राजश्रीचा नंबर मिळाला. अरे त्या रे राजश्री कुबल आणि शुभांगी पाटील. त्या नाही का स्कॉलर मुली. खूप भाव खायच्या. मुलांशी तर अजिबात बोलायच्या नाहीत आणि हुशार मुलींशीच बोलायच्या." संतोष उत्साहाने बोलत होता.


संतोषचे बोलणे मध्येच तोडत निलेशने विचारले, "त्या शुभांगी आणि राजश्रीचा नंबर तुला कसा मिळाला रे?"

"अरे तेचं तर तुला सांगत होतो. ती आपल्या वर्गातली शुभांगी माहिती आहे ना? ती मला काल भेटली दादर स्टेशनला. ती शुभांगी पण किती आखडू होती ना? काल एकदम माझ्यासमोर आली. मी तिला बघून विचार करत होतो की, ही खूप ओळखीची वाटते आहे तर तिनेच मला स्वत:हून विचारले की, तू संतोष राणे ना? आणि चक्क माझ्याशी पंधरा मिनिटे तरी बोलली असेल.

आपल्याला वाटलेलं की ह्या स्कॉलर मुली त्यांच्या आयुष्यात खूप पुढे गेल्या असतील. डॉक्टर, इंजिनीअर झाल्या असतील; पण शुभांगी बँकेत नोकरी करते आणि राजश्री जिने शाळेत पहिला नंबर कधीचं चुकवला नव्हता ती चक्क नोकरी देखील करत नाही! गृहिणीपद सांभाळते. मी शुभांगीला

आपल्या शाळेच्या व्हाट्सएप ग्रुपबद्दल सांगितले तर शुभांगीने दिला तिचा स्वतःचा आणि राजश्रीचा नंबर. नंतर राजश्रीला मी फोन करून विचारले की, आम्ही लोकं असा असा शाळेचा ग्रुप बनवतो आहोत तर तुला त्या ग्रुपमध्ये ऍड केले तर चालेल ना ? तर ती लगेच 'हो' म्हणाली. मी तुला त्या दोघींचा नंबर पाठवतो त्यांना ऍड कर ग्रुपमध्ये."

"आयला! कमालच आहे. त्या भावखाऊ मुली तुझ्याशी बोलल्या म्हणजे आश्चर्यच आहे. हो रे मला पण वाटलेलं की, ह्या मुली पुढे जाऊन खूप शिकतील. ते जाऊदे, शाळेतल्या मित्रांचा कॉन्टॅक्ट लगेच मिळतो आहे



ह्या सोशल मीडियामुळे पण मुलींना शोधायचे म्हणजे अवघडचं. एकतर त्यांचे लग्नानंतर नाव पण बदललेले असते. ठीक आहे बघू या. तरी मला आत्तापर्यंत नव्वद जणांचे कॉन्टॅक्ट नंबर मिळाले आहेत. मी आता ग्रुप तयार करतो. अजून कोणी कोणाच्या कॉन्टॅक्ट मध्ये असतील तर मिळत जातील इतरांचे फोन नंबर." निलेश म्हणाला.

निलेशने शाळेतल्या मित्र – मैत्रिणींचा ग्रुप तयार केला. ग्रुपचं नाव ठेवलं 'टिळक विद्यामंदिर १९६८ – १९८०'

जसा ग्रुप तयार झाला तसा ग्रुपमधील मित्र – मैत्रिणींमध्ये एक वेगळाच जोश आला. आपल्या ओळखीचं, आपलं खास कोणी ह्या ग्रुपमध्ये दिसते आहे का ते जो तो पाहू लागला. शाळेशी नाळ तुटल्यावर डायरेक्ट २०१६ ला म्हणजे तब्बल छत्तीस वर्षांनी हे मित्रमैत्रिणी एकमेकांच्या संपर्कात आले होते. ते सुद्धा निलेश कर्वे या उत्साही व्यक्तीमुळे. शाळा सोडताना तेव्हा कोणाकडेही लँडलाईन फोन नव्हते. मोबाईल तर जन्मालाच आला नव्हता.

निलेशने किती लोकांना शोधून शोधून ग्रुप बनवला होता आणि त्याला साथ लाभली होती संतोष राणे आणि संदीप सोनवणे यांची. त्या दोघांनी देखील आपल्या संपर्कात असलेल्या लोकांचे फोन नंबर निलेशला फॉरवर्ड केले.

२०१६ ला सगळ्यांनी पन्नाशी पार केली होती पण इतक्या वर्षांनी आपल्या व्हाट्सएपच्या ग्रुपमध्ये आपल्या मित्रमैत्रिणींना पाहून सगळेच्या सगळे पंचवीशीतले वाटू लागले. शाळेतल्या मुली ग्रुपवर चिवचिवू लागल्या. तरी अजून खूप मुलींचे कॉन्टॅक्ट नंबर मिळाले नव्हते. आता ग्रुपमध्ये ज्या मुली ऍड झाल्या होत्या त्यांच्यामुळे अजून दहा मुलींचे नंबर ऍड झाले

आणि ग्रुपमधल्या मुलांमुळे वीस मुलांचे नंबर ॲड झाले. आता ग्रुप मधल्या लोकांची संख्या १२० वर पोहोचली.

रोजच्या रोज न चुकता गुड मॉर्निंग, गुड नाईटचे असंख्य मेसेजेस ग्रुपवर पडू लागले. सगळ्यांची गॅलरी फुल्ल होऊन! जायची पण करणार काय? सगळ्यांच्याचं उत्साहाला उधाण आले होते.

रोज ग्रुपवर शाळेतल्या आठवणी निघायच्या. आता एकमेकांना भेटण्याचे वेध सगळ्यांना लागले होते. ॲडमिन निलेशचे म्हणणे होते की, आपल्या ग्रुपमधील सदस्यांची संख्या दीडशे ते दोनशे झाल्यावर आपण रियुनिअन करू या. त्यामुळे सगळे मित्रमैत्रिणी सध्या फक्त चॅट आणि मेसेजेसमध्ये आपली दुधाची तहान ताकावर भागवत होते.

"तुम्हा लोकांना ते गणिताचे सावंत सर आठवतात का ? आपण किती त्रास द्यायचो ना त्यांना." सरोज चिवचिवली.

"हो, आम्ही ते वर्गात यायच्या आधी 'गोंद्या आला रे' अशी आरोळी ठोकायचो." विवेक बोलला.

"हो, ते वाक्य चापेकर बंधूंच्या जीवनावरील पिक्चरमधले. २२ जून १८९७. ते खूपचं फेमस झालं होतं ना तेव्हा 'गोंद्या आला रे' अजूनही हसू येतं आठवलं की आणि ते त्यातलं गाणं 'सीताबाईला चाफेकळीला पहिलं न्हाण आलं.' त्या गाण्याचा अर्थ कळत पण नव्हता तेव्हा." ह्या वाक्यापुढे सरोजने भरपूर हसण्याच्या स्माईली टाकल्या.

"अग! आम्हा मुलांना पण त्या गाण्याचा अर्थ माहीत नव्हता तरी ते गाणं आम्ही मोठमोठ्यांदा घरात, बिल्डिंगच्या कॉमन गॅलरीत बोलत असू तर तेव्हा आमच्या घरातली मोठी लोकं आम्हाला हे गाणं गाऊ नका म्हणून ओरडायची. तेव्हा आम्हाला वाटायचं ही मोठी माणसे आम्हाला का ओरडतात? नंतर जेव्हा त्या गाण्याचा अर्थ समजला तेव्हा खूप हसू आले होते." विवेक बोलला.

"हो रे! तेव्हा आपले आईवडील आपल्याशी आत्ताच्या मुलांबरोबर आपण जसे बोलतो तसे फ्री बोलत नव्हते ना! किती बावळट होतो रे आपण. तुला माहिती आहे विवेक? तेव्हा मुलगा आणि मुलगी एकमेकांशी बोलले तरी असं वाटायचं की ह्याचं काहीतरी चालू आहे. किती तो वेडेपणा होता? आणि आपली मुलं बघ ना त्यांचे मित्रमैत्रिणी एकमेकांना भेटले की मिठ्या मारतात, एकमेकांच्या खांद्यावर हात-डोके ठेवतात, तासनतास बोलत राहतात. त्यांना या गोष्टींचं अवडंबर वाटत नाही." सरोज बोलली.

सरोज आणि विवेकच्या ह्या चॅटिंगवर मग एकामागोमाग एक असे ग्रुपवर चॅट पडू लागले. शुभांगी, राजश्री, मेधा, रेखा, राखी, योगिता, सीमा, उज्वला, अंजली, स्मिता,

स्वाती, ललिता, प्रिया, वैदेही, शिल्पा, भावना, वंदना, दीपाली, रुपाली, वीणा, राधा, दीप्ती, ज्योती, तृप्ती, माधुरी, निलेश, मनोज, सुहास, उमेश, महेश, राजेश, सुनील, संदीप, प्रसाद, स्वप्नील, चैतन्य, पंकज, सचिन, सुबोध, प्रकाश, जीवन अशा अनेकांनी मग त्या दोघांच्या चॅटच्या विषयावर चर्चा केली. जणू काही जुन्या आठवणींना उजाळाच मिळाला होता. त्यात भरीसभर म्हणून नवीन पिढीची मते मांडली गेली. मग नवीन पिढीकडून आपण काय शिकलो त्याची चर्चा झाली.

आता मित्रांसोबत कुठलेही विषय बोलायला मुली लाजत नव्हत्या, कारण त्या परिपक्व स्त्रिया झाल्या होत्या. अगदी रात्रीच्या अकरा वाजेपर्यंत 'गोंद्या आला रे' हा एकच विषय जास्त चघळला गेला.

शेवटी ॲडमिन निलेश म्हणाला, "पोरांनो! आता झोपा लवकर. नाहीतर खरोखरच गोंद्या येईल हो. आणि बीपी, शुगरच्या गोळ्या कोणाला लागल्या असतील त्यांनी आठवणीने गोळ्या घ्या. नाहीतर उत्साहात तुमच्याकडून कुठल्या गोळ्या घेतल्या गेल्या नसतील. एक आठवण करून देतो शेवटी ॲडमिन म्हणून मला तुम्हा सर्वांची काळजी घ्यावीच लागेल."

"आईशपथ! बरं झालं निलेश आठवण करून दिलीस. ह्या चॅटिंगच्या नावाखाली मी बीपीची गोळी घ्यायला विसरले होते बघ." तृप्ती म्हणाली.

"ए तृप्ती! लगेच गोळी घे नाहीतर तुझ्यामुळे तुझ्या नवऱ्याचा पण बीपी वाढेल." सुहास चेष्टेने म्हणाला.

"नवऱ्याचा बीपी वाढायला नवरा जिवंत हवा ना? गेल्या वर्षी हार्ट अटॅक येऊन गेला तो." तृप्ती म्हणाली.

तृप्तीच्या वाक्यावर सुहास तिला लगेच सॉरी बोलला. लगेच तृप्तीच्या काळजीपोटी ग्रुपवर धडाधड मेसेज आले. सगळेजण तृप्तीसाठी हळहळले. काहीजणींनी ताबडतोब तृप्तीला फोन देखील केले.

तृप्तीने ग्रुपवर मेसेज टाकला.

"फ्रेंड्स! मी आता आपल्या ह्या ग्रुपमुळे बरीच सावरले आहे. दिनेश गेल्यावर जीवनात खूप पोकळी निर्माण झाली होती. मुलं मुलांच्या व्यापात. काय करावे ते सुचत नव्हते; पण दोन महिन्यांपूर्वी आपला ग्रुप तयार झाला आणि मला एक संजीवनी मिळाल्यासारखी वाटली. आपल्या ग्रुपमुळे माझा वेळ जाऊ लागला. मी आनंदी राहू लागले. मला जगण्यासाठी एक उमेद मिळाली. तुम्हा सर्वांचे त्याबद्दल खूप खूप आभार."

तृप्तीच्या मेसेजने सगळ्यांनी तृप्तीच्या वाक्यावर थम्पसअपचे आणि पुष्पगुच्छाचे ईमोजी टाकले. ज्याला त्याला तृप्तीबद्दल रुखरुख निर्माण झाली पण तृप्ती आपल्या ग्रुपमुळे सावरली असल्याने प्रत्येकाच्या मनात

समाधान होते. ग्रुपमध्ये पुन्हा खंडीभर गुड नाईटचे मेसेज बरसले आणि सगळे झोपी गेले.

रि-युनियन ( भाग २ )

रात्री झोपताना ऍडमिन निलेशने दुसऱ्या दिवशी तृप्तीच्या घरी जाण्याचे ठरविले. त्याच्याबरोबर जाण्यास त्याची बायको, दोन-चार मैत्रिणी आणि चार-पाच मित्र तयार झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी निलेशने तृप्तीला फोन केला आणि संध्याकाळी तिच्या घरी आम्ही काही मित्रमंडळी येणार आहोत असे सांगितले.

ठरल्याप्रमाणे तृप्तीच्या घरी दहा-बारा मित्रमंडळी गेले. सगळ्यांनी तिच्या घरी जाताना काही ना काही खाऊ नेला होता. तृप्तीने सगळ्यांचे स्वागत केले. हॉलच्या समोरच्या भिंतीवर दिनेशचा फोटो लावलेला होता.

तृप्तीने सगळ्यांसाठी समोसे मागवले होते. समोस्याची प्लेट आणि चहा तिने टीपॉयवर मांडले. तृप्तीचे घर अतिशय सुंदर होते आणि तिने ठेवलेही होते नीटनेटके. तिची दोन्ही मुले आज लौकर आली होती. तृप्तीने मुलांची ओळख आपल्या मित्रमैत्रिणींना करून दिली. तिच्या मुलांनी देखील त्यांच्या गप्पांमध्ये भाग घेतला.

"माझ्या तन्वीचं लग्न आहे बरं का दोन महिन्यांनी. सगळ्यांच्या घरी जाऊन मला आमंत्रण देण्यास जमणार नाही आणि तसंही आम्ही घरच्या देवाला आणि देवळात ठेवायला मोजून पाच पत्रिका छापणार आहोत. आमंत्रणाच्या पत्रिकांचा फोटो आणि व्हिडिओ व्हाट्सएपच्या, इमेलच्या माध्यमामार्फत आम्ही नातेवाईकांना, मित्रमंडळींना पाठवणार आहोत. आम्हाला ह्या नवीन पिढीचे विचार पटले की, पत्रिका नंतर रद्दीतचं जातात. तर पत्रिकांचा उगाचं वायफळ खर्च का करायचा? तन्वीच्या सासरचे लोकं खूप पुढारलेल्या विचारांचे आहेत." तृप्ती म्हणाली.

"अरे वाह! खूप छान विचार आहेत. आपल्या ग्रुपवर लग्नाची पत्रिका टाक. ज्यांना यायला जमेल ते नक्कीच येतील." वंदना म्हणाली.

"आणि काहीही, कुठलीही मदत लागली तर आम्हाला सांग. संकोच करू नकोस. आता तन्वीच्या लग्नाला मामा, मावश्या भरपूर आहेत कामे करायला." निलेश म्हणाला.

जवळपास पाऊण - एक तास बसून सगळेजण तृप्तीच्या घरी "अरे निलेश! तू तृप्तीला विचारून घे काही आर्थिक मदत हवी आहे का? आपण ग्रुपमधून करू पैशांची सोय." संतोष म्हणाला.

"हो! माझ्याही डोक्यात तेचं होतं. मी फोन करून उद्या विचारेन तिला." निलेश म्हणाला.

दुसऱ्या दिवशी निलेशने तृप्तीला काही आर्थिक मदत हवी आहे का असे विचारले असता तृप्ती म्हणाली,

“तुम्ही सगळ्यांनी विचारल्याबद्दल तुमचे खूप आभार. आर्थिक मदत सध्या तरी नको आहे निलेश. तन्वीच्या सासरच्यांनी मला सांगितले आहे की, तुम्ही जास्त कुठलाही खर्च करायचा नाही. ह्यांनी माझ्या नावाने व्यवस्थित प्रॉपर्टी ठेवली आहे त्यामुळे पैशांची नड नाही. मुलगी आणि जावई व्यवस्थित कमावतात. त्या दोघांनी आटोपशीर लग्न करायचे ठरवले आहे. सगळं आहे निलेश, पण माझा माणूस आता माझ्याजवळ नाही. ठीक आहे जे आलं आहे पुढ्यात त्याला आता हसतखेळत सामोरं जायचं आहे.”

“बरं! ठीक आहे तृप्ती. काहीही मदत लागली तरी हक्काने सांग.” निलेश म्हणाला.

निलेशने ग्रुपवर मेसेज टाकला,

“आपल्या ग्रुपचं रि-युनियन करायचं आहे पण आता तृप्तीच्या लेकीचं लग्न अगदी दोन महिन्यांवर आले आहे त्यामुळे तन्वीच्या लग्नानंतर आपण आपल्या रि-युनियनचा कार्यक्रम आखू या आणि अजून कोण कोण बिछडे हुए लोकं आपल्या ग्रुपमध्ये ॲड होऊ शकतात ते पाहू या. जास्तीत जास्त लोकं असली की रियुनिअन करण्यात मजा येईल. तुम्हाला सर्वांना माझा विचार पटला ना?”

सगळ्यांनी निलेशच्या मेसेजवर होकारार्थी प्रतिसाद दर्शवला.

संध्याकाळी भाग्यश्री आणि प्रतीक दोघे अमेरिकेला राहणारे असलेले नवराबायको ग्रुपमध्ये ॲड झाले. भाग्यश्री आणि प्रतिकचे एकमेकांवर शाळेत असताना नववी इयत्तेपासून प्रेम होते. त्या दोघांनी त्यांचे प्रेम दहा वर्षे सुंदररित्या टिकवले होते आणि त्यांच्या प्रेमाचे रूपांतर लग्नात झाले होते. लग्नानंतर एक – दोन वर्षे मुंबईत राहून ते दोघे अमेरिकेला निघून गेले आणि तिथेच स्थायिक झाले. राजीव शेळकेमुळे त्या दोघांचा शोध लागला होता. भाग्यश्रीला ग्रुपमध्ये तिच्या ओळखीच्या मैत्रिणी दिसल्यावर अतिशय आनंद झाला. लगेच ती उत्साहाने चिवचिवायला लागली. तिने सुनीता आणि अहानाचा नंबर निलेशला दिला आणि त्यांना देखील ग्रुपमध्ये ॲड करायला सांगितले.

सुनीता आणि अहाना अमेरिकेतचं राहत होत्या. अहानाने तिथे जाऊन आर्किटेक्चरची पदवी घेतली होती. सुनीता सोशलवर्कचे काम पहायची. भाग्यश्री, सुनीता आणि अहाना अमेरिकेत एकमेकींच्या जवळ असल्याने संपर्कात होत्या.

भाग्यश्री अतिशय सुगरण असल्याने तिने अमेरिकेमध्ये इंडियन फूडचे टिफिन चालू केले होते. केवळ भारतीयचं नव्हे तर परदेशी लोकं देखील तिच्या इंडियन फूडची मागणी करायचे. विशेष म्हणजे भाग्यश्रीच्या मऊसूत पुरणपोळ्या आणि अळूवड्यांना विशेष

मागणी असायची. भाग्यश्रीने सणासुदींना वेगवेगळे पदार्थ केले असता त्यांची देखील हातोहात विक्री व्हायची. प्रतीक एका नामांकित कंपनीत नोकरी करायचा. खरंतर देवाच्या कृपेने भाग्यश्रीला कुठलीही कमतरता नव्हती पण तिचा वेळ जावा आणि इंडियन फूड परदेशवासीयांना चाखता यावे यासाठी तिने आपल्या सुगरणतेचा फायदा करून घेतला होता.

आता ग्रुपमध्ये एक सोडून चार परदेशात वास्तव करणारे लोकं ऍड झाली असल्याने रात्रीपर्यंत अमेरिकेच्या गप्पा रंगल्या होत्या. त्या चौघांनी सगळ्यांना

अमेरिकेत येण्याचे आमंत्रण दिले आणि कधी भारतात आल्यावर मित्रमैत्रिणींना भेटण्याचे आश्वासन दिले.

भाग्यश्रीने चॅटिंग करताना शाळेतल्या इनामदार सरांची आठवण काढली तसे सगळ्यांचे डोळे पाणावले. इनामदार सरांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले होते. इनामदार सर होतेच तसे कडक शिस्तीचे पण अतिशय प्रेमळ. मुलांमध्ये खूप आवडते.

भाग्यश्रीने सरांची आठवण काढली तेव्हा सगळ्यांना आठवली शाळेची सहल. एके वर्षी शाळेची सहल वज्रेश्वरीला गेली असता सहलीवरून परतताना सरांनी सहलीला गेलेल्या मुलांना, शिक्षकांना आपल्या राहत्या घरी वसईला नेले होते. तेव्हा संध्याकाळचे चार वाजले होते. त्याकाळी फोन नसल्याने सर त्यांच्या घरी काही कळवू शकले नाही आणि आयत्यावेळी मुलांना आणि शिक्षकांना असे सगळे मिळून शंभर ते दीडशे जणांसाठी त्यांनी त्यांच्या बायकोला पिठलं – भात करायला लावला होता. त्या माउलीने त्यांच्या जावेला, नणंदेला हाताशी धरून इतक्या जणांचे पिठलं – भात अवघ्या अर्ध्या ते पाऊण तासात रांधले होते. पटापट अंगणात सतरंज्या घातल्या गेल्या. पत्रावळीवर चुलीवरचे जेवण वाढले गेले आणि सगळ्यांनी मिटक्या मारत ते खाल्ले होते. त्या जेवणाची चव अजूनही प्रत्येकाच्या जिभेवर होती.

सर इतक्या लांबून शाळेत येतात ह्याचे सगळ्यांना अप्रूप वाटत होते. तेव्हा तर रेल्वे, बस यांच्या जास्त सोयी नव्हत्या. सरांना शेतातून चालत स्टेशनपर्यंत जायला लागायचे. सरांनी आपल्या घरी इतक्या जणांना प्रेमाने नेले, त्यांना जेऊ घातले त्यासाठी सगळे शिक्षक सरांचे कौतुक करत होते कारण त्यावेळी सरांना किती कमी पगार असेल पण त्यांचे मन किती मोठे होते त्याचा सर्वांनाचं प्रत्ययचं आला होता.

भाग्यश्रीने सरांची आठवण काढली म्हणून सगळ्यांनाच सरांची तीव्रतेने आठवण आली. सरांचे निधन झाले आहे असे समजल्यावर भाग्यश्रीला खूप वाईट वाटले. भाग्यश्रीला ग्रुपवर किती बोलू आणि किती नाही असे झाले होते पण तिच्याकडे जरी सकाळ असली तरी भारतात रात्र झाली होती

त्यामुळे ग्रुपमधील एक एक करत सगळे झोपी गेले आणि भाग्यश्री दुसऱ्या दिवशीची वाट पाहत राहिली.

सकाळ झाली आणि नेहमीप्रमाणे निलेशने व्हाट्सएप चेक केले असता भास्करने शशांक गद्रे आणि नीलिमा (पूर्वाश्रमीची नीलिमा वैद्य ) ह्या जोडप्याचा नंबर ग्रुपमध्ये ॲड करायला पाठवला आणि त्यांची जुजबी माहिती सांगितली ती म्हणजे शशांक आणि नीलिमा डॉक्टर झाले आहेत आणि ते एका आदिवासी पाड्यात राहून आदिवासी लोकांची सेवा करतात. आदिवासी भागात कुठली आली इंटरनेटची सोय त्यामुळे त्या भागातून बाहेर पडल्यावरचं त्या दोघांना इंटरनेट मिळत असे. भास्करने दोन महिन्यांपूर्वी शशांकला फेसबुकवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. शशांकने रात्री भास्करचा मेसेज बघितल्यामुळे त्याने सकाळी भास्करशी संपर्क साधला आणि त्याला स्वत:चा आणि निलिमाचा फोन नंबर दिला.

दुसरे जोडपे आता ग्रुपमध्ये ॲड झाले होते. शशांक आणि निलिमा खरंतर एकाचं शाळेत, एकाचं वर्गात असले तरी ते दोघे मेडिकल कॉलेजमध्ये गेल्यावर एकमेकांच्या प्रेमात पडले. दोघेही डॉक्टर होऊन जिथे वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही तिथे जाऊन ते दोघे आपल्या डॉक्टरी पेशाचा उपयोग करणार होते. दोघांचेही एकचं स्वप्न आणि दोघांचेही बरेचसे विचार जुळत असल्याने साहजिकच दोघांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि लग्न करून एका आदिवासी भागात ते दोघे राहू लागले होते. पूर्णपणे त्या दोघांनी आदिवासी बांधवांची सेवा करण्यात स्वत:ला वाहून घेतले होते.

ग्रुपमध्ये सगळ्यांनी शशांक आणि निलिमाचे स्वागत केले आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

होता होता आता तन्वीचे लग्न अगदी आठवड्यावर आले होते. ग्रुपमध्ये पण दिवसागणिक कोणाची ना कोणाची भर पडत होती. तृप्तीने ग्रुपवर लेकीच्या लग्नाच्या पत्रिकेचा व्हिडिओ टाकला. तृप्तीने आदल्या दिवशीपासून हळदीच्या कार्यक्रमासाठी सगळ्यांना आमंत्रण दिले होते. लगेच ग्रुपमधल्या महिला मंडळाचा उत्साह वाढला. कुठली साडी नेसायची, कुठले दागिने घालायचे याचे मनातल्या मनात मनसुबे रचले गेले.

रि-युनियन( भाग ३ )

तन्वीच्या हळदीला नाही म्हटलं तरी पस्तीस लोकांचा ग्रुप गेला. ग्रुपमधेचं ठरवलं गेलं की, हळदीला अर्ध्या लोकांनी जायचं आणि लग्नाला अर्ध्या लोकांनी. फक्त ॲडमिन निलेश दोन्ही कार्यक्रमांना हजेरी लावणार होता.

तृप्तीच्या बिल्डिंगच्या टेरेसवर हळदीचा कार्यक्रम ठेवला होता. टेरेसवर प्रवेश

केल्यावर सर्वांना लिंबू सरबत, चहा, कॉफी दिले जात होते.

हळदीचा कार्यक्रम अगदी वेळेत सुरू केला गेला. कुठल्याही पाहुण्यांची रखडपट्टी केली गेली नाही. तन्वीने मेहंदी सकाळीचं काढून घेतली होती. नाजूकशा तन्वीच्या गोऱ्या हातावर मेहंदी आणि हिरवा चुडा खूपचं खुलून दिसत होता. आलेल्या पाहुण्यांनी पिवळ्या रंगाचे कपडे घातले होते. तशी थीमच ठेवली होती.

तन्वीला हळद लागली. सगळे खूप उत्साहात नाचले. तृप्तीच्या डोळ्यांत आपल्या लेकीला बघून बघून सारखे पाणी येत होते. सारखी तिच्या नवऱ्याची तिला आठवण येत होती.

तन्वी सुद्धा नाचली आणि नाचता नाचता तिच्या आईला तिने नाचायला ओढले. तृप्ती तिच्यासाठी थोडं थिरकली; पण नंतर त्या मायलेकी गळ्यात पडून रडू लागल्या. उपस्थितांच्या डोळ्यांत देखील पाणी आले. रडता रडता पुन्हा तन्वी गाण्यांवर थिरकली.

जेवणासाठी पुरणपोळी, बटाट्याची सुकी भाजी, मसालेभात, जिलेबी, मठ्ठा असा बेत होता. जेवणासाठी टेरेसवर खुर्च्या आणि टेबल मांडले गेले. पाहुणेमंडळी जेवून आपापल्या घरी गेले.

दुसऱ्या दिवशी तन्वीचे लग्न असल्याने ग्रुपमधून दीडशे जणांनी प्रत्येकी दोनशे रुपये आहेर म्हणून निलेशला बँक ट्रान्स्फर केले होते. तीस हजारांची रक्कम जमली होती. निलेशने एका इन्व्हेलोपमध्ये ती रक्कम भरून ठेवली. सगळ्यांचं मत ठरलं होतं की, पैशांचं पाकीटचं देऊ या. तृप्ती तिच्या लेकीला आवडीचे काय द्यायचे असेल ते आपण दिलेल्या आहेरातून घेऊ शकेल.

निलेशसोबत त्याची बायको स्वाती देखील लग्नाला जाणार होती. निलेश स्वातीसह लग्नाच्या हॉलमध्ये पोहचला. हॉलमध्ये झेंडू आणि अष्टरच्या फुलांची साधीशी सजावट केली होती. थर्माकोलचे डेकोरेशन आणि प्लास्टिक यांचा वापर पूर्णपणे टाळला होता.

जमलेल्या माणसांना जास्त न रखडवता लग्नाचे विधी सुरू झाले. आलेल्या पाहुण्यांना पन्हे आणि कोकम सरबत दिले जात होते. स्टार्टर म्हणून कोथिंबीर वडी आणि अळूवडी फिरवली जात होती. तन्वी आणि तिच्या नवऱ्याने पूर्णपणे महाराष्ट्रीयन पदार्थांना लग्नात मानाचे स्थान दिले होते.

सीमंत पूजनाला तृप्ती बसली होती. तृप्ती आणि तन्वीने नऊवारी साडी नेसली होती. तन्वीने लग्नाच्या मुहूर्तासाठी पिवळ्या रंगाची, लाल काठाची नऊवारी साडी नेसली होती आणि मोत्यांचे ठसठशीत पारंपरिक दागिने घातले होते. तन्वीच्या सासरच्यांकडील आणि माहेरच्यांकडील बायकांनी देखील नऊवारी साडी नेसली होती; तसेच समस्त

पुरुषांनी सदरा आणि धोतर परिधान केले होते. तन्वीला एका पालखीत बसवून, तुतारी फुंकून तिला लग्नमंडपात आणले गेले होते.

तन्वीने आणि तिच्या सासरच्या लोकांनी तृप्तीला सांगितले होते की, लग्नाचे विधी तृप्तीच्या हातूनच केले जातील. एक आई आपल्या मुलांना वाढवताना किती कष्ट घेते आणि एखाद्या माणसाची बायको मृत पावली असली तरी तो सगळ्या कार्यात सहभागी होऊ शकतो तर एक स्त्री का नाही ? त्यामुळे लेकीच्या लग्नात तृप्ती लग्नाच्या सगळ्या विधींमध्ये सहभागी झाली होती.

लेकीची मंगलाष्टके देखील तिने ऐकली. वास्तविक आईने लेकीची मंगलाष्टके ऐकू नये असे म्हणतात; पण तन्वीने गुरुजींना यामागचे शास्त्र विचारले असता गुरुजी म्हणाले, "काही ठोस असे कारण नाही. एक आई आपली मुलगी परक्या घरी जाते यामुळे तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहतात केवळ यासाठीच मुलीच्या आईला मंगलाष्टके ऐकू देत नाहीत." मंगलाष्टकांसाठी तांदळाच्या अक्षता वापरल्या गेल्या नाहीत तर गुलाबांच्या फुलांच्या पाकळ्या वापरल्या गेल्या होत्या.

तन्वीचे लग्न खूप छान पार पडले. तन्वीची सासरची माणसे खरोखरच पुढारलेल्या मतांची होती. तृप्तीच्या सासरच्या, माहेरच्या पाहुण्यांशी तसेच तिच्या मित्रमैत्रिणींशी ते अदबीने बोलत होते. सगळ्यांना जेवणाचा आग्रह करत होते.

तन्वीच्या लग्नाच्या जेवणाचा मेनू पूर्णपणे मराठमोळा होता. वांग्याचं भरीत, झुणका, मिरचीचा ठेचा, ज्वारी आणि तांदळाची भाकरी, चवळी-बटाट्याची रस्सा भाजी, अळूचे फतफते, छोटे-छोटे बटाटेवडे, कांदा - बटाटा भजी, वरण - भात, मसालेभात, कढी, उकडीचे मोदक, पापड, कुरडई, जिलेबी, मठ्ठा, पंचामृत, आंब्याचे लोणचे, खोबऱ्याची चटणी यांची रेलचेल होती. पूर्ण ताट पंचपक्वानांनी भरून गेले होते. जेवण वाढण्यासाठी पूर्वीप्रमाणे टेबल - खुर्ची मांडून पंगत बसवली होती आणि वाढपी वाढत होते. जेवणाच्या ताटासोबत प्रत्येकाला एका छोट्या मिठाईच्या बॉक्समध्ये बुंदीचे दोन लाडू पॅकिंग करून दिले होते.

तन्वी आणि तिचा नवरा रिसेप्शनसाठी लगेच तयार होऊन आले. तन्वीने पुन्हा दुसरी डाळींबी रंगाची नऊवारी साडी नेसली होती आणि तिच्या नवऱ्याने डाळींबी रंगाचा सदरा आणि मोती कलरचे धोतर नेसले होते. तन्वीने जुन्या पारंपरिक पद्धतीचे दागिने घातले होते. अतिशय सुंदर दिसत होते ते जोडपे. सगळ्या नातेवाईकांनी, मित्रमंडळींनी नवदाम्पत्यांना आहेर आणि आशीर्वाद दिले.

सगळेजण तन्वीच्या लग्नसोहळ्याचे कौतुक करून हॉलबाहेर पडत होते. तृप्तीच्या सगळ्या मित्रमंडळींनी तृप्तीचा निरोप घेतला आणि आपापल्या घरी जाण्यास निघाले. तृप्तीला आपली मित्रमंडळी लेकीच्या लग्नाला

आल्याबद्दल समाधान वाटले होते. एका सुंदर, पुढारलेल्या मतांनी केलेला लग्नसोहळा सगळ्यांच्या पसंतीस पडला होता.

तन्वीच्या हळदीचे, लग्नाचे फोटो



ग्रुपमध्ये शेअर केले गेले. जे लोकं लग्नाला येऊ शकले नाही ते हळहळले. कारण इतक्या देखण्या समारंभाला ते मुकले होते. मग फोटो पाहून त्या लोकांनी दुधाची तहान ताकावर भागवली. निलेश मात्र खूप खुशीत होता कारण तो तन्वीच्या दोन्ही कार्यक्रमासाठी उपस्थित राहिला होता.

संध्याकाळी अमेरिकेत स्थायिक असलेल्या सदस्यांनी तन्वीच्या लग्नाचे ग्रुपमधील फोटो पाहिले. भाग्यश्रीच्या लेकाचे देखील लग्न ठरले असल्याने तिला तन्वीच्या लग्नसोहळ्याची कल्पना खूप आवडली होती. भाग्यश्रीच्या मुलाने त्याचे लग्न युरोपियन मुलीशी ठरवले होते; पण तिची होणारी सून जरी युरोपियन असली तरी तिला भारतात येऊन महाराष्ट्रीयन पद्धतीने लग्न करायचे होते. भाग्यश्रीच्या लेकाचे तिच्या सुनेच्या पद्धतीचे लग्न अमेरिकेत होणार होते आणि हिंदू पद्धतीने भारतात होणार होते. भाग्यश्री तन्वीच्या लग्नसोहळ्याने प्रेरित होऊन तिच्या आणि तिच्या होणाऱ्या सुनेच्या कुटुंबाबरोबर लग्नाच्या कार्यक्रमाची चर्चा करणार होती.

थोड्या वेळाने तृप्तीचा ग्रुपवर मेसेज आला.

"सगळ्या मित्रमैत्रिणींना माझा नमस्कार. तुम्ही सगळे माझ्या लेकीच्या लग्नासाठी उत्साहाने सहभागी झालात याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानते. अगदी दोन महिने झाले आपण ह्या ग्रुपच्या माध्यमातून पुन्हा एकत्र आलो तरी कुठलाही परकेपणा जाणवला नाही आणि इतका भरभक्कम आहेर तुम्ही माझ्या लेकीला दिलात."

काय बोलू माझ्याकडे शब्द नाहीत. तन्वीने देखील तुम्हा सर्वांचे आभार मानले आहेत. ती देखील म्हणाली, "आई! तुमचा ग्रुप खरंच वेगळा आहे. सगळे माझ्या लग्नात किती आपलेपणाने आले. "तन्वीला तुम्हा सर्वांचे खूप कौतुक वाटले. असेच सगळ्यांचे आशीर्वाद माझ्या मुलांना लाभो हेचं देवाकडे मागणे मागते."

तृप्तीच्या या मेसेजवर निलेशने खूप छान रिप्लाय दिला.

"तृप्ती सगळ्यात प्रथम मी तुझे आभार मानतो की, तन्वीच्या दोन्ही कार्यक्रमासाठी तू मला आमंत्रण दिलेस. खूप सुंदर आणि आधुनिक विचारांनी लेकीचा लग्नसोहळा पार पाडलास आणि समाजासमोर एक नवा विचार तुम्ही मांडला. खरंच आपण ह्या एकविसाव्या शतकात असूनही किती अंधश्रद्धेच्या आहारी गेलो आहोत. किती त्या जाचक रुढीपरंपरा अद्यापही जपतो आहोत.

तुझ्या लेकीचे, जावयाचे आणि त्याच्या घरातील सदस्यांचे कौतुक करावे तितके कमीचं आहे. एक नवा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला आहे. एका सुंदर कार्यक्रमाचा मी साक्षीदार झालो असल्याने मला खूप आनंद झाला आहे. लेक आणि जावई तर दृष्ट लागण्याइतके सुंदर दिसत होते; पण तृप्ती तू देखील फारचं सुंदर दिसत होतीस. भक्कमपणे लेकीच्या पाठी उभी राहिलीस. एकटीने तिच्या सोहळ्याचा भार पेललास. एक वेगळेचं तेज तुझ्यात निर्माण झाले होते. तुझ्या खंबीरतेला आम्हा सर्वांचा सलाम."

निलेशच्या मेसेजने तृप्तीचे डोळे तर पाणावलेच; पण समस्त ग्रुपमधील सदस्यांना देखील भरून आले. सगळ्यांनी तन्वीच्या आधुनिक विचारांचे खूप कौतुक केले आणि मुलगी चांगल्या सुस्थळी गेल्याबद्दल तृप्तीचे अभिनंदन केले.

"निलेश! आता ठरल्याप्रमाणे आपले रियुनिअनच्या कार्यक्रमाचे लौकरात लौकर ठरव. म्हणजे आपली सर्वांची भेट होईल." स्मिताच्या मेसेजने आता सगळ्यांनाच रियुनिअनचे पुन्हा वेध लागले होते. रियुनिअनचा कार्यक्रम लौकर ठरव अशी सगळ्यांनीच निलेशकडे मागणी केली.

लवकरात लवकर कार्यक्रम ठरवतो असे आश्वासन निलेशने मित्रमंडळींना दिले आणि आता तो कार्यक्रम कसा आखायचा ह्याची मनात तो जुळवाजुळव करू लागला.

रि-युनियन ( भाग ४ )

"अहो! ऐकलंत का ? हे उंदराचे पिल्लू बघा ना. भांड्यांच्या ट्रॉलीत शिरलं आहे. काढा ना त्याला बाहेर."

निलेशची बायको स्वाती निलेशच्या नावाने ओरडत होती. एवढं मोठ्यांदा बोलून देखील निलेश किचनमध्ये आला नाही म्हणून ती त्याच्याजवळ गेली असता निलेश त्याच्या विचारात गुंग होता. आज रविवार त्यामुळे

निलेशला ऑफिसला सुट्टी होती. स्वाती नाश्ता बनवायला म्हणून किचनमध्ये गेली असता एक छोटंसं उंदराचे पिल्लू मजेत भांड्यांच्या ट्रॉलीमध्ये बसले होते.

"अहो ! काय ओ असं करता ? बघा ना उंदराचे पिल्लू शिरले आहे घरात. काढा ना त्याला बाहेर. किती ओरडते आहे मी मघाचपासून. कसला विचार करत बसला आहात ?"

स्वाती आता बाजूला येऊन ओरडू लागली म्हणून निलेश विचारातून बाहेर आला. "अग काही नाही विशेष. आमच्या ग्रुपचं रियुनिअन कुठे करायचं हा विचार करत होतो. इतक्या सगळ्यांना घेऊन करायचे आहे. सगळी सोय व्यवस्थित झाली पाहिजे ना ?"

"ती सोय होईल पण पहिल्यांदा तो उंदीर काढा बाहेर." स्वाती वैतागून बोलली.

"बरं तो उंदीर पकडायचा पॅड आणला आहे ना तो दे. चिकटेल तो त्यावर लगेच आणि काय गं ? दोन महिन्यांत चार-पाच वेळा शिरले असतील ना उंदीर आपल्या घरात ? किती वेळा सांगितलं तुला की, स्वयंपाक घरातली खिडकी लावत जा म्हणून. तिथूनच येतात ना ते लोकं. ऐकत का नाहीस ?" निलेश म्हणाला.

"तुम्हाला काय जातंय बोलायला खिडकी लावून ठेवत जा म्हणून. एकतर किचनमध्ये प्रचंड गरम होतं, कोंडल्यासारखं होतं म्हणून जरावेळ उघडते मी खिडकी. तर लगेचं कसे येतात तेचं समजत नाही. जाऊदे, आता मात्र ह्यापुढे मी खिडकी उघडणारच नाही. तो उंदीर घरातून बाहेर गेल्याशिवाय मला काही चैन पडणार नाही." स्वाती म्हणाली.

तू खिडकी बंद ठेवलीस तर समस्त उंदीर आपल्या खिडकीबाहेर उभे राहून गाणं म्हणतील, 'मेरी दुश्मन है ये, मेरी उलझन है ये, बडा तडपाती है, दिल तरसाती है ये खिडकी, ये खिडकी जो बंद रहती है.' निलेश खट्याळपणाने बोलला.

"तुम्हाला मस्करी बरी सुचते आणि हल्ली तुम्ही खूपच आनंदी दिसता बरं का! जेव्हापासून तुमचा शाळेचा ग्रुप झाला आहे ना तेव्हापासून." स्वाती मिश्किलपणे बोलली. निलेशने त्यावर स्वातीला एक मंद स्माईल दिली.

"हा बघ चिकटला ह्या पॅडवर. त्याला लांब टाकून येतो." निलेश तो पॅड लांब टाकून आला.

स्वातीने गरमागरम पोह्यांची डिश निलेशला आणि स्वतःला घेतली. दोन्ही मुलं अजून काही उठली नव्हती त्यामुळे ते दोघेच खाण्यास बसले. निलेश काहीतरी विचार करतच होता म्हणून पुन्हा स्वातीने त्याबद्दल निलेशला विचारले असता निलेश म्हणाला, "अग ! शाळेत असताना मला एक विद्या रानडे म्हणून मुलगी खूप आवडायची. तिला मी आवडत होतो का ते माहीत नाही! पण ती देखील माझ्याकडे चोरून चोरून पहायची.

आम्ही आमचं प्रेम एकमेकांनी कधीच व्यक्त केले नाही. आता ती कुठे असेल ? काय करत असेल ? काही देखील माहीत नाही. तिचा जर रियुनिअनपर्यंतच्या आत शोध लागला तर ती येऊ शकेल ना ?" निलेश स्वातीकडे मनातलं बोलला खरा; पण त्याने घाबरतचं स्वातीकडे पाहिलं. स्वाती एकदम कूल् होती.

"इतकंच ना ? मग ग्रुपमधल्या तुमच्या मैत्रिणींना विचारा तिचा ठावठिकाणा कोणाला माहिती आहे का ?"

"हो विचारतो, ती कोणाच्या कॉन्टॅक्टमध्ये आहे का."

निलेशने पोहे खाऊन त्याचे व्हाट्सएप उघडले आणि ग्रुपमध्ये विचारले की विद्या रानडेशी कोणाचा काही कॉन्टॅक्ट आहे का ?

त्यावर अर्चना म्हणाली की, "अरे हो रे ! विद्याचं लक्षातच नाही आलं. लग्नानंतर तिच्या नवऱ्याच्या फिरतीच्या जॉबमुळे ती कोणाच्याचं कॉन्टॅक्ट मध्ये नाही. माहेरी ती माझ्या आईबाबांच्या बाजूच्याच बिल्डिंगमध्ये राहायची. मागे दहा – बारा वर्षांपूर्वी तिचे आईवडील मला भेटले होते तेव्हा मला त्यांनी सांगितले की, विद्याच्या नवऱ्याची बदली कलकत्त्यात झाली असल्याने ती आता कलकत्त्यात राहते. त्यांनी तिचा नंबर पण मला दिला होता. मी तिच्याशी बोलले पण होते; पण बरीच वर्षे झाल्याने तिचा नंबर पण माझ्याकडून गेला. तिचं आताचे नाव विद्या साठे आहे. बरं झालं तू तिची आठवण करून दिलीस. मी तिला फेसबुकवर शोधते आता."

निलेश अर्चनच्या मेसेजने खूप खूश झाला होता. त्याने खुशीत स्वातीला सांगितले असता स्वाती म्हणाली, "हो का ? मग फेसबुकवर आपण शोधू या तिला."

स्वाती इतकी कूल् होती म्हणून निलेशला थोडं आश्चर्यच वाटलं होतं त्यामुळे त्याने तिला विचारलं, "स्वाती, तू इतकी कूल् कशी ? नवऱ्याला त्याची मैत्रीण शोधायला मदत करते आहेस. मला वाटलं होतं की तू माझ्यावर चिडशील, रागावशील म्हणून."

"अहो ! सरड्याची धाव कुंपणापर्यंत. तुम्ही कुठे जाणार जाऊन जाऊन. पुन्हा माझ्याचकडे येणार ही खात्री आहे मला आणि जो तो आपल्या संसारात व्यस्त आहे. तुमची मैत्रीण पण तिच्या संसारात, मुलाबाळांत मग्न असेल. ह्या वयात कोण पुन्हा एकमेकांच्या प्रेमात पडणार आहे का ? अर्ध आयुष्य संपलं आपलं. आता ज्या जोड्या जुळवल्या आहेत देवाने त्यांच्यासोबत आपले आयुष्य संपणार. चला आपण तुमच्या मैत्रिणीला फेसबुकवर शोधू या."

निलेशने फेसबुक उघडलं आणि विद्या साठे नाव सर्च केले असता कितीतरी विद्या साठेच्या प्रोफाइल आल्या. नंतर विद्याचा नवरा आणि तिच्या मुलीसोबत फोटो दिसला. निलेशला पहिलं तर तिला ओळखू आले नाही कारण तिच्या चवळीच्या शेंगेचे रूपांतर मस्त

दिवाळी निमित्त

हार्दिक शुभेच्छा!

# ओम फिल्म

विविध विषयांवरच्या माहितीपटाची / लघुपटांची निर्मिती करणाऱ्या

आमच्या प्रोडक्शन हाऊस साठी :

स्क्रीप रायटर्स  निवेदक कलाकार  कॅमेरामन  पाहिजेत.

**संपर्क : निर्माता/दिग्दर्शक : डॉ. विलास पवार ९८२११६१६६२ /०२२-६९३०९१९७**

एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.

# ओम पब्लिकेशन

**आमच्या ओम पब्लिकेशनसाठी अनुवादक : इंग्रजी/मराठी पाहिजेत.**

**कथा/कविता/चारोळ्या/पाककृती या विषयांबरोबर अन्य विषयांच्या**

**पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेऊन त्यास सहाय्य करणार. यासाठी संपर्क साधावा.**

**ओम पब्लिकेशन, एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.**

**फोन : ९८२११६१६६२ /०२२-६९३०९१९७**

For Crises management, Concept Marketing,
Media Management, Event Management, Public Relation &
Other Managing ability and Challenging Works.



Avidmedia
Management & marketing Pvt. Ltd.

**Contacts:**
022-69309197, Cell - 9167785599



भोपळ्यामध्ये झाले होते! परंतु तिचा चेहरा अजूनही तसाच असल्याने आणि शाळेचे नाव तिने प्रोफाइल मध्ये नमूद केले असल्याने तिला शोधता आले.

तिचा फोटो बघून स्वाती म्हणाली, "अगबाई! तुमची मैत्रीण तर माझ्यापेक्षाही गुटगुटीत वाटते आहे. एक काम करा. तिला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून ठेवा म्हणजे ती कॉन्टॅक्टमध्ये येईल."

निलेश विद्याला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवायला टाळाटाळ करू लागल्यावर त्याला स्वाती म्हणाली, "मेन विल बी मेन हां! तेच जर तुमची मैत्रीण स्लिम ट्रिम दिसली असती तर लगेच फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली असती तिला. ते काही नाही तिला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवा. तिला जमत असेल तर ती देखील येईल रियुनिअनसाठी. आता काय राहिलं आहे आयुष्यात? चार मित्रमंडळी कधीतरी भेटलो की वेगळा आनंद मिळतो." स्वाती हसत हसत बोलली.

"आयला! स्वाती तू किती सॉलिड आहेस ग." निलेशने बोलता बोलता विद्याला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून ठेवली.

संध्याकाळी निलेशने त्याचे फेसबुक चेक केले असता त्याला दिसले की, विद्याने त्याची रिक्वेस्ट एक्सेप्ट केली होती आणि मेसेंजरवर मेसेज देखील पाठवले होते. निलेशने विद्यासोबत जरावेळ चॅटिंग केले. तिला रि-युनियनची कल्पना दिली. विद्याने लगेचच निलेशला स्वतःचा कॉन्टॅक्ट नंबर दिला आणि तिला ग्रुपमध्ये ऍड करायला सांगितले. निलेशने लगेच विद्याला ग्रुपमध्ये ऍड केले.

विद्या ग्रुपमध्ये ऍड झाल्यावर सगळ्यांनी तिचे स्वागत केले. विद्यालाही सगळ्या मैत्रिणी ग्रुपवर दिसल्याने तिला खूप आनंद झाला. आता सध्या तिच्या नवऱ्याची बदली नागपूरला झाली असल्याने तिचे वास्तव्य नागपूरला होते. सगळ्यांनी तिला विचारले तू तुझ्या नवऱ्याच्या बदलीमुळे कुठे कुठे राहिलीस ?

विद्या बोलली की, "ह्यांच्या नोकरीच्या बदलीमुळे गुजरात, बंगाल, मध्यप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र ह्या राज्यात आमची भटकंती झाली. उत्तरप्रदेशच्या काही भागात पण आमचे वास्तव्य झाले. अजून फक्त काश्मीरच बाकी राहिलं आहे तेवढं. बघू तिथे कधी योग येतो आहे जाण्याचा. आम्ही एकच मुलगी होऊ दिल्यामुळे तिचे लग्न होऊन ती आता पुण्याला असते. तुम्ही रि-युनियनची तारीख ठरवली की मी आधी लेकीकडे राहीन मग येऊ शकेन आपल्या कार्यक्रमासाठी."

विद्याच्या बोलण्याने मग तू मुलीच्या शाळेचं कसं काय केलंस? तुला कुठले अनुभव आले? तुला कसं जमलं सारखं फिरतीवर जायला? अशा अनेक प्रश्नांचा तिच्यावर भडिमार झाला. विद्याने सगळ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

निलेशने ग्रुपवर मेसेज टाकला.

"चला आता सगळे मिळून सगळ्यांना सोयीस्कर अशी रि-युनियनची तारीख, स्थळं, वेळ ठरवू या. व्यवस्थित बजेट आखून आपल्या रि-युनियनचा कार्यक्रम करू या. चला लागा कामाला. चांगले चांगले स्पॉट सांगा आपल्या रि-युनियनसाठी."

निलेशच्या मेसेजने ग्रुपमध्ये चैतन्य निर्माण झाले. सगळ्यांनी मग कुठल्या कुठल्या फार्म हाऊस, रिसॉर्ट यांची माहिती गूगलवर शोधून ग्रुपमध्ये टाकायला सुरुवात केली. कोणी त्यांचे स्वतःचे फार्म हाऊस सजेस्ट केले, तर कोणी कोणाच्या ओळखीतले रिसॉर्ट, फार्म हाऊस सजेस्ट केले. कोणी शाळेच्या हॉलमध्ये कार्यक्रम करू असे सांगितले.

निलेशने मेसेज टाकला, "आपल्याला दीडशे ते दोनशे लोकांची सोय करायची आहे त्यामुळे त्या स्पॉटची व्यवस्थित माहिती घेऊन मगच ग्रुपवर टाका. सगळ्यांची जाण्या-येण्याची, खाण्या - पिण्याची, राहण्याची सोय कशी आहे ते पहिल्यांदा पहा. उगाच कोणाचीही हेळसांड व्हायला नको."

आम्ही सगळी चौकशी करून मग ग्रुपवर सांगतो असे ग्रुपवर मेसेजेस आले. निलेशने संतोष आणि संदीपवर चांगल्या रिसॉर्ट किंवा फार्म हाऊसची माहिती काढण्याची जबाबदारी सोपवली. तो स्वतः देखील दुसऱ्या दिवशीपासून माहिती गोळा करणार होता. सगळ्यांनीच वयाची पन्नाशी पार केली असल्याने कुठेतरी शांत आणि निसर्गरम्य जागेचा त्याला शोध घ्यायचा होता.

रि-युनियन ( भाग ५ )

दुसरा दिवस उजाडला तोच वाईट बातमी घेऊन. ग्रुपमधल्या विलास महाडिकचे हार्ट फेल होऊन अकस्मात निधन झाले होते. विलास सारखा निर्व्यसनी माणूस इतक्या तडकाफडकी जावा याचेच सगळ्यांना आश्चर्य वाटत होते. अलीकडेच तृप्तीच्या लेकीच्या लग्नात सहभागी होऊन त्याने ग्रुपमध्ये धमाल उडवून दिली होती. विलास अगदी शाळेत असल्यापासूनच एकदम दिलखुलास होता. इतरांच्या मदतीला तत्परतेने धावून जाणारा, स्वभावाने प्रेमळ असल्याने मित्रपरिवारांत तो आवडता होता.

तातडीने निलेश आणि ग्रुपमधील वीस मित्र विलासच्या घरी पोहचले. विलासने आणि त्याच्या बायकोने दोन वर्षांपूर्वी देहदानाचा फॉर्म भरून ठेवला होता. त्याच्या इच्छेनुसार त्याचे देहदान करण्यात आले.

विलासच्या बायकोच्या डोळ्यांतले अश्रू थांबतच नव्हते. घराचा आधारस्तंभ निखळून पडला होता. विलासचा मोठा लेक नुकताच नोकरीला लागला होता, तर धाकटा लेक इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला होता.

विलासचे ऑफिसमधील काही कर्मचारी विलासच्या परोपकारी वृत्तीमुळे जळत असत. विलासचे नाव बदनाम

करण्यासाठी ऑफिसमधील काही लोकांनी विलासचे ऑफिसमधील एका विधवा स्त्रीबरोबर नाव जोडले होते. कित्येक दिवस हे पारायण चालू होते. नेमके त्या दिवशी विलासच्या कानावर ह्या गोष्टी आल्या. विलासने केवळ एक माणुसकी म्हणून ऋतुजाला तिच्या नवऱ्याच्या जागी नोकरी मिळवून देण्यासाठी मदत केली होती आणि पुढे त्या दोघांची चांगली मैत्री झाली होती. त्या दोघांची निखळ मैत्रीचं लोकांना खटकत होती आणि त्याचा विनाकारण गौप्यस्फोट झाला होता.



विलासला स्वत:वरच्या आरोपापेक्षा त्या पवित्र स्त्रीवर आलेल्या गलिच्छ आरोपामुळे जास्त मानसिक खच्चीकरण झाले आणि परिणामी त्याच्या मनावर आघात होऊन त्याचे हार्ट फेल झाले. त्या स्त्रीची झालेली नाहक बदनामी त्याला सहन झाली नव्हती. ऑफिसमधील त्याचे काही हितचिंतक मित्र त्याच्या घरी आले तेव्हा त्यांच्याकडून ही बातमी समजली होती.

विलासच्या बायकोला त्याचा प्रॉव्हिडंट फंड वगैरे सारं काही मिळणार होते. ऑफिसमधील काही मित्र फंडाचे पैसे लवकर मिळवून देण्याचा प्रयत्न करणार होते. शाळेच्या ग्रुपमधील दहा - बारा लोकांनी निर्णय घेतला तो म्हणजे विलासच्या धाकट्या लेकाच्या शिक्षणाचा खर्च ते उचलणार होते. कारण विलासची पत्नी एक गृहिणी होती आणि मोठा लेक तर नुकताच जॉबला लागला होता. ह्यावेळेला नातेवाईक मंडळी काही कामाची नसतात. विलासने सगळ्यांसाठी पुष्कळ केलं; पण त्याच्या जेव्हा त्याच्या बायकोला आधाराची खरी गरज भासली तेव्हा त्याच्या बायकोच्या मागे कोणीही खंबीरपणे उभे राहिले नाही.

निलेशने ग्रुपमध्ये तूर्तास तरी रि-युनियनची चर्चा करू नये असे सांगितले. निलेशने विलासच्या पत्नीला काही मदत करण्यासाठी ग्रुपमधल्या सदस्यांना पैसे जमा करण्याचे सुचविले. प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार पैसे जमवले. तब्बल पन्नास हजार रुपये जमले होते. ते पैसे घेऊन पुन्हा संध्याकाळी निलेश, संतोष, संदीप, महेश हे मित्र विलासच्या घरी गेले. निलेशने ते पैसे विलासच्या पत्नीला देऊ केले. विलासची पत्नी गहिवरली.

निलेश विलासच्या पत्नीला पैसे हातात देत बोलला, "वहिनी ! जे काही झालं ते खूपच वाईट झालं. विलास अतिशय चांगला माणूस होता. त्याच्या अशा अकस्मात निधनाने आम्हा सर्वांना अतिशय दु:ख झाले आहे. तुमच्या घरातला कर्ता पुरुष गेला. त्याची कसर कोणीच भरून काढू शकत नाही; पण वहिनी तुम्हा सर्वांना तुमचे आयुष्य विलासशिवाय पुढे

न्यावेच लागेल. विलासचे फंडाचे पैसे कधी मिळतील तेव्हा मिळतील. हे पैसे तुमच्या कामी येतील हीच भावना आहे. त्यामुळे कुठलीही मनात किंतू न ठेवता ह्या पैशांचा स्वीकार करा."

विलासची पत्नी निलेशला म्हणाली, "निलेश भाऊजी ! माझा नवरा स्वभावाने प्रेमळ, मदतीला तत्पर, स्त्रियांचा सन्मान करणारा, हळव्या मनाचा, अत्यंत लाघवी असा होता. ऑफिसमधील छोट्यातली छोटी गोष्ट ते मला सांगत असत. त्यांनी ऋतुजाबरोबरच्या निखळ मैत्रीबद्दल देखील मला सांगितले होते. मला काही त्यात वावगे वाटले नाही कारण माझ्या नवऱ्यावर माझा पूर्ण विश्वास होता.

ज्या लोकांनी त्या दोघांबद्दल गलिच्छ आरोप पसरवले त्याने त्यांनी काय मिळवले हो ? माझ्या नवऱ्याचा ह्यात नाहक जीव गेला. ती लोकं माझा नवरा परत आणून देऊ शकतील ? दोघांच्या नावाची जी बदनामी केली तर पुन्हा त्या ऋतुजाला मानमरातब मिळवून देतील ?

ऋतुजा मला दुपारी भेटून गेली. फक्त इतकंच बोलली की, "वहिनी जग खूप घाणेरडे आहे. विलाससरांसारखा माणूस क्वचितच असतो. त्यांच्यामागे तुम्हाला मुलांसाठी जगायचे आहे. आता खंबीर होऊन मुलांच्या भविष्याचा विचार करा. आता मुलांचे वडील देखील तुम्हीच आहात आणि कृपा करून तुमचं स्त्रीधन उतरवू नका. एका स्त्रीला तिच्या नवऱ्याच्या पाठी समाजाच्या कुठल्या कुठल्या नजरा झेलायला लागतात हे मला चांगलंच माहिती आहे."

"मला सांगा भाऊजी, आपला समाज अजून इतका मागासलेला का? एका स्त्री आणि पुरुषाची निखळ मैत्री नसू शकते ? स्त्री आणि पुरुष एकमेकांशी बोलले तरी त्यांचे लफडे आहे म्हणून गावभर दवंडी पिटवायची यात काय मिळतं लोकांना असं वागून ?" विलासची बायको अगतिकपणे बोलत होती.

"हो वहिनी, तुम्ही बरोबर बोलत आहात. आपल्या समाजाची मानसिकता अजूनही मागासलेली आहे. कधी हा समाज सुधारणार देव जाणे. वहिनी, स्वतःची आणि मुलांची काळजी घ्या. काही मदत लागली तर हक्काने आम्हाला सांगा. मी तुमच्या दोन्ही मुलांना माझा नंबर देऊन ठेवला आहे. आम्ही मित्र-मैत्रिणी येऊन जाऊ अधेमधे." विलासच्या बायकोचा आणि मुलांचा निरोप घेऊन निलेश आणि त्याचे मित्र निघाले.

ग्रुपमध्ये विलासचीच चर्चा सुरू होती. दुसऱ्या दिवशी ग्रुपमधल्या मैत्रिणी विलासच्या घरी त्याच्या बायकोला भेटायला जाणार होत्या.

दुसऱ्या दिवशी ग्रुपमधल्या मैत्रिणी विलासच्या बायकोला भेटायला गेल्या. थोडं जुजबी बोलून, थोडा वेळ विलासच्या घरी बसून त्या पुन्हा आपल्या घरी जाण्यास निघाल्या. त्याच संध्याकाळी निलेश आपल्या

बायकोला घेऊन विलासच्या घरी गेला. स्वातीला देखील विलासच्या बायकोला भेटायचे होते. ग्रुपमधील रोज कोणी ना कोणी विलासच्या बायकोला भेटायला जात होते.

विलास त्याचे कुठलेही मरणोत्तर कार्य करायचे नाही असे वारंवार त्याच्या बायकोला सांगत असे. त्यामुळे त्याचे कुठलेही मरणोत्तर कार्य केले जाणार नव्हते.

जवळपास पंधरा-वीस दिवस झाले विलासला जाऊन; पण ग्रुपमध्ये कोणीही रि-युनियनचे नाव काढले नव्हते.

काही दिवसांनी भाग्यश्रीने तिच्या लेकाचे लग्न दोन दिवसांनी चर्चमध्ये आहे असा मेसेज केला. त्यानंतर पंधरा दिवसांनी भाग्यश्री तिच्या कुटुंबासकट भारतात येणार होती. तिला तिच्या लेकाचे लग्न आपल्या हिंदू पद्धतीने मुंबईत देखील करायचे होते. त्यासाठी तिला भारतात येऊन लग्नाची खरेदी, आमंत्रणे याची तयारी करायची होती. केवळ भाग्यश्रीच नव्हे तर तिच्या सुनेला आणि सुनेच्या आईवडिलांना देखील हिंदू रीतिरिवाजाने लग्न करायचे होते. लेकाच्या लग्नाच्या निमित्ताने भाग्यश्री भारतात कितीतरी वर्षांनी येणार होती.

दोन दिवसांनी भाग्यश्रीने चर्चमध्ये पार पडलेल्या लेकाच्या लग्नाचे फोटो ग्रुपवर टाकले. अमेरिकेत स्थायिक असलेल्या आहना आणि सुनीता त्या लग्नाला उपस्थित होत्या. भाग्यश्रीची सून स्टेला फारच सुंदर दिसत होती. आता त्या सगळ्या लोकांना भारतात येण्याचे वेध लागले होते. प्रतिकने लेकाच्या लग्नासाठी चार दिवसांकरिता कर्जतला डेस्टिनेशन वेडिंगसाठी फार्म हाऊस अमेरिकेतूनच बुक करून ठेवला होता. उत्साही मित्रमंडळींनी भाग्यश्री आणि प्रतिकला मदत करण्याची तयारीही दर्शवली.

दरम्यान विलासच्या पत्नीशी कोणी ना कोणी जातीने कॉन्टॅक्ट करत असल्याने विलासच्या कुटुंबाला कोणी एकटे पडून दिले नव्हते.

पंधरा दिवसांनी भाग्यश्री आणि तिचे कुटुंब भारतात आले. भारतात आल्या आल्या दोन दिवसांनी भाग्यश्री आणि प्रतिकने विलासच्या बायकोची भेट घेतली. प्रतिकने विलासच्या धाकट्या लेकाच्या हातावर पाच हजारांची रक्कम ठेवली. विलासचे कुटुंब ते पैसे घेण्यास नकार देत होते पण प्रतिकने सांगितले की, 'ह्याचा शिक्षणासाठी उपयोग कर' म्हणून सरतेशेवटी विलासच्या धाकट्या लेकाने ते पैसे घेतले.

भाग्यश्री आता लग्नाच्या तयारीला जुंपली. स्वतःसाठी, सुनेसाठी आणि सुनेच्या आईसाठी, सासर - माहेरीकडील स्त्रियांसाठी तिने नऊवारी पैठणी विकत घेतल्या. पैठणीवर घालण्यासाठी मोत्यांचे दागिने विकत घेतले. भाग्यश्रीच्या लेकाचे लग्न आठ दिवसांवर येऊन ठेपले होते.

भाग्यश्रीने लेकाच्या लग्नाच्या

पत्रिकेचा व्हिडीओ ग्रुपमध्ये पोस्ट केला आणि सगळ्यांना आग्रहाचे निमंत्रण दिले.

आता ग्रुपमध्ये भाग्यश्री आणि प्रतिकच्या लेकाच्या लग्नाची उत्सुकता निर्माण झाली होती. मुळात सगळ्यांना आकर्षण होते ते भाग्यश्रीच्या फॉरेनर सुनेचे. त्यामुळे ग्रुपमधील बरीच मंडळी उत्साहाने लग्नाला जाणार होती.

रि-युनियन ( भाग ६ )

प्रतिकने चार दिवसांसाठी फार्म हाऊस बुक केले असल्याने सगळं वऱ्हाड सकाळी कर्जतला जाऊन पोहचले. भाग्यश्रीने ग्रुपमध्ये सर्वांना लग्नाच्या दिवशीचेच आमंत्रण दिले होते कारण त्या फार्म हाऊसवर इतक्या सगळ्यांची सोय झाली नसती. आधीच भाग्यश्री आणि प्रतिकचे मिळून तिथे शंभर नातेवाईक उपस्थित होते. स्टेलाचे नातेवाईक त्यांच्या अमेरिकेतील लग्नात उपस्थित राहिले होते. एकट्या निलेशला चारही दिवसांचे खास आमंत्रण दिले असल्याने निलेश त्याच्या बायकोला स्वातीला घेऊन फार्म हाऊसवर पोहोचला होता.

त्या फार्म हाऊसवर वऱ्हाडी मंडळींची सोय फारच उत्कृष्ट करण्यात आली होती. सकाळी तिथे गेल्यागेल्या पाहुण्यांना गरमागरम पोहे, उपमा आणि इडली-चटणी-सांबारचा नाश्ता दिला गेला. नाश्ता झाल्यावर सगळ्यांना चहा-कॉफी दिली. संध्याकाळी मेहंदीचा कार्यक्रम होता. त्यामुळे सगळी मंडळी आराम करण्यास आपापल्या रूममध्ये गेली.

दुपारच्या जेवणात छोले-भटूरे, मसालेभात, बुंदी रायता, जिलेबी असा मेनू होता.

साधारण चार वाजता सगळ्यांनी स्वतःचे आवरायला घेतले. स्टेलाने सुंदर लाल रंगाचा अनारकली ड्रेस घातला होता. तर भाग्यश्रीच्या लेकाने अंशने लाल रंगाचा सदरा आणि पांढऱ्या रंगाचा पायजमा घातला होता.

स्टेलाच्या तसेच इतर स्त्रियांच्या हातावर सुंदर मेहंदी काढण्यात आली. एका कासाराला बोलावून त्याच्याकडून सवाष्णींना चुडा देखील भरण्यात आला होता. स्टेलाच्या गोऱ्या हातात हिरवा चुडा खूपचं सुंदर दिसत होता. स्टेलाची मॉम देखील उत्साहाने सगळ्या कार्यात सहभागी होत होती. मेहंदीचा कार्यक्रम संपल्यावर सगळ्यांनी थोडा डान्स केला.

रात्रीच्या जेवणात अगदी हलके जेवण द्यायला सांगितल्यामुळे डाळ-खिचडी, कढी, पापड, लोणचे असा बेत होता. आता दुसऱ्या दिवशी संध्याकाळी संगीतचा कार्यक्रम होता. त्यासाठी सगळ्यांनी खूप छान छान डान्स बसवले होते.

सकाळी नाश्ता, जेवण झाल्यावर पुन्हा वऱ्हाडी मंडळींनी दुपारी आराम केला आणि रात्री संगीतच्या कार्यक्रमासाठी सगळे तयार झाले. स्टेलाने निळ्या रंगाचा गाऊन घातला होता आणि अंशने निळ्या रंगाची शेरवानी

घातली होती. पहिला डान्स होता अर्थातच उत्सवमूर्तींचा. दोघांनी 'होल्ड मी नाऊ, टच मी नाऊ, आय डोन्ट वॉन्ट टू लिव्ह विथआऊट यू, नथिंग्ज गॉन अ चेंज माय लव्ह फॉर यू' ह्या गाण्यावर सुंदर बॉलडान्स केला. अंशने डान्स करताना स्टेलाला उचलून एक गिरकी घेतली आणि लगेचच तिला खाली उतरवून तिच्या पायाशी गुडघ्यावर बसून त्याने तिच्या बोटात हिऱ्याचे कोंदण असलेली अंगठी सरकवली. दोघांची केमिस्ट्री पाहून उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा आपोआपच ओल्या झाल्या. नंतर लगेचच 'मेहंदी लगाके रखना, डोली सजाके रखना' ह्या बॉलिवूड गाण्यावर दोघे थिरकले.

धमाल उडवली ती चार व्याह्यांनी. 'ले जायेंगें ले जायेंगें, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगें' ह्या गाण्यावर त्या चौघांनी असा भन्नाट डान्स केला की उपस्थितांचे हसून हसून पोट दुखू लागले होते. भाग्यश्रीच्या धाकट्या लेकीने अंतराने 'गोरी गोरी पान फुलासारखी छान, दादा मला एक वहिनी आण' ह्या गाण्यावर डान्स करून बहार उडवून दिली होती. भाग्यश्री, तसेच प्रतिकचे नातेवाईक देखील मागे राहिले नव्हते. त्यांनी देखील बहारदार डान्स केले. नंतर एक तास डीजे लावला त्यावर सगळ्यांनीच ताल धरला.

भाग्यश्री आणि प्रतिकचे व्याही फॉरेनर असल्याने संगीतच्या कार्यक्रमात ड्रिंक्स, व्हेज- नॉनव्हेज जेवण देखील ठेवण्यात आले होते तरीदेखील अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने संगीतचा बहारदार कार्यक्रम उरकला.

आता तिसऱ्या दिवशी संध्याकाळी हळदीचा कार्यक्रम होता. सगळ्यांनी हळद उत्स्फूर्तपणे खेळली. हळदीसाठी व्हेज, नॉनव्हेज जेवण ठेवले होते. आता चौथ्या दिवशीचा उद्याचा सगळ्यात महत्त्वाचा कार्यक्रम होता तो म्हणजे लग्नाचे विधी. सकाळी साडे-दहाचा मुहूर्त असल्याने रात्री सगळे लवकर झोपी गेले.

सकाळी साडे-सात पासून लग्नाचे विधी सुरू झाले. स्टेलाने गर्द हिरवी नऊवारी पैठणी साडी नेसली होती. त्यावर पारंपरिक मोत्यांचे दागिने, नथ यांनी स्टेलाचे सौंदर्य जास्तच खुलले होते. अंशने हिरव्या रंगाचा कुर्ता आणि मोती कलरची धोती नेसली होती. भाग्यश्री, तसेच स्टेलाच्या मॉमने देखील पैठणी नऊवारी साड्या नेसल्या होत्या.

'नवरीच्या मामाने नवरीला स्टेजवर आणा' असा गुरुजींकडून पुकारा झाल्यावर भाग्यश्रीने धावत जाऊन निलेशला स्टेलाला स्टेजवर घेऊन जाण्याची विनंती केली. निलेशने हौसेने स्टेलाला स्टेजवर नेले. मंगलाष्टके पार पडली. भाग्यश्रीने तन्वीच्या लग्नसोहळ्यातील विचार फॉलो केलेले असल्याने त्या लोकांनी देखील तांदळाच्या अक्षता न वापरता गुलाबांच्या पाकळ्या मंगलाष्टकांसाठी वापरल्या. स्टेलाच्या गळ्यात अंशने मंगळसूत्र घातले त्यावर सगळ्यांनी

जल्लोषात टाळ्या वाजवल्या.

शाळेच्या ग्रुपमधून जवळपास शंभर लोकांनी लग्नासाठी हजेरी लावली होती. विलासच्या बायकोला देखील ग्रुपमधल्या मैत्रिणी घेऊन आल्या होत्या. भाग्यश्रीने विलासच्या बायकोला आग्रहाचे आमंत्रण दिलेलेच होते. लग्नाच्या निमित्ताने का होईना विलासच्या बायकोला त्याच त्याच आठवणीतून बाहेर काढावे हा भाग्यश्रीचा हेतू होता. सगळ्यांची मिळून अहेरासाठी चाळीस हजारांची रक्कम जमली होती. त्यातील एकट्या निलेशने दहा हजारांचा वेगळा अहेर केला होता.

जेवणासाठी पंगत बसवली गेली आणि मराठमोळ्या पद्धतीचे सुग्रास जेवण ठेवण्यात आले होते. पुरणपोळी, बासुंदी, पुरी, बटाट्याची भाजी, अळूवडी, उकडीचे मोदक हे सगळे पदार्थ खास स्टेलाच्या आवडीचे ठेवले होते. स्टेला आणि अंश पंगतीत सगळ्यांना आग्रहाने वाढत होते. सगळ्यांना भाग्यश्रीच्या सुनेचे फारच कौतुक वाटत होते. सगळ्यांशी ती मराठीत बोलत होती. सगळ्यांना हात जोडून नमस्कार करत होती. भाग्यश्रीला 'आई' आणि प्रतिकला 'बाबा' अशा हाका मारत होती.

सगळ्यांनी स्टेलाला उखाणा घ्यायला लावला. स्टेलाने उखाणा घेतला, 'मी आहे अंशची फॉरेनर नवरी, भारतीय संस्कृती आहे लय भारी' सगळ्यांनी स्टेलाच्या उखाण्यावर टाळ्या वाजवल्या. भाग्यश्रीने स्टेलाला विचारले की, 'कोणी तुला हा उखाणा सांगितला' तर तिने अंतराकडे बोट दाखवले. भाग्यश्री खूप खूश झाली की, आपली मुले परदेशात राहून आपली संस्कृती जपत आहेत.

आता साहजिकच अंशची उखाणा घेण्याची पाळी आली. 'स्टेलाला आवडते भारतीय संस्कृती, म्हणूनच तिची आणि माझी जुळली प्रीती.' अर्थात हा देखील उखाणा अंतरानेच सांगितला होता.

अंश आणि स्टेलाच्या लग्नाचा दिमाखदार सोहळा सुंदररित्या पार पडला होता. समस्त पाहुण्या मंडळींना भाग्यश्री आणि प्रतिकने लक्ष्मीचे चांदीचे कॉईन भेट म्हणून दिले.

सर्व मित्रमंडळींनी भाग्यश्रीकडे स्टेलाचे आणि तिच्या आईवडिलांचे कौतुक केले. सगळे म्हणाले, 'हे लोकं फॉरेनर असून आपल्यामध्ये किती छान मिसळले. सगळे लग्नाचे विधी करताना खूप हौसेने सहभागी झाले होते त्यामुळे वाटलेच नाही की तुझे व्याही फॉरेनर आहेत.'

त्यावर भाग्यश्री म्हणाली की, 'खूपच छान आहे स्टेला आणि तिचे आईवडील. मी अंश आणि स्टेलाची मैत्री पाहिली, त्यांचं फुलत जाणारं प्रेम पाहिलं. स्टेलाने अंश आणि आम्हाला पारखलं. माझ्याकडून तिने आणि तिच्या आईवडिलांनी देखील भारतीय संस्कृती, भारतीय खाद्यसंस्कृती जाणून घेतली. स्टेला मराठी भाषा शिकली. आता ती

उत्तम मराठी बोलते. तिच्या आवडीचे जे पदार्थ आता जेवणात होते ना ते देखील करायला ती शिकली आहे. स्टेलाच्या आईवडिलांनी अंश आणि स्टेलावर विश्वास दाखवला आणि त्यांचे आठ वर्षांचे प्रेम सफल झाले.'

सगळ्यांनी भाग्यश्री, प्रतिक, अंतरा, नवदाम्पत्याचा आणि स्टेलाच्या आईवडिलांचा निरोप घेतला आणि एक एक करत सगळे आपल्या घराकडे जायला निघाले.

आज ग्रुपमध्ये अंश आणि स्टेलाच्या लग्नाचेच कौतुक चालले होते. ग्रुपमध्ये एकावर एक असे लग्नाचे फोटो टाकत राहिल्यामुळे सगळ्यांच्या मोबाईलची गॅलरी फुल्ल झाली होती. जे लग्नाला जाऊ शकले नाही त्यांना त्या सोहळ्याचे फोटो पाहून हळहळ वाटली. निलेशने तर चारही दिवसांचे फोटो ग्रुपमध्ये पोस्ट केले.

भाग्यश्रीचा रात्री ग्रुपवर मेसेज आला

"माझ्या मित्रमैत्रिणींनो, माझ्या लेकाच्या लग्नाला आपण उपस्थित राहिलात आणि आमच्या आनंदात सहभागी झाल्याबद्दल मी आपणा सर्वांची आभारी आहे. अंश आणि स्टेलाला आपला ग्रुप खूप आवडला. त्यांनी सुद्धा तुम्हा सगळ्यांना थँक्स सांगितले आहे. जितकं वाटलं होतं त्यापेक्षा जास्त सुंदर माझ्या लेकाचा लग्नसोहळा पार पडला. आम्ही सगळे भारावून गेलो आहोत. निलेश आणि स्वाती आमच्या कार्यक्रमात घरातील सदस्यांप्रमाणे मिसळले आणि त्या दोघांनी आम्हाला खूप मदत केली. आलेल्या पाहुणेमंडळींना काही कमी पडू दिले नाही. प्रत्येकाकडे जातीने लक्ष देत होते. आता आम्ही अमेरिकेला पुन्हा निघून जाऊ; पण तुम्हा मित्रमंडळींच्या प्रेमाची आठवण कायम आमच्यासोबत असेल. पुन्हा एकदा तुमचे सगळ्यांचे मनःपूर्वक आभार मानते."

भाग्यश्रीच्या मेसेजने पुन्हा तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. भाग्यश्री तिच्या कुटुंबासकट दुसऱ्या दिवशी प्रतिकच्या गावी जाणार होती. गाव कसं असतं हे स्टेला आणि तिच्या आईवडिलांना पहायचे होते. तरी गावात बऱ्यापैकी सुविधा आल्याने ते खेडेगाव राहिले नव्हते आणि अगदीच शहरीकरणही झाले नव्हते. प्रत्येक घरात गॅसची सुविधा असूनही अजूनही तिथे चुलीवरील स्वयंपाक होत असल्याने स्टेला आणि तिच्या आईवडिलांना त्याचे जास्त आकर्षण होते.

ग्रुपमध्ये दोन लग्नकार्य छान पार पडली होती. दोन्ही लग्नकार्यात बरेच जण भेटले होते, तरी सगळ्यांमध्ये अजूनही रियुनिअनची उत्सुकता कायम होती. ग्रुपमध्ये आता पुन्हा रियुनिअनची चर्चा सुरू झाली. निलेशला मनासारखा स्पॉट सापडत नव्हता. मनासारखा स्पॉट सापडल्यावरच तो सगळ्यांशी बोलणार होता.

रि-युनियन( भाग ७ )

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी

ग्रुपमध्ये अंजलीचा एक फोटो पोस्ट झालेला दिसला. त्या फोटोत अंजली आणि तिच्या नवऱ्याबरोबर एक छोटंसं कुत्र्याचं पिल्लू देखील होतं. फोटोखाली लिहिले होते, 'आमच्या घरातील नवीन सदस्य.'

फोटो पाहिल्यावर लगेच कितीतरी जणांचे मेसेज आले, "अंजली, तू भुभु आणला आहेस का ग ?"

अंजलीने सांगितले की, "अरे काल मध्यरात्री आमच्या घराबाहेर एका कुत्र्याच्या पिल्लूचा 'कुकु' असा आवाज येत होता. दार उघडून पाहिले तर कोणीतरी आमच्या गेटपाशी त्या पिल्लाच्या डोळ्यांना कापडाची पट्टी बांधून सोडले होते. छोटासा तो जीव कितीवेळ असाच असेल देव जाणे. त्याची पहिली डोळ्यांवरची पट्टी सोडली. ते पिल्लू घाबरून थरथर कापत होते. त्या पिल्लाची अवस्था पाहून मनातल्या मनात त्याला अशा अवस्थेत सोडणाऱ्या माणसाला दोन-चार शिव्या हासडल्या. आम्ही त्याला घरात घेतले.

मी लगेच त्याला एका छोट्या थाळीत दूध प्यायला दिले तर लगेच त्याने संपवले. किती भुकेलेले पण होते ते. त्याला ह्यांनी स्वच्छ पुसून काढले.

मुलांनी लगेच त्याच्यासाठी अंथरूण तयार केले आणि त्याला झोपवले. आता सकाळपासून आमच्या चौघांच्या अंगावर उड्या मारतंय ते. लगेच आमच्या घरात रुळलं देखील. मुलगी भुभु आहे म्हणून आम्ही तिचं नाव 'चिक्की' ठेवलं.

आज तिच्यासाठी एका डॉक्टरांना बोलावले आहे. ते थोड्या वेळाने येऊन तिचे व्हॅकसिनेशन करतील.

मला खरंच माणसांच्या वृत्तीचे आश्चर्य वाटते. अरे ते कुत्र्याचं पिल्लू म्हणजे एक जीवच आहे ना ? त्या पिल्लाला अशा अवस्थेत सोडून जाताना त्या माणसाला काहीच कसे वाटले नाही ? त्या मुक्या प्राण्यांना फक्त बोलता येत नाही, पण त्यांना देखील भावना असतातच ना ?'

अंजलीच्या मेसेजवर मनीषा म्हणाली, "अंजू खूप छान केलंस की त्या मुक्या जीवाला तुम्ही आश्रय दिलात. मनुष्यप्राण्याची वृत्तीच नीच. माणूस माणसाचा विचार करत नाही तर प्राणिमात्रांचा कुठे करणार ? हे भुभु लोकं मालकाबरोबर शेवटपर्यंत इमानाने राहतात. मनुष्य एकवेळ बेईमान होतो पण हे लोकं त्यांचं इमान सोडत नाहीत आणि तसंही मला तरी वाटतं कुत्र्याचे महागडे ब्रीड खरेदी करण्यापेक्षा अशा अनाथ भुभुना ॲडोप्ट करणे केव्हाही चांगले. त्यांना एक सुरक्षित घर मिळते, आश्रय मिळतो, प्रेम मिळते. आपण जेवढं त्यांच्यावर प्रेम करू त्यापेक्षा कितीतरी पटीने ते भुभु आपल्याला प्रेम देतात."

सगळ्यांनी ग्रुपमध्ये अंजलीचे आणि तिच्या कुटुंबाचे कौतुक केले.

भाग्यश्रीने आपल्या गावातील घराचे,

शेतातले, आपल्या सुनेचे चूल पेटवतानाचे फोटो ग्रुपवर पोस्ट केले. सगळ्यांनी भाग्यश्रीच्या सुनेचे कौतुक केले. आता भाग्यश्री एक आठवड्याने अमेरिकेला परत जाणार होती.

ग्रुपवर दुपारी राजश्रीचा मेसेज आला. तिच्या लेकाचा सुहृदचा आज बारावीचा रिझल्ट लागला होता. त्यात त्याला ९९ टक्के मिळाले होते. नेमका योगायोग असा होता की, सुहृदचा तीन दिवसांनी अठरावा वाढदिवस देखील होता. त्यामुळे मग राजश्रीने दोन्ही निमित्ताने पार्टी आयोजित केली. तिने ग्रुपमधल्या लोकांना आणि तिच्या नातेवाईकांना आमंत्रित केले.

पुन्हा ग्रुपमध्ये शंभर लोकांनी शंभर शंभर रुपये काढून दहा हजारांची रक्कम जमा केली. सुहृदच्या घवघवतीत यशाबद्दल आणि त्याच्या वाढदिवसानिमित्त त्याला गिफ्ट तर द्यायला तर हवेच होते.

राजश्रीने तिच्या बंगल्याच्या लॉनमध्ये तिच्या लेकाच्या वाढदिवसासाठी खूप छान व्यवस्था केली होती. राजश्रीचा नवरा गर्भश्रीमंत असल्याने ग्रुपमध्ये आता समजलं की राजश्रीने लग्नानंतर स्वत:चं करिअर वगैरे का केले नाही. राजश्रीने ग्रुपमध्ये कधीच जाणवून दिले नव्हते की, तिचा नवरा मोठा उद्योगपती असून लक्ष्मी त्यांच्या घरी पाणी भरते आहे आणि तिने ह्या गोष्टींचा बडेजाव सुद्धा कधीच केला नव्हता.

शाळेच्या ग्रुपमधील साठ-सत्तर मित्रमंडळी राजश्रीच्या घरी पोहोचले. येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांचे मोठ्या अदबीने स्वागत करण्यात येत होते. सगळे स्थानापन्न झाले. राजश्रीच्या नातेवाईकांमध्ये काहीतरी कुजबुज चालू होती. काय ते नक्की समजत नव्हते. फक्त कानावर इतकंच पडत होते की, 'सुहृदने किती नशीब काढलं आहे. हे सारं वैभव त्याचेच होणार. वगैरे वगैरे.' राजश्रीच्या मित्रमंडळींना त्यांच्या बोलण्याचा कसलाच संदर्भ लागत नव्हता.

सुहृदने केक कापला. सगळ्यांनी त्याला गिफ्ट दिले. राजश्रीच्या नवऱ्याने माईकवरून आलेल्या पाहुण्यांना जेवून घेण्याची विनंती केली. तेवढ्यात सुहृद म्हणाला, "बाबा मला थोडं बोलायचं आहे." सुहृदने माईकचा ताबा घेतला.

"नमस्कार, मी सुहृद. आज तुम्ही माझ्या वाढदिवसासाठी आणि मला मिळालेल्या बारावीमधील यशासाठी जमले आहात त्याबद्दल मी तुम्हा सगळ्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

मी आताच इथे काही लोकांच्या तोंडून कुजबुज ऐकली. खरं तर मला असे कान देऊन ऐकायची सवय नाही; पण काही वाक्ये कानावर आल्याने मला तुमच्याशी बोलावेसे वाटले.

मी सुहृद. मी एका अनाथाश्रमात राहत होतो. मी सात वर्षांचा असेन त्यावेळी.

अनाथाश्रमाच्या एका खोलीत कोपऱ्यात बसलो असताना मला आई–बाबांनी पाहिले आणि मला दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. आईबाबांना स्वतःचे मूल होणार नसल्यामुळे त्यांनी मूल दत्तक घेण्याचा पर्याय स्वीकारला होता.

माझ्या आईबाबांनी मला कधीच परकेपणा जाणवू दिला नाही. माझ्यावर त्यांनी एवढं प्रेम केलं की त्याची परतफेड मी करूच शकणार नाही. जेव्हा मी या घरात आलो तेव्हाचं मनाशी ठरवले होते की माझ्या आईबाबांना माझ्यामुळे मान खाली घालावी लागेल असे कुठलेही काम करणार नाही. मला माझ्या स्वतःच्या हिंमतीवर स्वतःचे अस्तित्व उभे करायचे आहे. माझे स्वप्न आहे डॉक्टर होण्याचे. पैशाअभावी ज्यांना मेडिकल फॅसिलिटी मिळत नाहीत अशांसाठी मला सर्व सुखसोयींयुक्त हॉस्पिटल उभारायचे आहे. माझ्या स्वप्नपूर्तीसाठी आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादाची मला गरज आहे.

सुहृदच्या बोलण्याने राजश्री आणि तिच्या नवऱ्याच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले होते. तसेच उपस्थितांना देखील गहिवरून आले होते.

"मी दोन शब्द बोलू इच्छितो." राजश्रीच्या नवऱ्याने माईक हातात घेतला. "आमच्या सुहृदच्या यशप्राप्तीसाठी आणि वाढदिवसासाठी आपण सगळे इथे उपस्थित राहिल्याबद्दल आपल्या सगळ्यांचे मी आभार मानतो. खरंतर आतापर्यंत आम्ही कधीच सुहृद आमचा दत्तक मुलगा आहे याची वाच्यता केली नाही; पण आपला समाज ह्या गोष्टींची सतत जाणीव करून देतो. मूल दत्तक घेण्याविषयी अजूनही समाजात उदासीनता जाणवते. मूल कुठेही जन्माला येऊ दे पण त्याला लहानपणापासून घडवलेले संस्कार ही त्याची खरी ओळख ठरते. मी जास्त बोलून आपला वेळ घेत नाही. आपण सर्वांनी जेवून घ्यावे अशी मी सगळ्यांना विनंती करतो."

सगळ्यांनी जेवण केले. सगळ्यांनाच राजश्री आणि तिच्या नवऱ्याचे खूपच कौतुक वाटले. राजश्री आणि तिच्या परिवाराचा निरोप घेऊन मित्रमंडळी घरी जाण्यास निघाली

वाटेत रस्त्यात लता म्हणाली की, "माझ्या भाचीच्या देखील लग्नाला पाच वर्षे झाली आहेत. खूप डॉक्टर करून झाले. तिला मुलांची भयंकर आवड आहे त्यामुळे ते दोघे नवरा बायको हल्लीच दत्तक मूल घेण्याचा विचार करत होते पण तिचे सासूसासरे दत्तक मूल घेण्यास नकार देत आहेत. त्यांचं म्हणणं असं आहे की, तुम्हाला स्वतःचे मूल होऊ शकते. त्या मुलाचा कुठे जन्म झाला असेल ? त्याचे आईवडील कोण असतील ? ते कुठल्या जातीचे असेल ? असा विचार ते करतात. ते त्यांची मानसिकता बदलत नाहीत.

माझ्या भाचीने आणि तिच्या नवऱ्याने त्यांना खूप समजवण्याचा प्रयत्न केला पण ते दोघे काही केल्या ऐकत नाहीत. शेवटी घरात

With best compliments from

# N.D. BANSOD

**Govt. Civil Contractor**
**Solid Waste Management**

**Nitin Deorao Bansod**
**Director**
**Mob: 7021222566 / 9594102789**

**507, Shrishti Square, Nr. Jalaram Park, L.B.S. Road, Sonapur,**
**Bhandup (W), Mumbai - 400 078.**
**Email: mr.nitinbansod@gmail.com**

**With best compliment from**

# ALL IN ONE SOLUTION

**D.R. Rikame**
**Mob: 9223510537**

**Santosh Tatkare**
**B.E. (Civil)**
**Mob: 9322266582**
**9819178167**

**Shop No.1, Sahara CHS Ltd., Opp. Ellora Building - 1, Gupte X RD., Dombivali (W)**
**H.O.: 5/3, Shri Sai Dham CHS., Near HDFC Bank, Kalwa (W), Thane - 400 605.**




PHANCODE

MOUNT AIRO

NATURE'S DIVERSITY

1 BHK SKY DECK RESIDENCES

PARTH

EXCELLENCE IS A COMMITMENT

Strategic Partner

PHANTOM ADVISORY LLP

+98 21 06 57 72

**Site Address:** Parth Lakefront, Opp. IG International & Tata Strive, Thane Belapur Road, Airoli, Navi Mumbai - 400 708.

*The project has been registered under the name Parth Lakefront via Maharera registration no. P51700018725 and is available on the website : https://maharera.mahaonline.gov.in*

वादविवाद नको म्हणून भाची आणि तिच्या नवऱ्याने शांत बसण्याची भूमिका घेतली."

आता मी स्वतः जाऊन राजश्रीचे उदाहरण त्यांना देईन. राजश्रीचा नवरा बोलला ना ते वाक्य मला खूप आवडलं, 'मनुष्य कुठेही जन्माला येऊ दे त्याची खरी ओळख त्याच्या संस्कारामुळे दिसते.' अगदी हे वाक्य मी त्या दोघांना आवर्जून सांगेन. बघू मी माझे प्रयत्न करेन त्यांना समजवण्याचे. पुढे त्यांनी त्यांचे ठरवले पाहिजे"

लताच्या बोलण्यावर मनोज म्हणाला, "लता खरंच तू तुझ्या भाचीच्या सासूसासऱ्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न कर. आज राजश्री आणि तिच्या नवऱ्याच्या विचारांचे फारच अप्रूप वाटले. लोकांनी त्यांची मानसिकता बदलायलाच हवी."

रात्री सगळ्यांनी एकमेकांना गुड नाईटचे मेसेजेस टाकले. मधेच संगीता बोलली, "बाबा निलेश, रियुनिअनचे लौकर ठरव."

निलेशने मेसेज टाकला की, 'ह्या दोन तीन दिवसांत जागा फायनल करतो.'

निलेशच्या मेसेजने पुन्हा ग्रुपमध्ये चैतन्य निर्माण झाले.

रि-युनियन ( भाग ८ )

निलेशने रियुनिअनसाठी खूप ठिकाणे सर्च केली पण अजूनही मनाजोगते ठिकाण त्याला सापडत नव्हते.

निलेशची बायको स्वाती त्याला म्हणाली, "अहो ! तुम्हाला मी काय बोलते ते पटतं का पहा. बघा हं! तुम्ही महागडे रिसॉर्ट किंवा फार्म हाऊस बुक करणार. तिथे दोन दिवस राहणार. त्यापेक्षा मला असे वाटते की, तुम्ही तुमचे डॉक्टर मित्र शशांक आणि निलिमा ह्यांच्या इथे तुमचे रियुनिअन करावे म्हणजे तुम्हाला निसर्गसौंदर्य देखील अनुभवायला मिळेल. कारण त्यांच्या घराच्या चारही बाजूने डोंगर आहेत. आता नुकताच पावसाळा सुरू झाला आहे तर सगळीकडे मस्त हिरवेगार असेल. तुमची मैत्रीण तिथल्या बायकांना मदतीला घेऊन तुम्हा सगळ्यांच्या स्वयंपाकाची सोय करू शकते.

तुम्ही सगळेजण तिथे आदिवासी बांधवांसाठी, त्यांच्या मुलांसाठी काय काय हवे आहे याची लिस्ट बनवून त्या त्या वस्तू घेऊन जाऊ शकता. जे पैसे तुम्ही रिसॉर्ट किंवा फार्म हाऊससाठी देणार तेच पैसे तुम्ही तुमच्या मित्राला देऊ शकता. तिथल्या शाळेत जाणाऱ्या मुलांना आणि तेथील बांधवांना शालोपयोगी वस्तू, कपडे, चादरी, टॉवेल, ब्लँकेट, स्वेटर, औषधे, तसेच वयात येणाऱ्या मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन ह्या सगळ्या वस्तू तुम्ही सगळे मिळून नेऊ शकता.

एक दिवस तुम्ही त्या आदिवासी बांधवांमध्ये राहा. त्यांच्या हातच्या चुलीवरील जेवणाचा आस्वाद घ्या. तुमचे डॉक्टर मित्र कशी निरपेक्ष सेवा करतात हे स्वतः बघून

अनुभव घ्या. म्हणजे काय होईल रियुनिअन पण होईल आणि समाजकार्य देखील होईल.

तिथे दोन दिवस राहायची, खाण्यापिण्याची व्यवस्था होऊ शकते का तुमच्या मित्राला विचारा. अगदीच दोन दिवस सोय होणार नसेल तर एकच दिवसाच्या रियुनिअनची व्यवस्था करा."

"आईशपथ! स्वाती तू खरंच किती हुशार आहेस ग. ही तर आमच्या एकाच्याही डोक्यात कल्पना आली नव्हती. खूप छानच कल्पना आहे ही. रियुनिअन पण होईल आणि समाजकार्य देखील होईल. मी आत्ताच तुझी कल्पना ग्रुपमध्ये मांडतो. बघू मित्रमैत्रिणी कसा प्रतिसाद देतात." निलेश खूप खूश होऊन स्वातीला बोलला.

लागलीच निलेशने ग्रुपमध्ये स्वातीचा विचार शेअर केला. निलेशच्या पोस्टवर सगळ्यांनीचं प्रचंड उत्साह दाखवला. सगळ्यांनाच स्वातीची कल्पना खूप आवडली.

निलेशने ताबडतोब डॉक्टर मित्र शशांक याला संपर्क साधला. शशांक आणि निलिमाने देखील निलेशच्या प्रस्तावाला लगेचच मान्यता दिली.

निलेशने शशांककडून त्याच्या घराचे आणि आजूबाजूच्या परिसराचे फोटो मागवून घेतले आणि ग्रुपमध्ये शेअर केले. तिथल्या निसर्गसौन्दर्याने प्रत्येकाच्या मनाला भुरळ पडली. चारही बाजूने डोंगर आणि पावसामुळे डोंगरातून वाहणारे धबधबे ह्याचे फोटो बघून सगळ्यांनी त्या ठिकाणी जाण्यास लगेच होकार दिला.

जे सहभागी होणार त्यांच्या नावाची लिस्ट काढली गेली. जी रक्कम रिसॉर्टसाठी भरली जाणार होती ती रक्कम शशांकला देण्याचे सगळ्यांनीच ठरवले होते त्याप्रमाणे सर्वांनी रक्कम जमविण्यास सुरुवात केली. रियुनिअनची तारीख ठरवण्यात आली. जवळपास पावणे-दोनशे लोकं सहभागी होणार होते.

निलेशच्या बायकोला स्वातीला ग्रुपमधून त्यांच्या रियुनिअनसाठी आमंत्रण आले. कारण तिनेच ही कल्पना मांडली होती. स्वातीने सांगितले की, "हे तुम्हा शाळेतल्या मित्रमैत्रिणींचे रियुनिअन होणार आहे. सगळे मिळून मस्त एन्जॉय करा. पुढच्या वेळी पिकनिक वगैरे ठरवाल तर मी नक्की येईन आणि तसं तर कोणाच्या लग्नसमारंभाला, वाढदिवसाला मी येतच असते. हा रियुनिअनचा दिवस तुमचा असणार आहे. सगळ्यांनी मिळून तो दिवस साजरा करा."

रात्री ग्रुपवर सुषमाचा मेसेज आला की, तिच्या सासूबाईंना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले आहे. तिच्या घराजवळ राहणारे ग्रुपमधील किरण, सुभाष आणि रवी यांनी लगेच सुषमाला मदत करण्याची तयारी दर्शवली आणि ते हॉस्पिटलमध्ये पोहचले सुद्धा.

सुषमाच्या सासूबाईंना आतड्याचा कॅन्सर झाला होता. तो आता शेवटच्या टप्प्यातला होता. डॉक्टरांनी अपेक्षा सोडल्या होत्या. शेवटी पहाटे त्यांचा मृत्यू झाला.

सुषमासाठी साहजिकच रियुनिअनची तारीख पुढे ढकलली गेली.

सुषमाच्या सासूबाईंचे कार्य पार पडले. सुषमाचा ग्रुपवर मेसेज आला,

' मित्रमैत्रिणींनो, धन्यवाद.

माझ्या सासूबाईंचे वृत्त ऐकून प्रत्यक्षपणे, अप्रत्यक्षपणे आमच्या कुटुंबाला धीर दिलात, आमचे सांत्वन केले याबद्दल मी तुमची ऋणी आहे. आपली रियुनिअनची तारीख माझ्यासाठी पुढे ढकलण्यात आली त्याबद्दल मी तुम्हा सर्वांची दिलगिरी व्यक्त करते.

असं म्हणतात की गेलेल्या व्यक्तीबद्दल वाईटसाईट बोलू नये; पण मी माझ्या सासूबाईंबद्दल तुम्हाला सांगणार आहे. माझ्या सासूबाई अतिशय कर्मठ विचारांच्या होत्या. खूप सोवळे – ओवळे त्या पाळत असत. दुसऱ्या जातीचा किंवा धर्माचा त्या अनादर करत.

आमच्या घरी देवाची पूजा सोवळ्यात. मग गौरी येतात त्या देखील सोवळ्या ओवळ्यातल्या. ब्राम्हण स्त्रीशिवाय इतर जातीतल्या बायकांना आमच्या गौरीजवळ जाण्यास सासूबाईंचा मज्जाव असायचा. चुकून एखादी परजातीतली स्त्री गौराईजवळ गेलीच तर पूर्ण घरभर त्या गोमूत्र शिंपडत. मला त्यांचे असे वागणे कधी रुचलेच नव्हते. माझ्या माहेरी इतके निर्बंध कधीच नव्हते. सगळ्या जातीधर्मांच्या मैत्रिणी माझ्या घरी यायच्या. माझी आई सगळ्यांचे प्रेमाने करत असे. सगळ्यांना प्रेमाने खाऊपिऊ घालत असे.

सासूबाईंच्या अशा वागण्याने खूप घुसमट व्हायची माझी. घरात पूर्णतः सासूबाईंचे राज्य त्यामुळे त्यांना कोणीचं कधीचं काही बोलले नव्हते तर मी काय बोलणार बापडी ? मनात कितीतरी वेळा बंड पुकारले जायचे पण सासूबाईंसमोर तोंड उघडणे कधीच जमलेचं नाही. माझ्या चुलतदिराने मराठा जातीतल्या मुलीशी प्रेमविवाह केला तर त्याला लग्नानंतर सासूबाईंनी घरी बोलावले नाही. तरी तो बिचारा काकुला भेटायला म्हणून घरी आला तर त्याच्या बायकोशी माझ्या सासूबाई बोलल्या सुद्धा नाहीत ! नवीन नवरी घरी आली आहे म्हणून मी घाबरत घाबरत तिची ओटी भरली. ते लोकं गेल्यावर सासूबाईंनी मला मी तिची ओटी भरली म्हणून केवढेतरी सुनावले ! कधीतरी त्यांच्या विचारांमध्ये बदल होईल या आशेवर मी दिवस ढकलले.

आणि तो दिवस आला. त्यादिवशी सासूबाई तोल जाऊन बाथरूममध्ये पडल्या आणि बाथरूममधील नळ डोक्याला आपटून त्यांना भली मोठी खोक पडली. सासूबाई

रक्तबंबाळ झाल्या होत्या. दुपारची वेळ असल्याने घरात माझ्याशिवाय कोणीच नव्हते. शेजारीपाजारी देखील कामावर गेले होते. मी घाबरून गेले होते. फॅमिली डॉक्टरांना फोन केला तर त्यांनी लगेचच हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करायला सांगितले. आमच्या मजल्यावरचे खानचाचा माझ्या मदतीला धावले. अँब्युलन्सची वाट न पाहता त्यांनी त्यांच्या मुलाला मदतीला घेऊन सासूबाईंना त्यांच्या गाडीच्या मागच्या सीटवर अलगद झोपवले आणि ताबडतोब वेगाने गाडी हॉस्पिटलच्या दिशेने नेली.

हॉस्पिटलपर्यंत पोहोचेपर्यंत सासूबाईंना जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. त्यामुळे त्यांना रक्त चढवावे लागले.

त्या पूर्ण बऱ्या झाल्यावर मी त्यांना जाणीव करून दिली की, आई! तुम्ही जातपात, धर्म यांचा आत्तापर्यंत अवडंबर केला. जेव्हा तुम्ही रक्ताच्या थारोळ्यात होता तेव्हा खानचाचांनी तुम्हाला त्यांच्या गाडीतून हॉस्पिटलमध्ये नेले. खानचाचांच्या कुटुंबाचा कायम तुम्ही दुस्वास केला तरी त्यांनी माणुसकी दाखवली. तुम्हाला पाच रक्ताच्या बाटल्या चढवाव्या लागल्या. ते रक्त कुठल्या जातीधर्माच्या माणसाचे होते ते ठाऊक नाही पण त्याचं रक्ताने तुम्हाला जीवनदान मिळाले. आई आतातरी तुमचे विचार बदला. माणुसकी हाच खरा श्रेष्ठ धर्म आहे.

माझ्या बोलण्याने त्या अंतर्बाह्य बदलल्या. आता आमच्या घरातील पदार्थ खानचाचांच्या घरी जाऊ लागले. त्यांच्या शिराकुर्म्याने आमच्या घराचा उंबरठा ओलांडला. इतकंच काय तर गणपतीच्या दिवशी आमच्या पंगतीत त्यांच्या कुटुंबाला मानाने जेवायला बसवले.

आईंना कॅन्सर डिटेक्ट झाला तेव्हा देखील खानचाचा आमच्या मदतीला धावले.

मी हे सारं सांगण्याचा उद्देश म्हणजे, ज्या माझ्या सासूबाई अतिशय कर्मठ विचारांच्या होत्या त्यांचे मतपरिवर्तन अशा प्रकारे झाले होते. आता मला माझ्या घरात मोकळा श्वास घेता येत होता कारण त्यांनी त्यांचे सोवळे ओवळे बाजूला ठेवले होते. त्यांनी नंतर माणुसकी धर्म जपला. आमच्या मदतनीस बाईंच्या मुलाला जेव्हा दहावीमध्ये ७९% मिळाले तेव्हा त्याच्या शिक्षणासाठी सासूबाईंनी त्याला कायम प्रोत्साहन दिले. त्याच्या शिक्षणाचा खर्च उचलला. आज तो मुलगा ग्रॅज्युएट होऊन एका चांगल्या कंपनीमध्ये कामाला आहे.

खानचाचांच्या मुलीचे लग्न ठरले तर तिला सासूबाईंनी घसघशीत माहेरचा आहेर दिला. तिचे अगदी साग्रसंगीत केळवण देखील केले.'

सुषमाचा मेसेज वाचून सगळ्यांनी 'माणुसकी धर्म हाच खरा धर्म' अशी प्रतिक्रिया दिली.

सुषमाच्या सासूबाईंचे निधन होऊन आता एक महिना लोटला होता. आता पुन्हा सगळ्यांना वेध लागले होते रियुनिअनचे. निलेशने तीन बसेस बुक करून ठेवल्या होत्या. बसमध्ये बसून मनाने तर प्रत्येक जण रियुनिअनच्या ठिकाणी पोहचला देखील होता!

रि-युनियन (भाग ९)

निलेशने आदिवासी बांधवांना कुठल्या गरजेच्या वस्तू हव्या आहेत ते शशांक आणि निलिमाला विचारून घेतले. शशांक आणि निलिमाला आपल्या ग्रुपमधील लोकांच्या सेवाभावी वृत्तीने भरून आले. शशांकने गरजेच्या वस्तूंची यादी निलेशला पाठवली. निलेशने ती लिस्ट ग्रुपमध्ये पाठवली आणि दहा- दहा लोकांचा ग्रुप तयार करून प्रत्येक ग्रुपला वेगवेगळ्या वस्तू आणायला लावल्या. त्यामुळे एकदम शिस्तबद्ध काम पार पडले. प्रत्येकाने स्वेच्छेने आदिवासी बांधवांना, त्यांच्या मुलाबाळांना भरपूर प्रमाणात खाऊ देखील घेतला.

आता रियुनिअनसाठी फक्त चार दिवस उरले होते. ग्रुपमध्ये कमालीचा उत्साह ओसंडून वाहत होता.

निलेशने सगळ्यांना सोयीस्कर असे एक ठिकाण ठरवले. तिथून तीन बसेस सुटणार होत्या. सकाळी सातची वेळ ठरवली म्हणजे आठपर्यंत तरी ग्रुपमधील सदस्य पोहचतील या हिशोबाने. मुंबईहून पालघरला जायचे असल्याने गोरेगाव, बोरिवली, मिरारोड, भाईंदर, वसई, विरार येथे राहणाऱ्या सदस्यांना जाता जाता पिकअप केले जाणार होते. त्या सदस्यांना कुठे उभे राहायचे हे ठिकाण देखील निश्चित करण्यात आले होते. निलेशने कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुंदर पद्धतीने केले होते.

अखेर रियुनिअनचा दिवस उजाडला. सकाळीच अमेरिकेतील सदस्यांचा ग्रुपवर मेसेज आला की, "सगळ्यांनी खूप मज्जा करा. आम्ही पुढच्यावेळी येऊ तेव्हा सगळे पुन्हा भेटू." सगळ्यांनी त्यांना 'मिस यू' चे मेसेज पाठवले. प्रत्येकाला विलासची आठवण आल्याशिवाय राहवले नाही.

एक एक करत सगळे सदस्य साडे-सात वाजेपर्यंत नियोजित ठिकाणी पोहचले. एकटी अंजली अद्याप आली नव्हती. तिची सगळेजण वाट पहात होते. शेवटी पाऊणे-आठ वाजता धापा टाकत अंजली पोहचली एकदाची.

"अरे निलेश! सॉरी सॉरी. माझी चिक्की मला सोडत नव्हती रे. तिला समजलं ना मी कुठेतरी चालले आहे तर सकाळपासून माझ्या मागेमागेचं फिरत होती. मी जेव्हा घराबाहेर पडले तर माझ्या मागे चालायला लागली. मग ह्यांनी कसंतरी तिला फसवून घरात नेले. तेव्हा मी कुठे येऊ शकले. तिला माझीच सवय आहे ना रोजची. आज काय करेल काय माहीत? ती आल्यापासून मी कधीच एवढा वेळ बाहेर राहिले नाही ना?

अंजलीने बडबड करून एक दीर्घ श्वास घेतला.

"अग मग तुझ्याबरोबर तुझ्या चिक्कीला पण आणायचं ना. एवढी लोकं होती तिला सांभाळायला. तुझ्या नवऱ्याला पण सुट्टी घ्यावी लागली नसती." निलेश अंजलीला म्हणाला.

"अरे! ती सहज आली असती तर आणलं असतं तिला. खूप भित्री आहे ती. सोसायटीच्या गेटच्या बाहेर जात नाही. फक्त सोसायटीच्या आवारात फिरते आणि इतक्या माणसांना बघून थरथर कापत बसली असती. माझा भित्रा ससा आहे रे."

"बरं! सगळे आले आहेत ना ? कोणी राहिलं नाही ना बघा. की मी हजेरी घेऊ?" निलेशने विचारले.

"अरे निलेश! आता लक्षात आलं, संजय नाही आला आहे. थांब मी त्याला फोन करतो." महेशने संजयला फोन लावला तर त्याच्या बायकोने फोन उचलला आणि ती बोलली, हॅलो! मी संजयची बायको बोलते आहे. रात्री ह्यांच्या खूप पोटात दुखायला लागलं म्हणून हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले आहे. कोणाचा हिरमोड होऊ नये म्हणून ह्यांनी मुद्दाम कोणाला फोन करून सांगितले नाही. ग्रुपमधून सकाळी फोन येईल ही त्यांना खात्री होती. फोन आला की सगळं सांग असे ह्यांनी मला सांगून ठेवले होते. ह्यांनी सगळ्यांना निरोप दिला आहे की, मला येता येणार नाही म्हणून कोणीही वाईट वाटून घेऊ नका. छान एन्जॉय करा. पुढच्या वेळी मी नक्की येईन."

"वहिनी, संजय आता कसा आहे? कशामुळे त्याच्या पोटात दुखत होते? काय बोलले डॉक्टर? काही काळजीचे कारण आहे का? आम्ही रद्द करू का आमचे जाण्याचे?" महेशने हळहळ व्यक्त केली.

"भाऊजी, काळजी करण्याचं कारण नाही. त्यांना किडनीस्टोन झाला आहे. त्यामुळे त्यांच्या पोटात दुखत होते. डॉक्टरांनी पेन किलरचे इंजेक्शन दिले आहे त्यामुळे आता दुखणे थांबले आहे आणि आता त्यांना झोप देखील लागली आहे. तुम्ही सगळे खुशाल जा."

महेशने ग्रुपमध्ये संजयबद्दल सांगितले तर सगळ्यांनाच वाईट वाटले. संजयने किती उत्साहाने रियुनिअनसाठी पैसे भरले होते. निलेशने संजयच्या बायकोला फोन केला आणि काही मदत हवी आहे का असे विचारले. जे लोकं रियुनिअनसाठी वैयक्तिक कारणामुळे येऊ शकणार नव्हते त्यांच्यापैकी कोणालातरी निलेशने संजयसाठी वेळात वेळ काढून भेटायला जाण्यास सांगितले.

निलेश, संदीप आणि संतोषने तीन बसेससमोर नारळ फोडले. सगळेजण बसमध्ये स्थानापन्न झाले. 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय.' 'गणपती बाप्पा मोरया.' सगळ्यांनी गजर केला आणि बसेस सुटल्या. जशा बस सुटल्या तशा हौशी महिलावर्गाने खाऊचे डब्बे

काढायला सुरुवात केली. महिलावर्गाने पहाटे उठून पदार्थ बनवले होते. मेथीचे ठेपले, थालीपीठ, साबुदाण्याची खिचडी, अळूवडी, कोथिंबीरवडी, इडली-चटणी, शिरा, पोहे, उपमा, बेसनलाडू अशा पदार्थांची रेलचेल होती. काहींजणींनी फरसाण, केक, चिवडा, बाकरवडी, वेफर्स, बिस्किटे असा सुका खाऊ भरपूर आणला होता.

सगळ्यांचे उदरभरण झाल्यावर सगळ्यांना चहा-कॉफी पिण्यासाठी बसेस थांबविण्यात आल्या. चहा-कॉफी पिऊन सगळ्यांना तरतरी आली. सगळेजण पुन्हा आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. आता बसमध्ये सुरू झाला अंताक्षरीचा खेळ. पुरुषांच्या विरुद्ध महिला अंताक्षरीचा खेळ रंगला. साहजिकच खेळात महिलाच आघाडीवर होत्या.

आता बसेस पश्चिम द्रुतगती महामार्गाला लागल्या. पहिली गोरेगावला मेघना चढली. मेघनाने सगळ्यांसाठी तिच्या इथली फेमस गरमागरम जिलेबी आणली होती. तिने जिलेबीचे दोन मोठे पुडे दोन बसमध्ये दिले आणि एक पुडा हातात ठेऊन ती बसमध्ये चढली. सगळेजण गरमागरम जिलेबी खाऊन तृप्त झाले होते.

नंतर बोरिवली, दहिसर, नायगाव, वसई, विरार येथील एक एक करून सदस्यांना पिकअप करण्यात आले. विरार आले तसे मधेच नीतिनला आठवले की ऑन द वे एक वृद्धाश्रम आहे आणि तिथे शाळेतले राणे सर सपत्नीक राहतात. नीतिन त्यांना एक दोनदा जाऊन भेटला होता. नीतिनने निलेशला आपण सगळे सरांना भेटून पुढे जाऊ अशी विनंती केली. त्याप्रमाणे तिन्ही बसेस वृद्धाश्रमासमोर थांबवण्यात आल्या. आपल्या शाळेतल्या इतक्या विद्यार्थ्यांना पाहून राणे सरांना भरून आले. काही विद्यार्थी राणे सरांचे प्रचंड लाडके होते. त्यांना सरांनी नावानिशी ओळखले. निलेशने सरांना रियुनिअनची कल्पना सांगितली. शशांक आणि निलिमाच्या कार्याची माहिती दिली. सरांना रियुनिअनची कल्पना आवडली. शशांक आणि निलिमाचा त्यांना अभिमान वाटला. सरांनी सगळ्यांना त्यांच्या पत्नीची ओळख करून दिली.

ग्रुपमधील सदस्यांनी ताबडतोब पैसे जमा करून दहा हजारांची रक्कम वृद्धाश्रमाला डोनेशन म्हणून दिली.

राणे सर वृद्धाश्रमात का राहतात हाच सगळ्यांना प्रश्न पडला होता. सरांनी प्रत्येकाच्या मनातला प्रश्न ओळखला आणि ते स्वतःहून सांगू लागले, "मी वृद्धाश्रमात का राहतो हा प्रश्न तुम्हाला सगळ्यांना पडला आहे ना ? मी त्याचे उत्तर तुम्हाला देतो. माझी दोन्ही मुले अमेरिकेत राहतात. आम्हा दोघांना ते तिकडे कायमचे वास्तव्य करायला सांगतात, पण आम्हाला परदेशात करमत नसल्याने आणि भारत सोडून जायचे नसल्याने आम्ही दोघांनी स्वखुशीने इथे वृद्धाश्रमामध्ये

येण्याचा निर्णय घेतला. आम्ही दोघे म्हातारे. आम्हाला पाहणार कोण? आमची काही दुखलं खुपलं तर सेवा कोण करणार? घर आहे स्वत:च पण त्या घरात आम्ही दोघेचं. बोलून बोलून किती बोलणार एकमेकांशी? आजूबाजूला माणसे हवीतच ना? म्हणून आम्ही आमचे राहते घर भाड्याने दिले आणि दोघांनी इथे येण्याचा निर्णय घेतला. तसंही आम्हा दोघांना पेन्शन पण येते. मुलांवर अवलंबून राहायला लागत नाही.

ह्या वृद्धाश्रमात छान घरासारखे वातावरण आहे. सगळ्या वृद्धांची चांगल्या प्रकारे काळजी घेण्यात येते. इथे एक डॉक्टर आमच्यासाठी चोवीस तास तैनात असतात. सकाळी उठल्यावर व्यायाम, मेडिटेशन घेतले जाते. नाश्ता, दोन वेळेचे जेवण अतिशय सुग्रास असते. दर महिन्याला आमचे मेडिकल चेकअप होते. इनडोअर, आऊटडोअर गेम खेळायला मिळतात. संगीत ऐकण्यासाठी, टी. व्ही. पाहण्यासाठी, पुस्तके वाचायला वाचनालाय अशा बऱ्याच सुविधा आहेत. सगळे समवयस्क असल्याने आम्ही सगळे मिळून खूप मज्जा करतो. एकमेकांशी मनमोकळेपणाने हितगुज करतो. वर्षातून एकदा आमची पिकनिक नेतात. एकंदर खूप छान जीवन चालले आहे आमच्या दोघांचे. आमची मुले त्यामुळे निर्धास्तपणे परदेशात राहू शकतात."

सरांचा निर्णय सगळ्यांनाच आवडला. सरांचा, त्यांच्या पत्नीचा, तसेच आश्रमातील इतर सदस्यांचा निरोप घेऊन सगळेजण आश्रमाच्या बाहेर पडले आणि बसमध्ये बसले. बसेस आता पालघरच्या दिशेने धावू लागल्या.

रि-युनियन ( भाग १० )

तिन्ही बसेस आता दुपारी साडे-बाराच्या सुमारास पालघरला शशांकच्या घराजवळ पोहचल्या. सगळे बसमधून उतरले. प्रवेशद्वारावर एक मोठी सुंदर रांगोळी काढली होती आणि 'वेलकम' असे मोठ्या अक्षरात फुलांनी लिहिले होते. शशांकने त्याच्या अंगणात मोठा मंडप घातला होता. तिथे सगळ्यांसाठी टेबल खुर्च्या मांडून ठेवल्या होत्या.

शशांक आणि निलिमा सगळ्यांच्या स्वागतासाठी दारातच उभे होते. सर्वांना शशांक आणि निलिमाला पाहून खूप आनंद झाला. सगळेजण खुर्च्यांवर बसल्यावर प्रत्येकाला कोकम सरबत दिले गेले. सगळ्यांच्या गप्पांना उधाण आले होते. निलेशने राणे सरांबद्दल शशांकला सांगितले आणि सरांना त्याच्या कार्याची माहिती सांगितली हे देखील सांगितले. राणेसरांनी शशांकला भेटण्यासाठी बोलावले आहे हे देखील सांगितले. त्यावर शशांक म्हणाला की, "मी नक्की राणेसरांना भेटायला जाईन."

सगळ्यांनी शशांकचे घर बघितले. शशांकचे घर गावातल्या घरांसारखे कौलारू

होते. शशांक आणि निलिमाच्या घरातचं दोघांचा दवाखाना होता. शशांकच्या दोन मुलांसाठी खाऊ नेला होता तो मुलांच्या हातात दिला.

बरोबर दीड वाजता निलिमाने सगळ्यांना जेवून घेण्याची विनंती केली. निलिमाने आदिवासी स्त्रियांना मदतीला घेऊन शाकाहारी–मांसाहारी स्वयंपाक करून ठेवला होता. सगळ्यांनी चुलीवरील जेवणावर यथेच्छ ताव मारला. शाकाहारी जेवणात निलिमाने दारात लावलेल्या विशेषतः रानभाज्या होत्या तर मांसाहारी जेवणात मटण होते. ज्वारीच्या तसेच तांदळाच्या भाकऱ्या देखील होत्या.

जेवणानंतर तर सगळेचं सुस्तावले होते पण सगळ्यांनाच शशांकचे गाव पहायचे होते. गावाला चारही बाजूने डोंगर लाभलेले होते. त्यात पावसाळ्याचे दिवस म्हणून मुक्तहस्ताने निसर्गाने हिरव्या रंगाची उधळण केली होती.

शशांक आणि निलिमाने त्या आदिवासी भागात ग्रामपंचायतद्वारे बरीच सुधारणा केली होती. गावची वस्ती फार मोठी नव्हती. जेमतेम पाच–सहा हजार लोकवस्ती होती. मुलांसाठी शाळेची सोय केली होती, तसेच निलिमा प्रौढशिक्षण वर्ग देखील चालवत होती. निलिमाने आदिवासी भगिनींना पापड, कुरडई बनविण्यासाठी कुटिरोद्योग सुरू केला होता तर शशांकने आदिवासी बांधवांना बांबूपासून वस्तू बनविण्याचा लघुउद्योग सुरू करून दिला होता. आदिवासी बांधवांना स्वछतेचे महत्त्व पटवून दिल्याने गावातील परिसर अतिशय स्वच्छ होता. पाण्यासाठी विहिरी बांधून घेतल्या होत्या. तसेच शुद्ध पाण्याची पाणपोई देखील सर्वत्र होत्या. प्रत्येकाच्या घरात गोबर गॅस पोहोचला होता. गावात एक छोटेसे हॉस्पिटल सुद्धा शशांकच्या खटपटीने बांधले होते. शशांकने गायीचे महत्त्व तिथल्या रहिवाशांना पटवून दिले होते ते म्हणजे 'गाय ही केवळ दूध देत नाही, तर तिच्या शेणाच्या गोवऱ्या, तसेच गोमूत्र देखील फार उपयुक्त असते. बाजारात मोठ्या प्रमाणात त्याची मागणी असते.' म्हणून एका घरात एक गाय दिसून येत होती.

वास्तविक पाहायला गेलं तर मुंबईपासून किती जवळ होता तो विभाग पण मुंबईसारख्या सुविधा तिथे उपलब्ध नव्हत्या. तरी शशांक आणि निलिमाने एक आदर्श गाव निर्माण केले होते. सगळ्यांना शशांक आणि निलिमाच्या कार्याचे कौतुक वाटले.

एवढी माणसे मुंबईतून आपले गाव पाहायला आले आहेत याचे तिथल्या लोकांना फार मोठे अप्रूप वाटत होते.

गावातून थोड्या अंतरावर एक धबधबा होता. शशांक आणि निलिमा सगळ्यांना त्या ठिकाणी घेऊन गेले. प्रचंड उत्साहात लहान होऊन धबधब्याखाली सगळे मनमुरादपणे खेळले. सगळ्यांनी भरपूर प्रमाणात फोटो काढले. मधेच ढग भरून येत असल्याने सगळीकडे धुके देखील पसरत होते.

वेगवेगळ्या जातीची फुले, वेगवेगळ्या जातीचे पक्षी, रंगीबेरंगी फुलपाखरे तिथे पाहायला मिळाली. निसर्गाच्या सानिध्यातून बाहेर पडावेसे कोणालाच वाटत नव्हते.

बरोबर पाच वाजता सगळेजण शशांकच्या घराकडे परतले. निलिमाने सगळ्यांसाठी आले घातलेला चहा बनवला. चहा पिऊन सगळ्यांना तरतरी आली. आता सर्वजण पुन्हा मुंबईला परत जाण्याची तयारी करू लागले.

निलेशने मित्रांच्या मदतीने आदिवासी बांधवांना गरजेच्या वस्तू, भेटवस्तू, खाऊ आणला होता तो शशांककडे सुपूर्द केला. पावणे-दोनशे सदस्यांनी प्रत्येकी हजार रुपये जमा केले होते ते एक लाख पंचाहत्तर हजार रुपये शशांकला देण्यात आले. शशांक आणि निलिमाला सगळ्या मित्रमैत्रिणींचे प्रेम पाहून भरून आले. शशांक पैसे घेण्यासाठी तयार नव्हता, पण निलेशने त्याला सांगितले की, ही रक्कम तू तुझ्या गावाच्या कल्याणासाठी वापर तेव्हा ते त्याने घेतले.

सगळेजण मुंबईला जाण्यासाठी निघाले तर निलिमाने प्रत्येकाला हव्या तेवढ्या रानभाज्या, ताजी वांगी, अळूची पाने, हिरव्या मिरच्या, कडीपत्ता पिशवीत भरून दिले. प्रत्येकाला शेतातले दोन किलो तांदूळ दिले. सगळ्यांना गावची भेट खूप आवडली.

निलेश शशांकला म्हणाला, "मित्रा! खूप छान वाटले तुझे गाव पाहून. तू आणि निलिमाने आम्हा इतक्या जणांचा खूप सुंदर आदरसत्कार केलात. तुम्हा दोघांचे कार्य पाहून आम्ही सगळे भारावून गेलो आहोत. गावामध्ये तुम्ही अनेक सुविधा निर्माण केल्या. हे कार्य म्हणजे कोणी ऐऱ्या-गैऱ्याचे काम नव्हे. तुम्ही दोघे मुंबईसारख्या शहरात लहानाचे मोठे झालात पण मुंबईसारखे जीवन सोडून एका आदिवासी पाड्यात येऊन राहायचे, तिथे समाजकार्य करायचे खरोखरच किती तुम्ही दोघांनी कष्ट उपसले असतील? तुमच्या दोघांच्या कार्याला आमचा सलाम. असेच कार्य करण्यासाठी तुम्हाला बळ मिळो, तुमच्या पुढील वाटचालीसाठी तुम्हा दोघांना आम्हा सर्वांकडून अनेक शुभेच्छा."

निलेशचे बोलणे ऐकून शशांक आणि निलिमाला भरून आले. शशांक सगळ्या मित्रमैत्रिणींना उद्देशून म्हणाला, "तुम्ही सगळे आलात आम्हाला खूप आनंद झाला. आम्ही दोघे आमच्या कामात व्यस्त असल्याने तुम्ही दुसरीकडे जर रियुनिअन करायचे ठरवले असते तर कदाचित आम्ही दोघे उपस्थित राहू शकलो नसतो, पण तुम्ही सगळे इथे आलात, सगळ्यांना आम्ही दोघे भेटू शकलो, तुम्हा सगळ्यांबरोबर वेळ घालवू शकलो यासाठी तुम्हा सगळ्यांचेच खूप खूप आभार. तुम्ही आमच्या गावातील बांधवांना स्वेच्छेने गरजेच्या वस्तू आणल्या, त्यांच्यासाठी भरपूर प्रमाणात खाऊ आणलात, समाजकार्यासाठी रक्कम दिलीत यासाठी आम्ही दोघे तुम्हा

सर्वांचे ऋणी आहोत. असेच इथे सगळे येत राहा.

आज आमच्या दोघांचाही दिवस फारचं छान गेला. आम्हालाही तुम्हा सगळ्यांबरोबर एन्जॉय करता आले. शाळेचे दिवस आठवले. पुन्हा लहान झाल्यासारखे वाटले. खरंच असा एक दिवस आपल्या आयुष्यात जरूर यावा. इथे दोन दिवसांसाठी तुमची सगळ्यांची सोय होऊ शकली नाही यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो पण माझ्या घराचे दार तुम्हा सर्वांसाठी कायम उघडेच असेल याची खात्री बाळगा. असेच इथे येत राहा, तुमच्या फॅमिलीला घेऊन या. आम्हा दोघांना अतिशय आनंद होईल."

सगळ्यांनाचा शशांक आणि निलिमाचा निरोप घेताना भरून आले होते. जड मनाने सगळे बसमध्ये जाऊन बसले आणि बसेस मुंबईच्या दिशेने निघाल्या. प्रत्येकाने निलेशचे कौतुक केले कारण निलेशने रियुनिअनची अतिशय चोख व्यवस्था केली होती. प्रत्येक कामाचे आखणीबद्ध नियोजन केले होते.

रात्री नऊ–दहाच्या सुमारास सगळेजण आपापल्या घरी पोहचले. आपापल्या घरच्या लोकांना पूर्ण दिवसाची गंमत सांगण्यात प्रत्येकाचा वेळ गेला. नंतर बऱ्याच लोकांनी ग्रुपमध्ये आजच्या दिवसाचे फोटो शेअर केले. जे लोकं रियुनिअनसाठी येऊ शकले नव्हते ते फोटो पाहून हळहळले.

निलेश घरी येऊन फ्रेश झाला आणि तडक संजयला हॉस्पिटलमध्ये भेटायला गेला. त्याने संजयच्या तब्येतीची चौकशी केली.

ग्रुपमध्ये आज सगळेजण खूश होते. रियुनिअनच्या निमित्ताने आज सगळे एकत्र आले होते. केवळ पंचवीस–तीस सदस्य येऊ शकले नव्हते.

सामाजिक बांधिलकी जपत, एकमेकांबरोबर मैत्री जपत ग्रुप दिवसेंदिवस अधिकाधिक परिपक्व बनत होता. कोणाच्या मुलांची लग्न, कोणाच्या नातवंडांची मुंज, बारसे, पिकनिक ह्या निमित्ताने सगळे एकत्र येत होतेचं आणि ह्या त्या कारणांनी ग्रुपमध्ये रियुनिअन होतचं होते. ग्रुपमधून शाळेसाठी पण भरघोस देणगी देण्यात आली. ज्या मुलांना शिक्षणाची आवड आहे पण पैशा अभावी शिकू शकत नाही अशा मुलांसाठी ग्रुपमधील सदस्यांतर्फे शाळेला निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

केवळ शाळेतल्या मित्रमैत्रिणींचा ग्रुप न राहता आता त्याला एक कौटुंबिक स्तर निर्माण झाला होता. इतके सुंदर मैत्रीचे बंध निर्माण झाले होते. ग्रुपमध्ये कोणालाही मदतीचा हात हवा असल्यास त्या व्यक्तीला ग्रुपमधून ताबडतोब मदत केली जाई. अशी ही मित्रमैत्रिणींची निखळ मैत्री, प्रेम दिवसेंदिवस दृढ होत चालले होते.

## With best compliment from

MFS

# MAMTA
# FIRE SERVICES

COMPLETE FIRE PROTECTION

Recognised by Director
Maharashtra Fire Services
Licence No.MFS/LA/RF-0068
MFS/LA/D-0360

Prop:- R.D.Sharma (Retd.Indian Navy)

Resi Cum Office: A-202, Tulsi Mangal, Plot No.51, Sector 12, Kharghar, Navi Mumbai-410210
Ph.: 9867167665/7045233835
E-mail: mamtafireservices@gmail.com /rd_sharma25@yahoo.com
Web.: www.mamtafireservices.com

## With best compliment from

# Venu

Atul Gujare
Mob:98198 26629

ARTS & PRINT

Screen Printing
Offset Printing
Stationery Suppliers

1, Krishna Apt., Patwardhan Wada, Opp. Joshi Wada,
Uttam Angre Marg, Charai, Thane (W)-1.0-25366629

*With best compliments from*

Gautam Dev (C.E.O)

**Aaradya Enterprises**

Government approved

Mobile: 9833709709

---

Dattanagar, Ghansoli, Navi Mumbai - 400701

Tel. 8108978607

email - aaradya.en@gmail.com

www.aaradyaenterprises.com

**With best compliments from**

**Mukesh Joshi**
**9321 478 429**
**022 3203 3101**

# OM SAI FIRE PROTECTION


**Maharashtra Govt. License No. MFS-LA/RF-0326**
**omsaifire protection of@gmail.com**

---

**H. No.1084, At- Jawale Post, Gavhan, Ulve Node, Navi Mumbai.**
**Email:info_omsaifireprotection.com**

## चारोळ्या

थिरकत्या माझ्या पायाला,
धुंद स्वरांची जडली बाधा
कृष्णाच्या मुग्ध बासरीवर,
धुंद होऊनी नाचली राधा



अशी ही कातरवेळ
सुटत जातो किनारा
दूर कुठे साद घालितो
रक्ताळलेला वांझ वारा

**-कल्पना मापूसकर**

## वास्तुटीप्स

# सेप्टिक टॅंक

**१)सेप्टिक टॅंक नेहमी पश्चिम व वायव्य भागात पाहिजे.**

**२)टॅंक म्हणजे खड्डा. खड्डा पूर्ण भरलेला असतो. सूर्याची किरणं पडतात तेव्हा त्याचा दूषित भाग स्वच्छ करण्याचं काम इन्फ्रारेड किरणं करतात.**

**३)पूर्व, उत्तर, ईशान्य भागात जर tank आला तर आरोग्याच्या तक्रारी वाढतात. Health Problem वाढतात. पैशाचा Problem होतो. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. मुलांचा ग्राफ खाली घसरत जातो, अवाढव्य खर्च, कोणी कोणालाच जुमानणार नाही. अपघात होणार.**

**४)ब्रह्मस्थानात पाण्याची टाकी आली तर आत्महत्या, अपघात, संकटाची मालिका चालू राहणार.**



# काव्यसृष्टी

## कात मी टाकली ....

आज ऊर्मी नवी अंतरी जागली
विसरुनी वेदना कात मी टाकली...

शांत जी झोपली सोडुनी काळजी
माणसे ती मला का सुखी भासली ?

मोकळी वाटली चालता बोलता
वागताना कशी बेरकी वागली

ह्या स्वभावामुळे फार साध्या अशा
ठेच मोठेपणी चांगली लागली !

सोसली जीवनी मी किती वादळे
भोवती संकटे तर उभी ठाकली !

लागली सारखी आग दोघांतही
का तरी भेट तू आपली टाळली ?

माळली सायली काल केसात तू
मी फुले पुस्तकी तीच सांभाळली !

**स्मिता हर्डीकर**

## स्वान्त सुखाय !

बोहल्यावर चढलो मुहूर्ताला बऱ्याच वर्षांपूर्वी
शंका-कुशंका मनात नि गुर्मी तारुण्याची सर्वी
हात घेता हातात सखीचा मिटल्या सर्व शंका
येता जवळ लग्नघटिका वाजला सर्वत्र डंका

नवरा-बायको होतो आधी आता झाली मैत्री
'एकदुजाविन जगणे नाही' आता झाली खात्री !
तुझे नि माझे सरले सारे, सरले वादळी वारे
उघडी सगळी गूढ मनांची सर्व खिडक्या दारे

स्वान्त सुखाय जगणेच आता इच्छा दुजी नाही
संसारवेल अशी बहरली मागणे न आता काही
गंध दरवळे दारी फुलांचा व्यापल्या दिशा दाही
आनंद मनी आनंद जनी पुण्याचा मी भारवाही

कितीक वर्षे सरली उरली कितीक आता जनी
भरकटलो कधी या जीवनी साथ होती सजनी
वळून कधी पाहता मागे नवल वाटे आज मनी
येऊन पोहोचलो सुस्थळी सुदैवाचे आम्ही धनी !

**प्रा. अरुण पाटील**

# जगलोच नाही

देह सोडल्यावर आत्महत्यास
वेदना कधीच न व्हाव्यात
ती अतृप्तता विना देहाची
इच्छा अपूर्ण न रहाव्यात
म्हणूनी.....................
जगावे असे करावे सोने क्षणाचे
रहावी ना मागे कोणतीच इच्छा
हसावे खेळावे शब्दांमधूनी
समाधान मिळवावे एवढीच इच्छा
कारण........................
इथेच जन्म अन् इथेच मरण
देह ही क्षणीक नश्वर आहे
साठा संचयही वाहून जाता
सोबत पुरवेल ती माणूसकी आहे
पण आपण समजतो............
कुणी कमी तर कुणी वाईट
ज्याचे त्याचे मतभेद सारे
हजारो चेहरे विभिन्न असताना
का जगावे कुणी कुणाच्या मना सारे
आणि मग म्हणतो.............
अहंकार मत्सर लोभ धरुनी
क्षण प्रेमाचे बसलो गमवूनी
समाधान दागिना लाख मोलाचा
प्रेम देऊन चेहऱ्यावरचा
कळलेच नाही कधी.............
असे जगावे आयुष्याला
संकल्प आखूनी रोज नवे
दुखालाही पाहुण्यासारखे
हसूनी झेलावे पाहुणचारासवे
आता कळले.........

**निशा खरात**

# उरातली लाट

सर येताच हलकी
आठवतेस तू उराशी
ओला काठ पापणीचा आठवांची लाट
जराशी.

व्यापतेस क्षण क्षण
आयुष्याचा माझ्या
रातराणी बहरली
गंध दारात माझ्या.

येणार नाहीस कधीही
पाहतो वाट तरीही
तुझ्या पाऊल ठशांना
उगीच शोधतो आजही.

मनास कळता कळेना, कुठे कसे थांबावे ?
हृदयीच्या जखमांना
कसे काय जपावे ?

जगणे सरता सरताही
आठवांचा दरवळ येतो
काठ पापणीचा ओला
क्षितिजास चिंब करतो.

**वर्षा प्रदिप ब्रम्हपुरकर**



# पाककृती



## उपवासाचा ठेपला



साहित्यः १ कप राजगिरा पीठ, १/२ कप आंबट ताक, १/२ कप मीठ, १/२ टीस्पून जीरे, १/२ टीस्पून तिखट, २ टेबलस्पून तेल.

कृतीः सर्वप्रथम सर्व साहित्य एकत्र ठेवावे. परातीमध्ये राजगिरा पीठ घेऊन त्यामध्ये, मीठ, तिखट, मीठ व भरडलेले जीरे घालुन थोडे थोडे ताक घालून पराठ्यासारखे पीठ भिजवून पाच मिनिटे झाकुन ठेवावे. पाच मिनिटानंतर ऊंडे करून ठेपले लाटावे. तव्यावर दोन्ही बाजुने तेलावर खरपूस भाजावे. दही किंवा उपवासाच्या कोशिंबीरीसोबत गरमागरम सर्व्ह करावे.

## राजगिरा खीर



साहित्यः २ टेबलस्पून राजगिरा पीठ, १ टेबलस्पून साजूक तूप, २०० मि.ली. ध्रूधए, ४ टेबलस्पून साखर, १/४ टीस्पून दालचिनी पूड, १ टेबलस्पून सुकामेवा काप.

कृतीःएका पॅनमध्ये तूप टाकून गरम करावे. नंतर त्यात राजगिरा पीठ टाकून किंचित परतून घ्यावे. त्यातच सुकामेवा काप घालून परतून घ्यावे. हे करताना एका बाजूला दुधात अर्धा कप पाणी टाकून गरम करावे. परतलेल्या राजगिरा पिठात, हे गरम दूध टाकून चांगले मिक्स करून घ्यावे. गुठळ्या होणार नाहीत याची काळजी घ्यावी. दोन तीन मिनिटं उकळल्यावर त्यात दालचिनी पूड आणि साखर टाकावी आणि पुन्हा दोन उकळ्या काढून घ्याव्यात. अशा प्रकारे तयार राजगिरा पिठाची खीर तयार आहे. सर्व्ह करताना वरून थोडे सुकामेवा काप घालून सर्व्ह करावी.

# पालकाचे थालीपीठ



साहित्यः १ पालक एक जुडी, कोथिंबीर, १ कांदा, लसूण पेस्ट, १ बारीक मीरची, १/२ चमचा जिरे, चीली फीक्स, १ टेबलस्पून लाल तिखट, १/२ चमचा हळद, १ वाटी बेसन पीठ, १/२ वाटी तांदूळाचे पीठ, १ चमचा तेल, चवीनुसार मीठ, १/२ ग्लास पाणी.

कृतीः पालक स्वच्छ धुऊन घ्या व तो बारीक चिरून घ्या नंतर कोथिंबीर, बारीक चिरलेला कांदा, लसूण पेस्ट,जीर,चीली फीक्स,बेसन पीठ व तांदळाचे पीठ,लाल तिखट,हळद, चवीनुसार मीठ,एक चमचा तेल, पाणी घ्या

पाणी घालून मिश्रण थोडे सैल करून घ्यावे नंतर फ्राय पॅन किंवा तव्यावर तेल टाकून तेल गरम झाल्यावर त्यात ते मिश्रण थोडे टाकावे व पसरवावे लालसर रंग आल्यावर पलटवावे व दोन्ही बाजूने व्यवस्थित शिजवून घ्यावे.

घ्या झाले तुमचे खुसखुशीत, चमचमीत चवीष्ट पौष्टिक पालकाचे थालिपीठ

# स्प्राऊट मेथी लोणचं



साहित्यः १ कप मेथी, १ टीस्पून चिंचेचा कोळ,१ चमचा गूळ,, १/२ चमचा तिखट, १/२ चमचा हळद, १/२ चमचा मीठ, १/४ चमचा हिंग

कृतीः सर्वप्रथम मेथी छान धून तिला पाण्यात भिजत घालून द्यायची. सहा–सात तास मेथी भिजल्यानंतर तिला पाण्यात बाहेर काढून मोड आणायला कपड्यात बांधून मेथीला धुवून घ्यायचं आणि कपड्यावर ती कोरड्या करून घ्यायचं आणि मग एका कढईत तेल घालून मोहरीची फोडणी करून हरत तिखट हिंग मीठ घालायचा आणि मग त्याच्यात मेथी पण फोडणी घालायची. थोड्यावेळ परतायचं आणि मग चिंचेचा रस आणि गूळ घालून कोरडा होईस्तोवर शिजवायचा. गार करून खायचं हे मेथीचे लोणचे फ्रीजमध्ये सात दिवसापर्यंत ठेवू शकतो.

# भरलं कारली फ्राय



साहित्यः२५० ग्राम छोटी कारली,१/४ कप सुक किसलेलं खोबर, ७-८ लसूण पाकळ्या, १ टेबलस्पून पांढरे तीळ, १/४ कप शेंगदाणा कूट, १ टीस्पून धने जीरे पूड, १ टेबलस्पून काश्मीरी लाल तिखट, १/२ टीस्पून हळद, १ टीस्पून कांदा लसूण मसाला, चवीनुसार मीठ आणि साखर, कोथिंबीर सारणासाठी,१ टीस्पून चिंचेचा कोळ

कृतीः सर्व प्रथम कारली स्वच्छ करून त्यातील बिया काढून घ्या, कारल्याना व्यवस्थित मीठ चोळून १० मिनिटं बाजूला ठेवा. आता कारली १० मिनिटं इडली पात्रात स्टीम करून घ्या. आता एका कढई मध्ये सुकं खोबरं, तीळ आणि लसूण ड्राय रोस्ट करून थंड करून मिक्सरच्या भांड्यात काढून घ्या नंतर त्यात दाण्याचं कूट,सर्व मसाले,कोथिंबीर मीठ आणि साखर घालून,खडबडीत असे मिक्सर मधून सर्व वाटून घ्या,आपले सारण तयार आहे वाफवलेली कारली बाहेर काढून घ्या, आणि थोडी थंड होऊ द्या, नंतर त्याला आतील बाजूला चिंचेचा कोळ चोळून घ्या आणि नंतर त्या मध्ये तयार सारण व्यवस्थित भरून घ्या,सर्व कारली अशा पद्धतीने भरून घ्या आता एका वेगळ्या पॅन मध्ये थोडं तेल गरम करून त्यात भरलेली कारली सर्व बाजूनी व्यवस्थित फ्राय करून घ्या, जवळपास १० मिनिटे लागतील आणि बस आपली मसालेदार भरलं कारली फ्राय खायला एकदम तयार आहेत..

वरून कोथिंबीर घालून सर्व्ह करा,भाकरी सोबत खा...भन्नाट लागतात...



## कोळाचे पोहे



साहित्यः जाडे पोहे दोन वाट्या, दोन वाट्या नारळाचं दूध, चिंचेचा कोळ, गूळ, चवीनुसार मीठ, फोडणीसाठी मोहरी, हिंग, कढीलिंब, भाजलेले शेंगदाणे, दोन मिरच्या बारीक चिरून, बारीक चिरलेली कोथिंबीर.

कृतीः प्रथम जाडे पोहे धुऊन निथळून नारळाच्या दुधात भिजवून ठेवायचे तासाभराने ते नारळाचे दूध पिऊन फुलून दुप्पट होतात हलक्या हाताने एकसारखे करून घ्यायचे चिंचेचा जाडसर कोळ काढून गूळ घालून बाजुला तयार ठेवायचा मोहरी,हिंग,कढीलिंब,बारीक चिरलेली मिरची याची फोडणी करून त्यात भाजकें शेंगदाणे परतून घ्यायचे फोडणी गार झाल्यावर पोह्यांवर घालायची व चवीप्रमाणे मीठ घालून पोहे एकत्र करून घ्यायचे. खायला देताना ऐन वेळी त्यात चिंचेचा कोळ मिसळून व भरपूर कोथिंबीर घालून द्यायचे जोडीला एखादा तळणीतला प्रकार चांगला लागतो. मी सोबत मस्त तळून फुललेली कुरडई घेतली आहे.

## खीर



दूध फाटले तर टाकून देऊ नका. त्यापासून बनवा स्वादिष्ट खीर,

साहित्यः फाटलेल्या दुधाचा चक्का- एक कप, दूध-एक लिटर, साखर चवीनुसार,केसर, वेलची, ड्रायफ्रूट चिरलेले.

कृती-सर्वात आधी फाटलेल्या दुधातील पाणी वेगळे करून चक्का एका भांड्यात काढा व चांगल्या प्रकारे फेटून घ्या. नंतर दूध घट्ट होईपर्यंत उकळवा. ते घट्ट झाल्यावर त्यात चक्का घाला आणि किमान १० मिनिटे शिजवा. यानंतर, या दुधात साखर, केशर, वेलची आणि सुकामेवा घाला. व थंड होण्यासाठी ठेवा. तयार खीर सर्व्ह करा.

## बटाट्याच्या धिरडे



साहित्यः बटाटे – तीन मध्यम आकाराचे किसलेले , कांदा- एक बारीक चिरलेला, हिरवी मिरची -दोन बारीक चिरलेला, कोथिंबीर- दोन टेबलस्पून , बेसन-तीन टेबलस्पून , मीठ चवीनुसार, तिखट -अर्धा टीस्पून, गरम मसाला -१/४ टीस्पून, तेल.

कृतीः

सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात बटाट्याचा कीस, चिरलेले कांदे, हिरवी मिरची, कोथिंबीर, बेसन, मीठ, तिखट आणि गरम मसाला घाला आणि चांगले मिसळा. जर मिश्रण खूप कोरडे वाटत असेल तर तुम्ही थोडे पाणी घालू शकता, परंतु लक्षात ठेवा की पीठ घट्ट राहील.आता एक नॉन–स्टिक पॅन गरम करा आणि त्यावर थोडे तेल घाला. मिश्रणाचा एक छोटासा भाग घ्या आणि ते तव्यावर पसरवा आणि थोडेसे सपाट करा. आता मंद आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शिजवा. तयार बटाट्याचे धिरडे एका प्लेटमध्ये काढा व हिरवी चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत गरमागरम सर्व्ह करा.

## मशरूम सँडविच रेसिपी



साहित्यः मशरूम-एक कप, बारीक चिरलेला कांदा- एक छोटा, बारीक चिरलेला हिरवी मिरची-एक, मिरे पूड-१/४ टीस्पून, मीठ -चवीनुसार, ऑलिव्ह ऑइल/तूप-एक टीस्पून, कॉटेज चीज-एक टेबलस्पून किसलेले, ब्रेड स्लाईस-चार ब्राऊन ब्रेड, कोथिंबीर.

कृती- सर्वात आधी नॉन–स्टिक पॅनमध्ये ऑलिव्ह ऑइल गरम करा. आता कांदा घाला आणि हलका सोनेरी होईपर्यंत तळा. आता हिरवी मिरची आणि चिरलेले मशरूम घाला. मशरूम मऊ होईपर्यंत ४–५ मिनिटे शिजवा. त्यात मीठ आणि मिरे पूड घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही थोडे चीज देखील घालू शकता. आता गॅस बंद करा आणि मिश्रण थोडे थंड होऊ द्या. आता हे मिश्रण ब्रेड स्लाईसवर पसरवा आणि दुसरा स्लाईस वर ठेवा आणि टोस्टर किंवा पॅनवर बेक करा. ते दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत बेक करा. हिरव्या कोथिंबीर चटणी किंवा टोमॅटो चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा.

# पनीर पसंदा



साहित्यः पनीर – ३०० ग्रॅम, कांदा – दोन, मलई-अर्धा कप, कॉर्न पीठ- दोन टेबलस्पून, जिरे पावडर-एक टीस्पून, धणे पावडर – दोन टीस्पून, लाल तिखट-एक टीस्पून, हळद-एक टीस्पून, आले किसलेले-एक टीस्पून, हिरव्या मिरच्या चिरलेल्या-दोन , दालचिनी-एक, टोमॅटो प्युरी – एक कप, तेजपान-दोन, लवंग-चार, हिरवी वेलची-तीन, लसूण-पाच कळ्या, काजू-दोन टेबलस्पून, तेल , मीठ , कोथिंबीर

कृती- सर्वात आधी एका भांड्यात चिरलेला कांदा, लसूण पाने, तमालपत्र, वेलची, हिरवी मिरची, दालचिनी, लवंगा, थोडे मीठ आणि एक कप पाणी घाला आणि ते उकळण्यासाठी ठेवा. आता, पनीर घ्या आणि त्यांचे त्रिकोणी तुकडे करा. यानंतर, पनीरचे उरलेले तुकडे चुरा, त्यात कोथिंबीर पेस्ट आणि काजूचे तुकडे घाला आणि मिक्स करा आणि त्यांचे स्टफिंग तयार करा. आता पनीरचे त्रिकोणी तुकडे घ्या आणि एका पनीरच्या तुकड्यात तयार केलेले स्टफिंग त्यात भरा आणि वर दुसरा त्रिकोणी तुकडा ठेवा आणि तो दाबा. त्याचप्रमाणे सर्व तुकडे स्टफिंगने भरा आणि एका प्लेटमध्ये बाजूला ठेवा. यानंतर, एका भांड्यात कॉर्न फ्लोअर घालून द्रावण तयार करा आणि एका पॅनमध्ये तेल टाका आणि ते गरम करण्यासाठी ठेवा. तेल गरम झाल्यावर, भरलेले पनीरचे तुकडे घ्या आणि ते कॉर्न फ्लोअरच्या द्रावणात बुडवा आणि ते लेप करा आणि ते पॅनमध्ये ठेवा. त्याचप्रमाणे, सर्व पनीरचे तुकडे एक एक करून लेप करा आणि ते पॅनमध्ये ठेवा आणि हलके तळा. आता कांदा मिसळलेले मसाले घ्या आणि ते पाण्यातून काढून टाका आणि त्यांची पेस्ट तयार करा. आता पुन्हा एक पॅन घ्या आणि त्यात १ टेबलस्पून तेल गरम करा. तेल गरम झाल्यानंतर, त्यात तमालपत्र आणि वेलची घाला. तमालपत्रांचा रंग बदलला की, कांद्याची पेस्ट घाला आणि मध्यम आचेवर शिजवा. काही सेकंदांनी, पेस्टचा रंग सोनेरी झाल्यावर, टोमॅटो प्युरी घाला आणि शिजवा.

आता तेल ग्रेव्हीपासून वेगळे होऊ लागले की, लाल मिरची, हळद, गरम मसाला आणि इतर मसाले आणि चवीनुसार मीठ घाला आणि मिक्स करा. आता ग्रेव्हीमध्ये २ कप पाणी घाला आणि मध्यम आचेवर उकळू द्या. ग्रेव्ही उकळू लागली की, त्यात पनीरचे तुकडे घाला आणि एका लाडूने ग्रेव्हीमध्ये चांगले मिसळा आणि २–३ मिनिटे शिजवा.

शेवटी पनीर मध्ये क्रीम घाला आणि आणखी २ मिनिटे शिजू द्या, नंतर गॅस बंद करा. आता कोथिंबीर गार्निश करा.

## किचन टीप्स

# भाजी बनवल्यानंतर त्यात हा आंबट पदार्थ घाला; उत्तम चव येईल

आंबटपणा भाजीची चव अधिकच वाढवते, समृद्धता आणि ताजेपणा दोन्ही वाढवते. आज आम्ही तुम्हाला अशा काही भाज्याबद्दल सांगणार आहोत ज्यात थोडासा आंबटपणा घातल्यानंतर चव अधिक स्वादिष्ट बनते.

- **वांग्याची भाजी किंवा भरीत**

वांग्याची भाजी किंवा भरीत मध्ये आमसूल पावडर किंवा थोडासा लिंबाचा रस घालावा. वांगी थोडी जड आणि मऊ असल्याने, आंबटपणा त्याची चव हलकी आणि मसालेदार बनवतो.

- **मेथीची भाजी**

मेथीच्या भाजीमध्ये आंबट दही किंवा टोमॅटो घालावा. यामुळे भाजीला आणखीन चव येते.

- **बटाटा-टोमॅटोची भाजी**

बटाटा–टोमॅटोची भाजीला टोमॅटो फक्त आंबटपणा देतात, कधीकधी लिंबाचा रस देखील घालावा. छान चव येते.

- **भेंडीची भाजी**

भेंडीची भाजी केल्यानंतर त्यामध्ये आमसूल पावडर किंवा लिंबाचा रस घालावा. भेंडी चिकट असल्याने, आंबटपणा त्याला कोरडे आणि कुरकुरीत बनवण्यास मदत करतो.

- **आलू मटारची भाजी**

आलू मटरची भाजी केल्यांनतर त्यामध्ये आमसूल पावडर किंवा लिंबाचा रस घातल्याने मटार आणि बटाटे दोघांनाही चव येते, आंबटपणा चव वाढवतो.

# किचन टीप्स

## भाजी जास्त तिखट झाल्यास तिखटपणा कमी करण्यासाठी या टीप्स अवलंबवा

**भाजी जास्त तिखट झाल्यास तिखटपणा कमी करण्यासाठी या टीप्स अवलंबवा**

बऱ्याचदा जेवण बनवताना, चुकून किंवा घाईघाईत तिखट जात पडत. यामुळे भाजी तिखट होते. अशावेळेस काय करावे हे सुचत नाही. याकरिता आज आपण काही टीप्स पाहणार आहोत ज्यामुळे तुम्ही नक्कीच भाजीतील तिखटपणा कमी करू शकाल.

**✸ उकडलेले बटाटे घाला.**

भाजीतील तिखटपणा कमी करण्यासाठी त्यात उकडलेले बटाटे घाला. मसालेदार चव संतुलित करण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. बटाट्याची पोत अशी असते की ती कोणत्याही ग्रेव्हीच्या भाजीत सहज मिसळते. जर सुकी भाजी तिखट झाली तर चिरलेले उकडलेले बटाटे घाला आणि मिक्स करा.

**✸ पनीर मिक्स करा.**

भाजीमध्ये तिखट कमी करायची असेल तर पनीर वापरा. यामुळे तिखटपणा संतुलित होतो. पनीरच्या सौम्य आणि मलईदार चवीमुळे तिखटपणा कमी होतो. तुम्ही ते लहान तुकडे करून ग्रेव्हीमध्ये घालू शकता. किंवा तुम्ही ते मॅश करून ग्रेव्हीमध्ये घालू शकता.

**✸ टोमॅटो प्युरी घाला.**

भाजीतील तिखटपणा कमी करण्यासाठी तुम्ही टोमॅटो प्युरी घालू शकता. कारण टोमॅटोची आंबट आणि सौम्य गोड चव मिरचीला संतुलित करते.

**✸ नारळाचे दूध किंवा क्रीम मिसळा.**

जर भाजी मसालेदार असेल व तिखट झाली असेल तर तुम्ही त्यात नारळाचे दूध किंवा क्रीम वापरू शकता. या गोष्टी गोडवा वाढवतात आणि भाजीला मलईदार पोत देखील देतात.

## टीप्स

### ❖ दरवाजासमोर बेड नको

❖तुमची बेडरूम अशी असावी की, जेणेकरून येणाऱ्या पाहुण्यांना तुमचा बेड थेट दिसणार नाही. जर दरवाजासमोर बेड असेल त्याला थोडं शिफ्ट करा. नाहीतर वास्तुदोषामुळे दांपत्याच्या जीवनात समस्या निर्माण होऊ शकतात. जर तुमची रूम छोटी असेल आणि बेड शिफ्ट करता येणार नसेल तर पडदा लावावा.

### ❖ बेडसमोर आरसा नको

❖बेडच्या समोर कधीही आरसा नसावा. यामुळे समाजात बदनामी होण्याची सदैव चिंता राहते. वास्तुशास्त्रानुसार, सकाळी उठल्यावर सर्वांत आधी आरसा बघू नये. जर तुम्ही असं केलंत तर दिवसभर तुमच्याबरोबर चुकीच्या गोष्टी होतील. त्यामुळे तुम्हाला खरं तर दुःख होईल. असं असल्यास, सकाळी उठल्यावर एखादा फोटो बघा, ज्याने तुम्हाला सकारात्मक ऊर्जा प्राप्त होईल आणि जर असं घडणार नसेल तर सकाळी उठल्यानंतर तुम्ही किमान ५ मिनिटे मेडिटेशन करा.

### ❖ स्वयंपाकघरात देव्हारा नको

❖आपल्याकडे बऱ्याच जणांच्या घरात स्वयंपाकघरातच देव्हारा असतो. पण वास्तुशास्त्र नेमकं याच्या उलट सांगतं. वास्तुनुसार, स्वयंपाकघरामध्ये किंवा जवळ कधीही देव्हारा असू नये. यामुळे घरातील लोकांच्या रागात वाढ होते. तसंच आरोग्य निगडीत समस्याही वाढतात. त्यामुळे शक्य असल्यास देव्हारा तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरापासून दूर ठेवा आणि घराच्या हॉलमध्ये अथवा अन्य ठिकाणी तुम्ही हा देव्हारा करून घ्या.

### ❖ चुकीच्या दिशा टाळा


❖जर तुम्ही घर घेण्याच्या विचारात असाल किंवा घरात इंटरियरप्रमाणे बदल करणार असाल तर लक्षात ठेवा की, स्वयंपाकघर बनवताना ते नेहमी दक्षिण–पूर्व दिशेला असावं. जर त्या दिशेला बनवणं शक्य नसल्यास उत्तर–पश्चिम दिशेला बनवून घ्या आणि स्वयंपाकघराचा दरवाजा उत्तर किंवा उत्तर–पूर्व दिशेला बनवा. वास्तुशास्त्रानुसार या दिशांना स्वयंपाकघर न केल्यास कुटुंबात सतत भांडणं होण्याची शक्यता असते. त्यामुळे तुमचं स्वयंपाकघर नक्की कोणत्या दिशेला आहे ते नीट तपासून घ्या.

टीप्स

# घराच्या मुख्य दरवाज्याचेही काही नियम आहेत.

१)घराच्या मुख्य दरवाज्यासमोर रस्ता नसावा. दरवाज्यासमोर रस्ता असल्यास आपल्या विकासात बाधा येते.

२)दरवाज्यासमोर मोठे झाड असल्याने घरातील मुले नेहमी आजारी पडतात.



३)दरवाज्यासमोर नेहमी पाणी वाहते ठेवल्याने नेहमी आर्थिक नुकसान होत असते.

४)दरवाज्यासमोर मंदिर असेल तर घरात कधीच सुख नांदत नाही.

५)घराच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर स्तंभ (खांब) असतील तर त्या घरातील महिला नेहमी आजारी पडतात.

६)जमिनीच्या तुलनेत घराचा दरवाजा खोलगट भागात असेल तर घरातील मुख्य पुरुष व्यसनाधीन व नेहमी दुःखात बुडालेला असतो.

७) घरासमोर रस्ता, मंदिर असेल तर घरासमोर अधिक जागा सोडल्याने दोष नाहीसे होतात.

८)घराचे मुख्य प्रवेशव्दार घरातील इतर दरवाज्यांपेक्षा मोठे असावे.

# With best compliment from

